सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजना व त्याबाबतच्या अर्थसंकल्पीय तरतुदी

## २०२६–२०२७

### सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग
### (सामाजिक न्याय )

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे–४११ ००१

२०२६

# मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी
# राबविण्यात येणाऱ्या योजना
# व त्याबाबतच्या
# अर्थसंकल्पीय तरतुदी

## २०२६-२०२७

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग

(सामाजिक न्याय )

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | प्रस्तावना | |
| | सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग | |
| १. | समाज कल्याण | ०१ |
| २. | महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई | ३० |
| ३. | साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई | ३८ |
| ४. | संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई | ४३ |
| ५. | महाराष्ट्र राज्य खादी ग्रामद्योग मंडळ, मुंबई | ४७ |
| ६. | महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती/जमाती आयोग, वरळी, मुंबई | ४९ |
| ७. | महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग | ५० |
| ८. | अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत इतर विभागांच्या योजना | ५१ |
| | १. ग्राम विकास व जलसंधारणा विभाग | ५८ |
| | २. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | ६१ |
| | ३. कौशल्य विकास व उद्योजकता | ६३ |
| | ४. कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विभाग | ६४ |
| | ५. मत्स्यव्यवसाय विभाग व गृहनिर्माण विभाग | ६६ |
| | ६. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग | ६७ |
| | ७. नगर विकास विभाग | ६९ |
| | ८. सहकार विभाग | ६९ |
| | ९. महिला व बालकल्याण विभाग | ६९ |

## प्रस्तावना

या पुस्तिकेत अनुसूचित जाती, प्रवर्गातील कल्याणाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, संबंधित विभागाने दिलेली माहिती त्या विभागांकडून संकलित करून पुस्तिकेत अंतर्भूत करण्यात आलेली आहे.

**डॉ. हर्षदीप कांबळे,**
भा.प्र.से.,
प्रधान सचिव,
सामाजिक न्याय व
विशेष साहाय्य विभाग,
महाराष्ट्र शासन.

# सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग

## १. समाज कल्याण

मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी या विभागाने आखलेल्या योजना चार स्थूल प्रवर्गांखाली येतात :-

(एक)शैक्षणिक सवलती

(दोन) आर्थिक उन्नती

(तीन) गृहनिर्माण

(चार) इतर योजना

## प्रधान लेखाशीर्ष : २२२५- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण, मागणी एन-३

## (एक) शैक्षणिक सवलती

मागासवर्गीयांना शिक्षणक्षेत्रामध्ये मिळणाऱ्या साहाय्यामध्ये स्थूलमानाने शिकवणी फी व परीक्षा फी यांची माफी, माध्यमिक शाळेत शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या, शालान्तपूर्व, शालान्त परीक्षोत्तर शिक्षणाकरिता शिष्यवृत्त्या, मुला- मुलींकरिता शासकीय निवासी वसतिगृहे, स्वयंस्फूर्त संस्थांनी चालविलेल्या मागासवर्गीय वसतिगृहांना अनुदान, मागासवर्गीय वसतिगृहांना इमारत अनुदान, स्वच्छता राखणाऱ्या कामगारांच्या मुलांकरिता निवासी शाळा उघडणे, इत्यादी शैक्षणिक योजनांचा महत्त्वाचा भाग आहे.

**१. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे मागासवर्गीय मुला/मुलींकरिता मॅट्रिकपूर्व शिक्षण फी; परीक्षा फी योजना (जुने लेखाशीर्ष २२२५०५३९ नविन लेखाशीर्ष २२२५ जी १६१).** — शासनाच्या शिक्षण, क्रीडा व समाजकल्याण विभागाचा निर्णय क्रमांक ईबीसी- २०१६/प्र.क्र.६२७/शिक्षण- १, दिनांक १५ फेब्रुवारी २०१८ अन्वये मंजूर केलेल्या या योजनेच्या नियमानुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना वय व उत्पन्न विचारात न घेता सर्व स्तरांवरील मान्यताप्राप्त शिक्षणक्रमासाठी शुल्क माफी उपलब्ध आहे. शुल्क माफीत प्रवेश शुल्क, शिक्षण शुल्क, सत्र शुल्क, वाचनालय शुल्क, प्रयोगशाळा शुल्क, क्रीडा शुल्क, परीक्षा शुल्क इत्यादी शुल्कांचा अंतर्भाव होतो. सदर शुल्काची प्रतिपूर्ती शैक्षणिक संस्थांना योजनेच्या नियमानुसार करण्यात येते. अनुसूचित जातीचे विद्यार्थ्यांचे पालकांचे उत्पन्न रुपये २,५०,००० पेक्षा जास्त आहे त्यांना भारत सरकार शिष्यवृत्तीचा लाभ मिळत नसल्याने त्यांना शैक्षणिक लाभ देण्याचे दृष्टीने मान्यताप्राप्त अभ्यासक्रमानुसार तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शिक्षण समितीने/विभागाने निर्धारित केल्याप्रमाणे शिक्षणशुल्काची प्रतिपूर्ती महाविद्यालयांना करण्यात येते. माध्यमिक शाळांतील अनुसूचित जातीचे विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचेमार्फत मंजूर करण्यात येते. सदर योजनेसाठी सन २०२६-२७ करिता रुपये १२०.८५ लाख तरतूद करण्यात आली आहे.

एक वेळ नापास झालेले व ज्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती उपलब्ध होऊ शकली नाही, अशांचे बाबतीतही शुल्काची प्रतिपूर्ती जिल्हा स्तरावर सहायक आयुक्त, समाजकल्याण यांच्यामार्फत केली जाते. मात्र आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या बाबतीतील शुल्काची प्रतिपूर्ती, ते ईबीसी योजनेखाली पात्र असतील तर शिक्षण विभागामार्फत केली जाते. तसेच खाजगी विनाअनुदानित/कायम अनुदानित शाळांमध्ये इयत्ता १ ली ते १० वी च्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील अनुसूचित जाती, वि.जा., भ.ज., वि.मा.प्र. विद्यार्थ्यांची शिक्षण/परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती सन २०११-१२ पासून रुपये १००, १५० व रुपये २०० प्रमाणे दरमहा १० महिन्यांसाठी करण्यात येते.

**२. माध्यमिक शाळांतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना (२२२५०३६१/जुने लेखाशीर्ष २२२५०५३९ नविन लेखाशीर्ष २२२५ जी १६१).—** माध्यमिक शाळांतील हुशार, गुणवत्तापूर्ण मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी या योजनेखाली पुढील दराने शिष्यवृत्ती दिली जाते. (शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग, क्रमांक ईबीसी – १०६६/५४७८७–जे, दिनांक २९ ऑगस्ट १९६६) माध्यमिक शाळेतील इयत्ता ५ वी ते १० वी मधील प्रत्येक इयत्तेमधून ५० टक्क्यांहून अधिक गुण मिळविणाऱ्या पहिल्या दोन मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती दिली जाते. दहावीच्या विद्यार्थ्यांना प्रथम प्राधान्य दिले जाऊन निधीच्या उपलब्धतेनुसार ५ वी पर्यंत क्रमाक्रमाने योजनेची व्याप्ती वाढविली जाते. सन २००६–०७ पासून शा. नि. क्र. ईबीसी– २००३/प्र.क्र. ४६६/मावक–२, दिनांक ९ फेब्रुवारी २००७ नुसार दरात सुधारणा करण्यात आली आहे. इयत्ता ५ वी, ७ वी चे विद्यार्थ्यांसाठी रुपये ५० दरमहा १० महिन्यांसाठी आणि इयत्ता ८ वी १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी रुपये १०० दरमहा १० महिन्यांसाठी शिष्यवृत्ती देण्यात येते. शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाचे विचाराधीन आहे. सदर योजना जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचेमार्फत राबविण्यात येते. सदर योजनेखाली सन २०२६–२७ वर्षाकरिता रुपये १०७.४० लक्ष तरतूद करण्यात आली आहे.

**३. इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय मुलींना शिष्यवृत्ती प्रदान करणे (जुने लेखाशीर्ष २२२५०५३९ नविन लेखाशीर्ष २२२५ जी १६१). —** मागासवर्गीय मुलींमध्ये (अनुसूचित जाती, विमुक्त जाती) प्राथमिक शाळांमध्ये गळतीचे प्रमाण अधिक आढळून येते. ही मुलींची गळती रोखण्याच्या दृष्टिकोनातून विचार करता मुलींना शिष्यवृत्ती लागू करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शा. नि. क्र. ईबीसी – २००३/प्र.क्र. ४१७/मावक–२, दिनांक ३१ मार्च २००५ अन्वये सन २००४– ०५ पासून शिष्यवृत्ती दरात रुपये ३० दरमहा वाढ करून रुपये ६० दरमहा करण्यास मान्यता देण्यात आली आहे. इयत्ता ५ वी ७ वी चे अनुसूचित जातीचे मुलींना रुपये ६० दरमहा प्रमाणे १० महिन्यांसाठी शिष्यवृत्ती देण्यात येते. सदर योजना जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचेमार्फत राबविण्यात येते. सदर योजनेखाली सन २०२६–२७ करिता रुपये १८४.१० लक्ष तरतूद करण्यात आली आहे.

**४. भारत सरकारची शालान्त परीक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना (२२२५०४९५/२२२५०३५२). —** मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी शालान्त परीक्षोत्तर शिक्षण घेण्यास उद्युक्त व्हावे व त्याकरिता त्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून भारत सरकारने अनुसूचित जातींच्या/जमातींच्या विद्यार्थ्यांसाठी ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये २,५०,००० च्या आत आहे त्या विद्यार्थ्यांकरिता ही योजना सुरू केली आहे. या योजनेखाली अभ्यासक्रमाच्या वर्गीकरणानुसार अनुसूचित जाती (नवबौद्धांसह), अनुसूचित जमातीच्या विद्यार्थी वसतिगृहात न राहता शिक्षण घेणाऱ्या पात्र विद्यार्थिनींना/विद्यार्थ्यांना दरमहा रुपये २५० ते ७०० या दराने निर्वाह भत्ता देण्यात येतो. तसेच वसतिगृहात राहून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी व विद्यार्थिनींसाठी निर्वाह भत्त्याचे दर दरमहा रुपये ४०० ते १,३५० असे आहेत. सदर सुधारित दर सन २०२१–२२ पासून देण्यात येत आहेत. निर्वाह भत्त्याखेरीज विद्यार्थ्यांना, संस्थांना विद्यापीठाने ठरविलेली सर्व फी सुद्धा या योजनेखाली दिली जाते. या योजनेअंतर्गत सन २०१८–१९ पासून महाडीबीटी प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांचा निर्वाहभत्ता व महाविद्यालयाच्या शुल्काची रक्कम त्यांचे बँक खात्यामध्ये जमा करण्यात येते. सदर योजना केंद्र हिस्सा ६० टक्के व राज्य हिस्सा ४० टक्के या प्रमाणात राबविण्यात येते. तथापी सन २०२१–२२ पासून राज्य हिस्स्याचे (४० टक्के) निर्वाह भत्त्याची रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार सलग्नीकृत बँक खात्यामध्ये तर महाविद्यालयाला देय असलेली शिक्षण शुल्क व इतर शुल्क थेट महाविद्यालयाच्या खात्यामध्ये महाडिबीटी प्रणालीद्वारे अदा करण्यात येते त्याचप्रमाणे उर्वरीत केंद्र हिस्सा (६० टक्के) सर्व रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार सलग्नीकृत बँक खात्यामध्ये थेट केंद्र शासनाच्या नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलद्वारे वितरीत करण्यात येत आहे. सदर योजनेखाली सन २०२६–२७ वर्षाकरिता रुपये ७५०००.०१ लक्ष तरतूद करण्यात आली आहे.

**शिष्यवृत्तीसाठी पात्रतेच्या ठळक अटी खालीलप्रमाणे आहेत. –**

(१) विद्यार्थ्यांच्या वडिलांचे/पालकांचे सर्व मिळून वार्षिक उत्पन्न रुपये २,५०,००० चे आत असल्यास पूर्ण शिष्यवृत्ती दिली जाते.

(२) पूर्णकालीन नोकरी करणारे विद्यार्थी या शिष्यवृत्तीस अपात्र आहेत.

(३) त्याच इयत्तेत परत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळू शकणार नाही. पास झाल्यानंतर वरच्या वर्गासाठी शिष्यवृत्तीस ते पात्र राहतील.

(४) एका कुटुंबातील सर्व मुलांना ही शिष्यवृत्ती मिळेल. मुलींनासुद्धा या योजनेचा लाभ मिळेल.

(५) जो विद्यार्थी/विद्यार्थिनी दुसरी शिष्यवृत्ती अगर विद्यावेतन स्वीकारील त्यास/तीस ही शिष्यवृत्ती त्या तारखेपासून मिळणार नाही.

(६) ज्या संस्थेत विद्यार्थी शिकत आहेत, त्या संस्था प्रमुखाकडे पूर्णपणे भरलेले अर्ज विद्यार्थ्यांनी सादर करावेत. विद्यार्थी ज्या राज्यातील रहिवासी असेल, त्या राज्य सरकारने या कामासाठी विनिर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्यास उद्देशून हे अर्ज करावेत.

**५. पोस्ट मॅट्रिक शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना (फ्रीशिप) (२२२५०३८८).** — मागासवर्गीय विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल रुची निर्माण करून उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत उपलब्ध करून देणे व शिक्षण व्यवस्थेमध्ये विद्यार्थी गळती प्रमाण कमी करणे तसेच उच्च शिक्षणाद्वारे आर्थिक स्तर उंचावण्यासाठी संधी उपलब्ध करून देणे, राज्य सरकारने अनुसूचित जातीच्या/जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी ज्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये २,५०,००० पेक्षा जास्त आहे त्या विद्यार्थ्यांकरिता ही योजना सुरू केली आहे.

सदर योजना सामजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग, शासन निर्णय, दि. ३१ मार्च २०१६ व दि. १८ जून २०२५ नुसार राबविण्यात येत असून शैक्षणिक वर्ष २०१८–१९ पासून महाडीबीटी प्रणालीमार्फत योजनेची अदायगी करण्यात येत आहे. यामध्ये राज्यातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना सर्व प्रकारचे अनिवार्य शुल्क जसे की, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क आणि इतर अनुज्ञेय शुल्क याची महाविद्यालयाच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये जमा करण्यात येते. सदर योजनेखाली सन २०२६–२७ वर्षाकरिता रुपये ४२५००.०० लक्ष तरतूद करण्यात आली आहे.

**योजनेच्या पात्रतेच्या ठळक अटी खालीलप्रमाणे आहेत. --**

(१) आई–वडिलांचे, पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये २,५०,०००/-- पेक्षा जास्त असावे.

(२) विद्यार्थी अनुसूचित जातीचा किंवा नवबौद्ध असावा.

(३) विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा.

(४) विद्यार्थी शालान्त परीक्षा किंवा इतर समकक्ष मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण असावा.

(५) शासकीय मान्यताप्राप्त असलेली आणि महाराष्ट्र स्थित असलेली संस्था असावी.

(६) विद्यार्थ्यांनी व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी केवळ CAP माध्यमातून प्रवेश घेतलेला असावा.

(७) संपूर्ण अभ्यासक्रम कालावधीत केवळ एकदा अनुत्तीर्ण ग्राह्य धरले जाईल.

**६. सफाई कामगारांच्या मुलांकरिता निवासी शाळा (२२२५ २२२८).** — सफाई काम करणाऱ्या पालकांची मुले शिक्षणापासून वंचित राहू नये, म्हणून त्यांच्या निवासासह शैक्षणिक उन्नतीसाठी इयत्ता १ ली ते १० वीपर्यंतचे शिक्षण देण्यासाठी पुणे व नागपूर येथे एक–एक निवासी शाळा सुरू करण्यात आलेली आहे. या निवासी शाळेत विद्यार्थ्यांना निवास, भोजन, शैक्षणिक साहित्य, गणवेष, इत्यादी सोयी मोफत देण्यात येतात.

सदर योजनेखाली सन २०२६–२७ वर्षाकरिता रुपये २०२.३८ लक्ष तरतूद मंजूर करण्यात आली.

**७. आद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना विद्यावेतन (NN २१००१२/१४)(२२२५०३७९/).** — शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील मागासवर्गीय (डेस्कॉलर्स) विद्यार्थ्यांना रुपये ५०० दरमहाप्रमाणे विद्यावेतन देण्यात येते. मागासवर्गीयांना तांत्रिक शिक्षण घेता यावे म्हणून ही योजना सन १९७२–७३ पासून सुरू आहे. प्रशिक्षणार्थ्यांना संस्थेच्या प्राचार्यांकडून विद्यावेतन अदा करण्यात येते.

सदर योजनेखाली सन २०२६–२७ वर्षाकरिता रुपये १.२२ लक्ष तरतूद मंजूर करण्यात आली आहे.

**८. सैनिक शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता (२२२५०४५९/२२२५०३९७).** — सदर योजना सन १९७८ – ७९ पासून कार्यान्वित आहे. नाशिक, पुणे, सातारा, चंद्रपूर या सैनिक शाळांमध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांवर शिक्षण फी, परीक्षा फी, भोजन, निवास, कपडालत्ता, घोडेस्वारी, पॉकेटमनी इत्यादींवर होणाऱ्या खर्चाची १०० टक्के प्रतिपूर्ती शाळांना समाजकल्याण विभागातर्फे करण्यात येते. मात्र त्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये २,५०,००० पेक्षा अधिक नसले पाहिजे. तसेच सन १९९६–९७ पासून अनुदानित सैनिक शाळेतील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांनासुद्धा रुपये १५,००० पर्यंतचा खर्च प्रत्येक वर्षी शासनाकडून मिळतो. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीत सहज प्रवेश मिळावा या हेतूने सैनिकी शिक्षणासाठी निर्वाहभत्ता दिला जातो. सदर योजनेखाली सन २०२६–२७ वर्षाकरिता रुपये ३७६.०० लक्ष तरतूद करण्यात आली आहे.

**९. वैद्यकीय, अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन, कृषी व पशुवैद्यकीय महाविद्यालयांतील अनुसूचित जाती/जमातींच्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी पुस्तकपेढी योजना (NN २१०००६) (२२२५०५६६).** — ही केंद्रपुरस्कृत योजना असून केंद्र व राज्य यांच्या समन्वयाने ५०:५० टक्के हिस्सा या तत्त्वावर सन १९७८–७९ पासून राबविली जाते. वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयांबरोबर सन १९९२–९३ पासून ही योजना तंत्रनिकेतन, कृषी व पशुवैद्यकीय महाविद्यालयांनासुद्धा लागू करण्यात आली आहे. सदरहू पदवी अभ्यासक्रम शिकणाऱ्या मागासवर्गीय अनुसूचित जाती–जमातींच्या विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे पुस्तके विकत घेणे परवडत नाही, म्हणून अशा मागासवर्गीय विद्यार्थांना संबंधित महाविद्यालयाच्या ग्रंथालयातून या योजनेखाली पुस्तक संच उपलब्ध करून दिले जातात. प्रत्येक २ विद्यार्थ्यांमध्ये एक पुस्तक संच पुरविण्यात येतो. एका पुस्तक संचाचे आयुष्यमान ३ वर्षांचे असते. सदरहू महाविद्यालयांना पुढील दराने एका पुस्तक संचासाठी अनुदान मंजूर करण्यात येते :––

(१) वैद्यकीय/अभियांत्रिकी .. रुपये ७,५०० प्रत्येक पुस्तक संच.

(२) तंत्रनिकेतन .. रुपये २,४०० प्रत्येक पुस्तक संच.

(३) कृषी .. रुपये ४,५०० प्रत्येक पुस्तक संच.

(४) पशुवैद्यकीय .. रुपये ५,००० प्रत्येक पुस्तक संच.

या व्यतिरिक्त कृषी, अभियांत्रिकी, वैद्यकीय पदव्या व अभ्यासक्रमाचे एम.बी.ए., बायोसायन्स, विधी अभ्यासक्रम शिकणाऱ्या विद्यार्थ्यांस प्रत्येकी रुपये ५,००० पुस्तक संच मंजूर करण्यात येतो.

पुस्तक संच ठेवण्यासाठी एक लोखंडी कपाट रुपये २,००० किमतीचे प्रत्येक पुस्तकपेढीस मंजूर करण्यात येते. या योजनेसाठी उत्पन्न मर्यादा वार्षिक रुपये २,५०,००० आहे. सदर योजनेखाली सन २०२६–२७ वर्षाकरिता केंद्र हिस्सा, राज्य हिस्सा योजनेखाली रुपये ०.०१ लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे.

**१०. सफाई व आरोग्यास धोकादायक क्षेत्रात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती प्रदान करणे (२२२५०५०१/२२२५३०३७/२२२५जी१९९/२२२५०४०३/२२२५३०४६/२२२५जी२०५).** — सदरच्या केंद्र पुरस्कृत योजनेमध्ये शासन निर्णय दिनांक २० फेब्रुवारी २०२४ अन्वये या योजनेमध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. या योजनेत मेहेतर, भंगी, कातडी कमावणे, सोलणे इत्यादी सफाई व आरोग्यास धोकादायक क्षेत्रात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना मॅट्रिकपूर्व शिक्षण घेता यावे या उद्देशाने अशा पालकांच्या मुलांना शैक्षणिक फी, भोजन, निवास, पुस्तके, वह्या, स्टेशनरी खर्च भागविण्यासाठी पुढे नमूद केलेल्या दराने इयत्ता १ ली ते १० वी तील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. सदर योजना ४० टक्के राज्य व ६० टक्के केंद्र पुरस्कृत आहे. यासाठी कोणतीही उत्पन्नाची अट नसून पालकाचे अस्वच्छ व्यवसाय करीत असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. ही योजना जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचेमार्फत राबविण्यात येते. सदर योजनेखाली सन २०२६–२७ वर्षाकरिता रुपये ६००.०० लक्ष तरतूद (राज्य हिस्सा) करण्यात आली आहे.

**(१) वसतिगृहात राहणारे विद्यार्थी.** – जे विद्यार्थी वसतिगृहात राहतात त्यांना सुधारित दराप्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येते :–

इयत्ता ३ री ते १० वी .. रुपये ७०० दरमहा (१० महिन्यांकरिता).

**(२) वसतिगृहात न राहणारे विद्यार्थी.** – ही योजना जे विद्यार्थी वसतिगृहात राहत नाहीत अशांना शिष्यवृत्तीचे दर खालीलप्रमाणे आहेत :–

इयत्ता १ ली ते १० वी .. रुपये ३५० दरमहा (१० महिन्यांकरिता).

**११. शासकीय वसतिगृहे (२२२५३३४२/२२२५०२८१/२२२५०९१३).** — मागासवर्गीय आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील मुलांना व मुलींना शैक्षणिक सवलतींचा फायदा घेणे शक्य व्हावे म्हणून शासनाने वसतिगृहाची योजना सन १९२२ पासून सुरू केलेली आहे. या वसतिगृहामध्ये विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येतो व त्यांना विनामूल्य भोजन व राहण्याची जागा, याबरोबर पाठ्यपुस्तके, लेखनसामग्री, अंथरूण व पांघरूण, वैद्यकीय साहाय्य, वाहनांच्या सोयी या देखील पुरविण्यात येतात. तसेच अभ्यासात कच्चे असणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष शिक्षण देण्याची देखील सोय करण्यात येते. थोडक्यात, वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना, त्यांच्या शारीरिक व बौद्धिक विकासासाठी सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. सन २०१६–१७ अखेर शासकीय मागासवर्गीयांच्या वसतिगृहांची एकूण संख्या ४४९ आहे. दिनांक २८ जून २००७ च्या शासन निर्णयानुसार मागासवर्गीय मुला–मुलींसाठी नवीन १०० शासकीय वसतिगृहे आणि विभागीय स्तरावर मागासवर्गीय मुला–मुलींसाठी १००० विद्यार्थी क्षमतेची सहा नवीन शासकीय वसतिगृहे सुरू करण्यात आली आहेत. सदर योजनेखाली सन २०२६–२७ वर्षाकरिता रुपये ६००००.०० लक्ष तरतूद करण्यात आली आहे.

तसेच शासन निर्णय कृषीसीएच–२०१६/प्र.क्र.२९३/शिक्षण–२, दिनांक ६ जानेवारी २०१७ अन्वये शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी अर्ज सादर केला परंतु प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित विद्यार्थ्यांकरिता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरू करण्यात आली आहे.

**१२. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना (२२२५ ई–७७७).** — शासन निर्णय क्रमांक बीसीएच–२०१६/प्र.क्र. २९३/शिक्षण–२, दिनांक ०६ जानेवारी २०१७ अन्वये, १० वीनंतरच्या अभ्यासक्रमांना (११ वी व १२ वी) व १२ वी नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांना भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा स्वतः उपलब्ध करून घेण्यासाठी त्यांचे आधार क्रमांक संलग्न असलेल्या बँक खात्यात थेट रक्कम वितरित करण्याकरिता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरू करण्यात आली आहे. सदर योजनेवर सहायक आयुक्त, समाज कल्याण तसेच संबंधित शहरातील संबंधित वसतिगृहाचे गृहपाल यांचे संनियंत्रण राहील.

सदर योजनेचा लाभ मिळण्यासाठी अनुसूचित जातीचा व नवबौद्ध प्रवर्गाचा महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेला तसेच भारत सरकार शिष्यवृत्तीस पात्र असलेला व स्थानिक नसलेला विद्यार्थी अर्ज करण्यास पात्र राहील. सदर योजनेसाठी निवड करताना सामाजिक न्याय विभागाच्या शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी अर्ज केलेल्या व प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांचा या योजनेच्या निवडीसाठी प्राधान्याने विचार करण्यात येईल. तसेच महानगरपालिका/नगरपालिका/ एमएमआरडीए/पीएमआरडीए/एनआयटी (नागपूर इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट) यासारख्या प्राधिकरणाच्या हद्दीपासून ५ कि.मी. परिसरात असलेल्या महाविद्यालयात शिकत असलेले विद्यार्थी देखील सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र असतील. विद्यार्थ्यांची निवड गुणवत्तेनुसार करण्यात येईल व निवड झालेला विद्यार्थी संबंधित अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत लाभास पात्र राहील. शासन निर्णय दिनांक २६ डिसेंबर २०२४ अन्वये सदर योजना तालुका स्तरापर्यंत लागू करण्यात आलेली आहे.

सदर योजनेकरिता सन २०२६–२७ या आर्थिक वर्षाकरिता रुपये ३७५००.०० लक्ष इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. शासन निर्णय दिनांक १५ ऑक्टोबर २०२५ अन्वये निर्वाह भत्ता वजावट न करता लाभ देण्याबाबात निर्देश.

**१३. अनुदानित वसतिगृह (जुने लेखाशीर्ष २२२५०५३९ नविन लेखाशीर्ष २२२५ जी १६१/जुने लेखाशीर्ष २२२५०८८९ नविन लेखाशीर्ष २२२५ जी २४१).** — स्वेच्छा संस्थांनी चालविलेल्या वसतिगृहांना प्रत्येक मुलाला व मुलीला दरमहा रुपये २२०० याप्रमाणे १० महिन्यांसाठी निर्वाह भत्ता देण्यात येतो व तसेच पूर्णकालिक अधीक्षकांच्या स्वयंपाकी, मदतनीस व पहारेकरी यांच्या मानधनावर आणि इमारतींच्या भाड्यावर साहाय्यक अनुदान देण्यात येते. या संस्थांनी आपल्या इमारती स्वत:च्या बांधल्या तर त्यांनादेखील अनुदान देण्यात येते, स्वयंसेवी संस्थांच्या स्वत:च्या इमारती असतील, तर त्या इमारतींच्या दुरुस्तीसाठीही अनुदान देण्यात येते. अनुदानित मागासवर्गीयांच्या वसतिगृहांची महाराष्ट्र राज्यातील संख्या २०२५–२६ अखेर २३८८ आहे. सदर योजना जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचेमार्फत राबविण्यात येते. सदर योजनेखाली सन २०२६–२७ करिता रुपये ३६०८७.६५ लक्ष तरतूद करण्यात आली आहे.

**१४. बालवाड्या (जुने लेखाशीर्ष २२२५०५३९ नविन लेखाशीर्ष २२२५ जी १६१/जुने लेखाशीर्ष २२२५०८८९ नविन लेखाशीर्ष २२२५ जी २४१).** – स्वच्छतेचे धडे देण्याकरिता व शिक्षणाची आवड निर्माण करण्याकरिता ही योजना आहे. प्रत्येक बालवाडीत ५ वर्षांच्या आतील २० ते ४० मुलांना प्रवेश दिला जातो. अधीक्षिका व दाई यांचे वेतन, दूध व खाद्यपदार्थ यावर दरमहा रुपये १०० व घरभाडे दरमहा रुपये २५ यासारख्या मान्यताप्राप्त बाबींवर अनुज्ञेय खर्चाच्या ९० टक्के इतके साहाय्यक अनुदान देण्यात येते. राज्यात एकूण २३३ बालवाड्या आहेत. दिनांक २३ नोव्हेंबर १९९८ च्या शासन निर्णयानुसार बालवाडी शिक्षकांना जून १९९८ पासून रुपये ५०० दरमहा एकत्रित वेतन देण्यात येते. सदर बालवाड्या महिला व बाल कल्याणकडे हस्तांतरित करण्यात आलेली आहे.

**१५. अनुसूचित जातीच्या मुला–मुलींसाठी अनुदानित आश्रमशाळा (NN २१००२४).** — महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, मुंबई, शासन निर्णय क्रमांक अजाअ– १०९९/प्र. क्र. ३८९/मावक–२, दिनांक १९ मे १९९९ अन्वये विमुक्त जाती, भटक्या जमातींच्या आश्रमशाळांच्या धर्तीवर राज्यातील अनुसूचित जातींच्या मुला–मुलींसाठी स्वयंसेवी संस्थांमार्फत आश्रमशाळा योजना १९९७–९८ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्याचा निर्णय घेणेत आला आहे. प्रथमत: एकूण १० प्राथमिक व ९ माध्यमिक आश्रमशाळा या सोलापूर, लातूर, परभणी, बीड, उस्मानाबाद व नांदेड या जिल्ह्यांत उघडण्यात आलेल्या आहेत. सदर योजनेअंतर्गत शालेय व वसतिगृह कर्मचारी यांचे १०० टक्के वेतन अनुदान असून प्राथमिक आश्रमशाळेतील निवासी प्रत्येक विद्यार्थ्यास रुपये १५०० प्रमाणे दरमहा ११ महिन्यांकरिता व माध्यमिक आश्रमशाळेस १० महिन्यांकरिता परिपोषण अनुदान देण्यात येते.

(१) परिरक्षण अनुदान.

(२) वेतनेतर मान्य बाबींवरील अनुदान.

(३) इमारत भाडे व इमारत बांधकाम अनुदान व

(४) शासनाकडून मंजुरी देण्यात येईल अशी इतर अनुदाने.

शिक्षक व इतर कर्मचारीवर्गाचे वेतन व भत्ते, आकस्मिक खर्च, इमारतींचे भाडे, स्वयंपाक्यांचे वेतन, छात्रवासींना विद्यावेतन, भांडी खरेदी, गणवेश, अंथरूण–पांघरूण इत्यादी खर्चाचा या अनुदानात समावेश होतो. स्वयंसेवी संस्थांचे शाळांचे भाड्यापोटी सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रमाणित केलेल्या भाड्याचे ७५ टक्के रक्कम संस्थेस देण्यात येते. सदर योजनेकरिता सन २०२६–२७ या आर्थिक वर्षाकरिता रुपये ३५९९.०१ लक्ष इतकी तरतूद करण्यात आली आहे.

**१६. मागासवर्गीय मुला–मुलींच्या अनुदानित वसतिगृहाच्या इमारती (विस्तार) बांधकामासाठी अनुदान मंजूर करणे (बाबू जगजीवनराम छात्रावास योजना) (२२२५३७९९). –** सदर योजना सन १९७०–७१ पासून फक्त मुलींच्या वसतिगृहांकरिता लागू करण्यात आली होती. सदर योजना केंद्रपुरस्कृत असून या योजनेद्वारे अनुदानित वसतिगृहांच्या विस्तारित इमारत बांधकामासाठी अनुदान देण्यात येते. परंतु नवीन बांधकामासाठी अनुदान मिळण्याची तरतूद नाही. यामध्ये विद्यार्थांच्या राहण्यासाठी भोजनगृह, स्वयंपाकगृह, सर्वसामान्य सभागृह इत्यादी सोयी करण्यात येतात. केंद्र शासनाचे अर्धशासकीय पत्र क्रमांक १७०२०/१४/९४–एससीडी, दिनांक १६ डिसेंबर १९९८ पासून मागासवर्गीय मुला–मुलींच्या वसतिगृहांसाठी देण्यात येणाऱ्या केंद्रीय अनुदान नियमात सुधारणा केलेली सदर योजना मुला–मुलींच्या वसतिगृहांसाठी लागू करण्यात आली आहे. तसेच केंद्राच्या राज्य सार्वजनिक बांधकाम विभागाने जे दर प्रमाणित केलेले आहेत, त्या दोन्ही दरांमधील जे दर कमीत कमी असतील, त्या दरांप्रमाणे प्रस्तावित इमारतींच्या बांधकामाचे आराखडे व अंदाजपत्रक तयार करून जी रक्कम येईल त्या रकमेच्या ५० टक्के केंद्र शासन व ५० टक्के रक्कम राज्य शासन देईल. स्वेच्छा संस्थांना स्वत:चा हिस्सा म्हणून योजनेच्या एकूण मान्य अंदाजपत्रकाच्या किमतीच्या १० टक्के रक्कम स्वत: खर्च केली पाहिजे. हे अनुदान दोन हप्त्यांत दिले जाते. अनुदानाचा पहिला हप्ता मिळाल्यापासून दोन वर्षांत इमारत बांधून पूर्ण करणे हे बंधन घातलेले आहे. सन २०२६–२७ या आर्थिक वर्षाकरिता रुपये ०.०१ लक्ष एवढी तरतूद करण्यात आलेली आहे.

**१७. इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातींच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना. (NN २१००२२/२३) –** शासन निर्णय, क्रमांक ईबीसी–२००२/प्र. क्र. ११६/मावक–२, दिनांक २३ मे २००३ अन्वये मागासवर्गीय मुलींचे प्राथमिक शाळेतील गळतीचे प्रमाण कमी व्हावे यासाठी इयत्ता ५ वी ते ७ वी मधील मुलींना शिष्यवृत्ती देण्याची योजना शासन निर्णय, दिनांक १२ जानेवारी १९९६ अन्वये सन १९९५–९६ पासून सुरू करण्यात आली. ही बाब लक्षात घेऊन याच धर्तीवर इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातींच्या मुलींसाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली आहे. त्यानुसार दरमहा रुपये १०० याप्रमाणे १० महिन्यांसाठी शिष्यवृत्ती देण्यात येते. सदर योजनेकरिता सन २०२६–२७ या आर्थिक वर्षाकरिता रुपये ३६३.९१ इतकी तरतूद करण्यात आली आहे.

**१८. व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असलेल्या वसतिगृहांतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता (NN २१०००१) (२२२५०४१२). –** शासन निर्णय, क्रमांक बीसीएच–१०८५/७०९४/(९२)/बीसीडब्ल्यू–४, दिनांक २० जून १९८६, सुधारित क्रमांक ईबीसी – २००३/प्र. क्र. ३११ /मावक–२, दिनांक ९ जून २००३ अन्वये वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी इत्यादी व्यावसायिक अभ्यासक्रमातील महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातींमधील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती या योजनेअंतर्गत वसतिगृहांत राहणाऱ्या विद्यार्थ्यांना रुपये २३५ ते रुपये ७४० निर्वाह भत्ता दिला जातो. व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असणाऱ्या महाविद्यालयातील वसतिगृहात राहणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीद्वारे मिळणाऱ्या निर्वाह भत्त्यातून त्यांची व्यावसायिक पाठ्यक्रमाची पुस्तके, निवास, भोजन, स्टेशनरी, इत्यादी बाबींचा खर्च भागवावा लागतो. या निर्वाह भत्त्यातून व्यावसायिक पाठ्यक्रमाची पुस्तके, निवास, भोजन, स्टेशनरी, इत्यादी बाबींचा खर्च ते भागवू शकत नाहीत. पर्यायाने शिष्यवृत्तीतून मिळणाऱ्या निर्वाह भत्त्यावर संपूर्ण अभ्यासक्रम पूर्ण करणे विद्यार्थ्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे शक्य होत नाही, म्हणून जे विद्यार्थी व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असणाऱ्या महाविद्यालयाच्या वसतिगृहात राहतात तसेच शासकीय वसतिगृहाच्या बाहेर राहतात, अशा विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्तीच्या व्यतिरिक्त पूर्वी देण्यात येत असलेल्या रुपये १०० दरमहाच्या दरात वाढ करण्यात येऊन

अभ्यासक्रमनिहाय हे दर कमीत कमी रुपये ५०० ते जास्तीत जास्त रुपये १,००० पर्यंत सुधारित करण्यात आले आहेत. भारत सरकार शिष्यवृत्ती या योजनेस रुपये २,५०,००० उत्पन्नांची मर्यादा आहे, तीच मर्यादा या योजनेस लागू आहे. सदर योजनेखाली सन २०२६–२७ करिता रुपये ३५०.०३ लक्ष तरतूद करण्यात आली आहे. सदर योजना सन २०१८– १९ पासून महाडिबीटी पोर्टलद्वारे राबविण्यात येते.

**व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असणाऱ्या वसतिगृहात राहणाऱ्या अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन**

| क्रमांक | अभ्यासक्रमाचे नाव | निर्वाह भत्त्याचा प्रतिमहा दर | कालावधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| **(अ)**<br>१ | **चार ते पाच वर्षांचे अभ्यासक्रम –**<br>वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी, पशुवैद्यकीय, वास्तुशास्त्र इ. | रुपये ७०० | १० महिने | रुपये ७,००० |
| **(ब)**<br>१ | **दोन ते तीन वर्षांचे अभ्यासक्रम–**<br>अभियांत्रिकी पदविका, एम. बी. ए., एम. एस. डब्ल्यू. इ. | रुपये ५०० | १० महिने | रुपये ५,००० |
| **(क)**<br>१ | **दोन वर्षे किंवा त्यापेक्षा कमी कालावधीचे अभ्यासक्रम–**<br>बी. एड., डी. एड. इ. | रुपये ५०० | १० महिने | रुपये ५,००० |

**व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न असणाऱ्या वसतिगृहाच्या व शासकीय वसतिगृहाच्या बाहेर राहणाऱ्या परंतु वसतिगृहात प्रवेश मिळण्यास पात्र असणाऱ्या अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन**

| क्रमांक | अभ्यासक्रमाचे नाव | निर्वाह भत्त्याचा प्रतिमहा दर | कालावधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| **(अ)**<br>१ | **चार ते पाच वर्षांचे अभ्यासक्रम –**<br>वैद्यकीय, अभियांत्रिकी, कृषी, पशुवैद्यकीय, वास्तुशास्त्र इ. | रुपये १,००० | १० महिने | रुपये १०,००० |
| **(ब)**<br>१ | **दोन ते तीन वर्षांचे अभ्यासक्रम–**<br>अभियांत्रिकी पदविका, एम. बी. ए., एम. एस. डब्ल्यू. इ. | रुपये ७०० | १० महिने | रुपये ७,००० |
| **(क)**<br>१ | **दोन वर्षे किंवा त्यापेक्षा कमी कालावधीचे अभ्यासक्रम–**<br>बी. एड., डी. एड. इ. | रुपये ५०० | १० महिने | रुपये ५,००० |

**१९. इयत्ता १० वी व १२ वी परीक्षेत विशेष उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या अनुसूचित जाती मुला–मुलींना राजर्षी छत्रपती शाहूमहाराज गुणवत्ता पुरस्कार प्रदान करणे (२२२५३२६२).** — शासन निर्णय, क्रमांक ईबीसी – २००३/प्र. क्र. ११५/मावक– २, दिनांक ११ जून २००३; क्रमांक ईबीसी – २००३/प्र. क्र. ११५/मावक–२, दिनांक २१ जुलै २००३, माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळाच्या इयत्ता १० वी व १२ वीच्या परीक्षेत सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून प्रथम येणाऱ्या अनुसूचित जाती, विद्यार्थ्यांना विशेष पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यासाठी ही योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे. गुणवत्ता पुरस्कार हा दरवर्षी २६ जून रोजी समारंभपूर्वक वितरित करण्यात येतो. विद्यार्थी अनुसूचित जातीचा असावा, तसेच जिल्ह्यात, तालुक्यात व विद्यालय/महाविद्यालयामधून सर्वसाधारण विद्यार्थ्यांमधून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांनाही पुरस्कार दिले जातात. सदर योजनेखाली सन २०२६–२७ करिता या योजनेखाली रुपये २००.०० लक्ष तरतूद करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | प्रत्येक विभागीय बोर्डात प्रथम आल्यास आल्यास. | रुपये १,००,००० रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |
| २. | प्रत्येक विभागीय परीक्षा मंडळाच्या गुणवत्ता यादीत आल्यास | रुपये ५०,००० रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |
| ३. | प्रत्येक जिल्ह्यात प्रथम आल्यास | रुपये २५,००० रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |
| ४. | प्रत्येक तालुक्यात प्रथम आल्यास | रुपये १०,००० रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |
| ५. | प्रत्येक माध्यमिक विद्यालयात व कनिष्ठ महाविद्यालयांमधून प्रथम आल्यास. | रुपये ५,००० रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र |

**२०. इयत्ता १० वी च्या परीक्षेत विशेष प्रावीण्य मिळवून इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जातींच्या मुला– मुलींना राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदान करणे (२२२५३८१४). —** शासन निर्णय क्रमांक ईबीसी – २००३/ प्र. क्र. ११५/मावक–२, दिनांक ११ जून २००३ अन्वये अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारावा व त्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ व्हावी, तसेच सर्वसाधारण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक स्पर्धेमध्ये ते टिकून रहावेत यासाठी गुणवंत विद्यार्थ्यांना सक्षम करण्याच्यादृष्टीने ही योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. यासाठी इयत्ता १० वी मध्ये ७५ टक्के व त्यापेक्षा जास्त गुण मिळवून इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या मुला–मुलींसाठी ही योजना लागू करण्यात आली आहे. ही शिष्यवृत्ती योजना इयत्ता ११ वी व १२ वी मध्ये शिकणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयातील अनुसूचित जातीच्या मुला– मुलींसाठी आहे. विद्यार्थ्यांना रुपये ३०० दरमहा १० महिन्यांचे कालावधीसाठी शिष्यवृत्ती देण्यात येते. सदर योजना सन २०१८–१९ पासून महाडिबीटी पोर्टलद्वारे राबविण्यात येते. सदर योजनेखाली सन २०२६–२७ करिता रुपये ८००.०० लक्ष तरतूद करण्यात आली आहे.

**२१. राज्यातील १०० अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना देशातील शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना (२२२५–३८२३). —** अनुसूचित जातीच्या (नवबौद्धांसहित) विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे कौशल्य व ज्ञान उपलब्ध व्हावे व त्यांची विविध क्षेत्रांत होणाऱ्या स्पर्धात्मक युगासाठी जडण–घडण व्हावी याकरिता देशातील उत्तमोत्तम शैक्षणिक संस्थांमध्ये मोफत उच्च शिक्षण घेण्यासाठी राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना शासन निर्णय क्रमांक ईबीसी–२००३/प्र.क्र.३२३/मावक–२, दिनांक ११ जून २००३ अन्वये लागू करण्यात आली आहे. या योजनेच्या नियमावलीत दिनांक ३१ ऑगस्ट २००९ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आली आहे. विभागीय परीक्षा मंडळाच्या संख्येत वाढ झालेली आहे. राज्यातील सर्व विभागांतील विद्यार्थ्यांना समान संधी देण्याच्या उद्देशाने प्रत्येक नऊ परीक्षा मंडळास प्रत्येक पदवीकरिता ८ विद्यार्थी असे एकूण ७२ विद्यार्थी, प्रत्येक नऊ परीक्षा मंडळास प्रत्येक ९ डिप्लोमाधारक विद्यार्थ्यांकरिता १ असे एकूण ९ विद्यार्थी, पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदविका विद्यार्थ्यांकरिता १८ व पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदविका (राज्यस्तर) १ असे एकूण १०० विद्यार्थ्यांची नियम व अटीनुसार गुणानुक्रमे निवड करून शिक्षण फी, परीक्षा फी, नोंदणी फी, ग्रंथालय, संगणक वसतिगृहे, भोजन, पुस्तके व इतर अनुषंगिक खर्च शिष्यवृत्ती स्वरूपात देण्यात येतो आणि योजनेच्या काही निकषांत बदल करणे आवश्यक असल्याने या योजनेच्या नियमावलीमध्ये शासन निर्णय क्रमांक ईबीसी–२०१७/प्र.क्र.४०२/शिक्षण –१, दिनांक ८ नोव्हेंबर २०१७ व शासन शुद्धिपत्रक क्रमांक ईबीसी–२०१७/प्र.क्र.४०२/शिक्षण– १, दिनांक १९ मार्च २०१८ अन्वये सुधारित केलेल्या नियमानुसार प्रत्येक वर्षी राज्यातील अनुसूचित जातीच्या (नवबौद्धांसहित) १०० विद्यार्थ्यांना देशातील भारत सरकार मुनष्यबळ विकास मंत्रालयाच्या http://mhrd.gov.in/institutions या संकेतस्थळावरील मान्यताप्राप्त AIIMS, IIM, IIT, IIITS, NIT, IISc and IISER, Institution of National Importance and Other Colleges तसेच शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट ''ब'' मध्ये नमूद शैक्षणिक संस्थांच्या इतर शाखा/उपशाखा असल्यास तसेच भविष्यात सदर शैक्षणिक संस्थांच्या इतर शाखा/उपशाखा निर्माण झाल्यास त्यामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनादेखील सदरहू योजना लागू राहील. या नामांकित संस्थांमधील पदवी/पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदविका (आय. आय. टी. मधील प्रीपरेटरी कोर्स वगळून) पूर्णवेळ अभ्यासक्रमांसाठी राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदान करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. सदर योजनेखाली सन २०२६–२७ करिता रुपये ६००.०० लक्ष तरतूद करण्यात आली आहे.

**२२. अनुसूचित जातीच्या मुला–मुलींना परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी राजर्षी शाहू महाराज परदेश शिष्यवृत्ती योजना (२२२५३८३२). —**

**योजनेचा उद्देश –** अनुसूचित जातीच्या मुलामुलींना आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणासाठी परदेशात नामांकित विद्यापीठामध्ये

प्रवेश घेता येत नाही. विद्यार्थ्याची गुणवत्ता असुनही केवळ आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागते. म्हणून शासनाने सदर योजना सन २००३–०४ पासून सुरु केलेली आहे. या योजनेंतर्गत प्रतिवर्षी ७५ विदयार्थ्यांना लाभ देण्यात येतो.

**शासन निर्णय –** सन २०१७–१८ पासुन शासन निर्णय दिनांक २७ जून, २०१७ व शासन शुध्दीपत्रक दि. १ जुलै, २०१७ तसेच दि. ३० जुन, २०१८, दि. २४ सप्टेंबर २०२०, दि. १० मार्च २०२१.

**सुधारित शासन निर्णय –** सर्वंकष धोरण शा. नि.दि.३०.१०.२०२३ शासन शुध्दीपत्रक ०९.११.२०२३, नियोजन विभागाचा शा. नि. दि. २०.०७.२०२३ व २५.०७.२०२४ अन्वये सुधारित नियमावली तयार करण्यात आलेली आहे.

**अभ्यासक्रमनिहाय जागा विभागणी–**

| शाखा | अभियांत्रिकी | वास्तुकला शास्त्र | व्यवस्थापन | विज्ञान | वाणिज्य/ अर्थशास्त्र | कला | विधी | औषध निर्माण शास्त्र | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदव्युत्तर PG | २० | ४ | २ | १० | ४ | ४ | ४ | २ | ५० |
| डॉक्टरेट PhD | ५ | २ | १ | ५ | ५ | ५ | १ | १ | २५ |
| एकुण | २५ | ६ | ३ | १५ | ९ | ९ | ५ | ३ | ७५ |

**पात्रता/अटी व शर्ती :–**

- विद्यार्थी अनुसूचित जाती / नवबौध्द घटकातील असावा.
- विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा.
- परदेशातील शिक्षण संस्था ही जागतीक क्रमवारीत (QS World University Rank) २०० च्या आत असावी.
- विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाखापेक्षा जास्त नसावे.
- पदव्यत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी पदवी परिक्षेत व पीएचडी अभ्यासक्रमासाठी पदव्युत्तर परिक्षेत किमान ५५% गुण असणे आवश्यक.
- पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ३५ वर्षे व पीएचडीसाठी ४० वर्षे ही कमाल वयोमर्यादा असेल.
- पदवी किंवा समकक्ष अभ्यासक्रमातील विदयार्थ्यांना सदर योजनेचा लाभ मिळणार नाही.
- एकाच कुटुंबातील कमाल पात्रता धारक–

अ.परदेश शिष्यवृत्ती योजनेचा लाभ एका विदयार्थ्यास फक्त एकदाच घेता येईल. मात्र, या योजनेअंतर्गत पदव्युत्तर पदवी चा अभ्यास सुरु असतांनाच त्या विदयार्थ्यास पीएचडी साठी शासन निर्णयात अंतभूत विषयांत दर्जावाढ करण्याची संधी मिळाल्यास सदर विदयार्थी याच योजनेंतर्गत पुढील अभ्यासक्रमासाठी लाभ घेण्यास पात्र असेल. त्यासाठी विदयार्थ्याने निवड समिती/ शासनास रितसर अर्ज करुन मान्यता घेणे बंधनकारक राहील. अशा प्रकरणांत संबंधित शैक्षणिक संस्थेची जागतिक क्रमवारी QSWR त्यावेळी लागू असलेल्या शासन निर्णयाच्या मर्यादेत असणे आवश्यक आहे. मात्र अशा प्रकरणात विदयार्थ्यास मिळणारा एकुण लाभाचा कालावधी त्यावेळी लागू असलेल्या शासन निर्णयाच्या मर्यादेतच दिला जाईल.

आ. एकाच कुटुंबातील जास्तीत जास्त दोन मुलांना परदेश शिष्यवृत्तीचा लाभ देता येईल त्यापेक्षा जास्त मुलांना परदेश शिष्यवृत्तीचा लाभ लागू राहणार नाही.

इ. एका वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेत एका कुटुंबातील दोन पाल्याचा समावेश असल्यास प्रवेश प्रक्रियेच्या अंतिम फेरीत जागा रिक्त राहील्यास एका कुटुंबातील दुसऱ्या पाल्यास लाभ देण्यात येईल.

**प्रवेशित विद्यार्थ्यांना मिळणारा लाभ –**

या योजनेअंतर्गत परदेशातील विदयापीठाची संपूर्ण शिक्षण फी, निर्वाह भत्ता, विमान प्रवास व पुस्तके व इतर खर्चासाठी ठराविक मर्यादेत अनुज्ञेय रक्कम याप्रमाणे विदयार्थ्यांना लाभ दिला जातो. सदरील लाभ हा केंद्र शासनाचे National Overseas

Scholarship योजनेत नमुद अटी व शर्ती प्रमाणे मंजुर करण्यात येतो. तसेच केंद्र शासनाच्या नॅशनल ओव्हरसीज शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत लागू करण्यात आलेली इतर फी, आरोग्य विमा शुल्क देण्यात येतो तो खालीलप्रमाणे आहे–

| अ. क्र. | लाभाचा तपशिल | यु.के. साठी शिष्यवृत्ती | अमेरिका व इतर देशांसाठी शिष्यवृत्ती |
|---|---|---|---|
| १ | शिक्षण फी | विद्यापीठाच्या फी स्ट्रक्चर प्रमाणे संपुर्ण खर्च | |
| २ | Admissible Residential/ Accommodation, Food and other living expenses. | Up to limit GBP £ 9,900 | Up to limit USD 15,400 |
| ३ | पुस्तके व इतर आकस्मिक खर्च | Up to limit GBP £ 1,100 | Up to limit USD 1,500 |
| ४ | आरोग्य विमा शुल्क | आरोग्य विमा खर्च | |
| ५ | विमान प्रवास तिकीट खर्चाची रक्कम | जातांना व शिक्षण पुर्ण करुन भारतात परतल्यानंतर एकदाच देय | |

**२३. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून अनुसूचित जातीच्या उमेदवारांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्याची योजना (मागेल त्याला व्यावसायिक प्रशिक्षण) (२२२५३२५१/२२२५जी१४३). —** शासन निर्णय क्रमांक ईबीसी – २००३/प्र. क्र. १८८ /मावक–२, दिनांक ४ जुलै २००३ अन्वये देशात औद्योगिक व आर्थिक उदारीकरणाचे धोरण स्वीकारल्यामुळे राष्ट्रीय उद्योग व खाजगी उद्योगांमध्ये मंदीची लाट आलेली आहे. त्यामुळे उद्योग क्षेत्रातील मनुष्यबळाची गरज अत्यंत कमी झालेली आहे. याचा परिणाम म्हणून समाजातील बेरोजगार उमेदवारांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात भर पडलेली असून, त्यामध्ये एस. एस. सी. उत्तीर्ण/अनुत्तीर्ण व आर्थिक दुर्बलतेमुळे पुढील कुठलेही शिक्षण न घेऊ शकलेले बेरोजगार यांचा समावेश आहे. राज्यातील अल्पशिक्षित अनुसूचित जातीमधील उमेदवारांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये उपलब्ध असलेल्या प्रशिक्षण सुविधांचा व साधनसामग्रीचा यथायोग्य वापर करून एक आठवडा ते दोन महिनेपर्यंतच्या अल्प कालावधीचे प्रशिक्षण देऊन या प्रशिक्षित उमेदवारांना स्वयंरोजगार मिळवून देण्यासाठी तसेच शासकीय वसतिगृहातील गट–क व गट–ड कर्मचारी व अनुदानित वसतिगृहातील अधीक्षक यांना प्रशिक्षण देण्यासाठी ही योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे. सदर योजनेखाली सन २०२६–२७ करिता रुपये ०.०० लक्ष तरतूद करण्यात आली आहे.

**२४. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील युवकांसाठी सैन्य व पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण सुरू करणे (२२२५३६७२/२२२५जी११६). —** अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील बेरोजगारांची संख्या जास्त असून सैन्य व पोलीस भरतीसाठी प्रशिक्षणाचा अभाव असल्यामुळे, बऱ्याच वेळेस ते सक्षम असतानादेखील त्यांना संधी मिळत नाही, ही बाब विचाराधीन घेऊन शासन निर्णय क्रमांक ईबीसी–२००५/प्र. क्र. ७८/मावक–२, दिनांक ८ फेब्रुवारी २००६ अन्वये अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील युवकांसाठी सैन्य व पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहे. सदर प्रशिक्षण तीन महिन्यांचे असून या कालावधीत धावणे, उंच उडी, लांब उडी, रायफल फायरिंग इत्यादीबाबत शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देण्यात येईल. तीन महिन्यांच्या निवासी प्रशिक्षणासाठी प्रती प्रशिक्षणार्थी रुपये ८,५०० इतका खर्च प्रत्येक उमेदवारासाठी संस्थाचालकांना देण्यात येते. सदर योजनेखाली सन २०२६–२७ करिता रुपये ०.०० लक्ष तरतूद करण्यात आली आहे.

**२५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्रावीण्य पुरस्कार योजना (२२२५३२४२/२२२५जी४३९). —** सामाजिक न्याय विभागांतर्गत अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग जाती कल्याण व शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या अपंग कल्याणकारी विविध शैक्षणिक संस्थांमार्फत (अनुदानित/शासकीय संस्था) शैक्षणिक उपक्रम राबविले जातात. या शैक्षणिक कार्यात उत्तरोत्तर प्रगती व्हावी, जास्तीत जास्त व परिणामकारक चांगले शैक्षणिक कार्य करणाऱ्या शैक्षणिक संस्था (अनुदानित/शासकीय संस्था) अपंग संस्था यांनी अधिक जोमाने काम करण्याच्यादृष्टीने शासनाने सदर पुरस्कार योजना सन २००३ मध्ये सुरू केली आहे. या पुरस्कारासाठी विभागात कार्यरत असलेल्या, शैक्षणिक कार्य पार पाडणाऱ्या खालील प्रवर्गाच्या संस्थांतून प्रत्येकी ३ सर्वोत्तम संस्थांची निवड करण्यात येईल. सदर योजनेखाली सन २०२६–२७ करिता रुपये ५०.०० लक्ष तरतूद करण्यात आली आहे.

(अ) मागासवर्गीय मुला–मुलींसाठी शासकीय वसतिगृहे

(ब) मागासवर्गीय मुला–मुलींसाठी अनुदानित वसतिगृहे

(क) शासकीय अपंग कल्याण संस्था, अनुदानित अपंग कल्याण संस्था

(ड) विमुक्त जाती, भटक्या जमाती आश्रमशाळा/अनुसूचित जातीच्या आश्रमशाळा

संस्थांना कामकाजाच्या वर्गीकरणाच्या आधारे संपूर्ण राज्यात उत्कृष्ट ठरणाऱ्या शासकीय/अनुदानित संस्थांना देण्यात येणाऱ्या पारितोषिकांचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.

(१) प्रथम पारितोषिक .. रुपये ५,००,०००

(२) द्वितीय पारितोषिक .. रुपये ३,००,०००

(३) तृतीय पारितोषिक .. रुपये २,००,०००

वरीलप्रमाणे ४ प्रवर्गांकरिता एकूण १२ पारितोषिके.

महसूली विभागीय स्तरावर तसेच विभागीय स्तरावर वर्गीकरण करण्यात आलेल्या वरील ४ प्रवर्गांच्या प्रत्येकी एका उत्कृष्ट शासकीय/अनुदानित संस्थेस रुपये १ लाखाचे पारितोषिक याप्रमाणे एकूण १८ पारितोषिके, असे एकूण २१ पारीतोषिके देण्यात येतात.

**२६. (अ) अनुसूचित जातीच्या मुलामुलींसाठी विभागीय स्तरावर औद्योगिक प्रशिक्षण संस्था बांधणे (४२२५०४७२). —** औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेशाकरिता अनुसूचित जाती व नवबौद्ध उमेदवारांकरिता १३ टक्के जागा राखीव असतात. तथापि, प्रवेशासाठी मोठ्या प्रमाणात अर्ज प्राप्त होतात. त्यामुळे या प्रवर्गातील असंख्य उमेदवार प्रवेशापासून वंचित राहतात. त्यामुळे अनुसूचित जातीचे विद्यार्थी तांत्रिक अभ्यासक्रमापासून वंचित राहतात. या बाबीचा महाराष्ट्र शासनाने गांभीर्याने विचार करून प्रत्येक विभागीय ठिकाणी एक अशा ७ निवासी औद्योगिक प्रशिक्षण संस्था अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत सुरू करण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेतला आहे. ही संस्था संचालक (प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचेमार्फत राबविली जाणार आहे. यासाठी तरतूद सामाजिक न्याय विभागामार्फत देण्यात येत आहे. सद्यःस्थितीत नागपूर, अमरावती, नाशिक, औरंगाबाद, मुंबई या विभागीय स्तरावर इमारत बांधून औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्यात आलेल्या आहेत. सदर योजनेखाली सन २०२६–२७ वर्षाकरिता रुपये २५००.०० लक्ष तरतूद करण्यात आली आहे.

(१) मेकॅनिकल मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स
(२) ऑपरेटर ॲडव्हान्स मशिन टूल्स
(३) मेकॅनिकल तांत्रिक मोटार गाडी
(४) मेकॅनिकल कॉम्प्युटर हार्डवेअर
(५) फॅशन टेक्नॉलॉजी (मुलींकरिता)
(६) इंटिरिअर डेकोरेशन ॲन्ड डिझायनिंग
(७) डेन्टल लॅब टेक्निशियन
(८) हेल्थ सॅनिटरी इन्स्पेक्टर
(९) क्रॉफ्ट्समन फूड प्रॉडक्शन (जनरल)
(१०) नेटवर्क टेक्निशियन
(११) डाटा–एन्ट्री ऑपरेटर (मुलींकरिता)
(१२) ड्रायव्हर–कम– मेकॅनिक

**(ब) अनुसूचित जातीच्या मुलामुलींसाठी औद्योगिक प्रशिक्षण सुरू करणे (२२२५४१०४). —** विभागीय स्तरावर नवीन औद्योगिक संस्थेमध्ये प्रशासकीय व देखभाल नियंत्रण संचालक, व्यवसाय व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेमार्फत करण्यात येते त्यासाठी प्रशासकीय व देखभाल बाबींवर दरवर्षी अनुदान सामाजिक न्याय विभागामार्फत देण्यात येते सन २०२६–२७ वर्षाकरिता रुपये १५००.०० लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे.

**२७. अनुसूचित जातीच्या मुलामुलींकरिता नवीन शासकीय निवासी शाळा सुरू करणे (२२२५ डी–११७). —** शासन निर्णय, क्रमांक अजाशा–२००५/प्र.क्र.४३२/मावक–४, दिनांक १ जुन २००६ अन्वये शासनाने आर्थिक परिस्थितीमुळे अनुसूचित जाती/नवबौद्ध मुला–मुलींना प्राथमिक/माध्यमिक शिक्षण घेता येत नाही अशा मुला–मुलींना शिक्षणाची सोय व्हावी म्हणून प्रत्येक तालुक्यात एक शासकीय निवासी शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. यापैकी ९३ निवासी शाळा सुरू झाल्या आहेत. सदर निवासी शाळेमध्ये इयत्ता ६ वी ते १० वी पर्यंतच्या अनुसूचित जाती व नवबौद्ध मुला–मुलींना प्रवेश दिला जाणार आहे. निवासी शाळेत मोफत भोजन, निवास व इतर आवश्यक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. सदर योजनेसाठी सन २०२६–२७ या वर्षाकरिता रुपये ४००००.०० लक्ष इतकी तरतूद उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**२८. इयत्ता ९ वी व १० वी मध्ये शिकत असणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना (२२२५ डी ६५४). —** सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाने शासन निर्णय क्रमांक ईबीसी–२०१२/प्र. क्र. १५१/शिक्षण–१, दिनांक ४ ऑक्टोबर २०१३ नुसार सन २०१३–१४ या शैक्षणिक वर्षापासून सदर योजना लागू करण्यास मान्यता दिलेली आहे.

१. सदर योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती व इतर अनुदानाचे दर खालीलप्रमाणे राहतील.

(१० महिन्यांसाठी)

| अ. क्र. | योजना | वसतिगृहात न राहणारे (अनिवासी) | वसतिगृहात राहणारे (निवासी) |
|---|---|---|---|
| १. | शिष्यवृत्तीचा दर (प्रतिमाह) | रुपये ३५०/– | रुपये ७००/– |

२. वरीलप्रमाणे शिष्यवृत्तीशिवाय विनाअनुदानित शाळेतील अपंग विद्यार्थ्यांकरिता १०% अतिरिक्त भत्ता देण्यात येतो.

३. सदर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत अटी व शर्ती पुढीलप्रमाणे राहतील.

१. सदर योजना शासकीय मान्यताप्राप्त शाळेत शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांस लागू राहील.

२. सदर योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांच्या पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा रुपये २.५० लक्ष.

३. यामध्ये विद्यार्थ्यांच्या किमान गुणांची अट नाही.

४. सदर योजनेचा लाभ केंद्राच्या इतर माध्यमिकपूर्व शिष्यवृत्तीच्या लाभार्थ्यांना लागू राहणार.

५. सदर योजनेचा लाभ केंद्राच्या इतर माध्यमिकपूर्व शिष्यवृत्तीच्या लाभार्थ्यांना लागू राहणार नाही.

६. राज्य शासनाची सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती ही योजना अनुसूचित जाती प्रवर्गातील इयत्ता ८ वी ते १० वी च्या सर्व मुलींसाठी सध्या सुरू आहे. यामध्ये पालकांच्या उत्पन्नाची मर्यादा नाही. मात्र केंद्र शासनाच्या इयत्ता ९ वी व १० वी मध्ये शिकत असणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजनेमध्ये रुपये २.०० लक्ष इतके वार्षिक उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या इयत्ता ९ वी व १० वीच्या मुलींचा समावेश होणार आहे. त्यामुळे अनुसूचित जाती प्रवर्गातील इयत्ता ८ वीच्या मुली आणि रुपये २.५० लाखांपेक्षा जास्त उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या इयत्ता ९ वी व १० वीच्या मुलींकरिता सध्याची सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना यापुढेही चालू राहील. मात्र एकाच लाभार्थ्यास दोन्ही योजनांचा लाभ घेता येणार नाही.

सदर योजनेकरिता सन २०२६–२७ या वर्षाकरिता रुपये ०.०२ लाख इतकी तरतूद उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## (दोन) आर्थिक उन्नती

१. **अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी मोटार वाहन चालक प्रशिक्षण योजना (जुने लेखाशीर्ष २२२५ सी ९५६ नविन लेखाशीर्ष २२२५ जी १३४).** — मोटार वाहन प्रशिक्षण ही योजना १९७२ पासून लागू करण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत सुरुवातीस महाराष्ट्र राज्य महामार्ग परिवहन महामंडळ यांच्यामार्फत मोटर वाहन चालक प्रशिक्षण देण्यात येत होते. तथापि महाराष्ट्र राज्य महामार्ग परिवहन महामंडळाने प्रशिक्षण देण्यास असमर्थता दर्शविल्यानंतर अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील बेरोजगार युवकानां मोफत मोटार वाहन चालविण्याचे प्रशिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी करणे व त्यांचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावणे. मागासवर्गीयांना व्यवसायिक संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने राज्यात मोटर वाहन चालकाचे प्रशिक्षण मान्यता प्राप्त संस्थांकडून देण्याची योजना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निणर्य, दिनांक ४ फेब्रुवारी २००८ नुसार कार्यान्वित करण्यात आली. मोटर वाहन चालक प्रशिक्षण देणाऱ्या संबंधीत संस्थेचा करारनामा दिनांक ४ फेब्रुवारी २०१५ रोजी संपुष्टात आल्याने सन २०१५–१६ पासून सदरची योजना बंद होती. तद्नंतर सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक मोवाप्र–२०१७/प्र.क्र. १३५/शिक्षण, दिनांक २३ फेब्रुवारी २०१८ नुसार सुधारीत नियमावलीप्रमाणे सुरू करण्याची कार्यवाही सुरू आहे.

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील उमेदवारांना खाजगी ड्रायव्हिंग स्कूलमध्ये वाहन चालकाचे मोफत प्रशिक्षण देण्यात येते. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर प्रशिक्षणार्थ्यास प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत परीक्षा घेऊन वाहन चालविण्याचा परवाना दिला जातो. प्रशिक्षण पूर्ण होऊन संबंधितांना परवाना मिळाल्यानंतर शासनाने विहित केलेल्या शुल्काची प्रतिपूर्ती प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस अदा केली जाते. प्रशिक्षणार्थी उमेदवार हे मोटर वाहन परिवहन अधिनियम, तरतुदीनुसार वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, शारीरिक पात्रता, जातीचा दाखला इत्यादी अटींची पूर्तता करणारे असावेत.

सदर योजनेखाली सन २०२६–२७ वर्षाकरिता रुपये ०.०१ लक्ष तरतूद करण्यात आली आहे.

२. **गटई कामगारांना पत्र्यांचे स्टॉल देणे (२२२५२६२२).** — महाराष्ट्र राज्यामध्ये चामड्याच्या वस्तू व पादत्राणे दुरुस्ती करण्याच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर असलेल्या अनुसूचित जातीच्या गटई कामगारांना त्याच्या आर्थिक व सामाजिक उन्नती साधण्यासाठी १०० टक्के अनुदान तत्वावर पत्र्याचे स्टॉल व रुपये ५०००/– इतके रोख अनुदान देण्याच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शा.नि.क्र. गटई–२०२५/प्र.क्र.०५/शिक्षण–१(इ–१४४३६४३) दि. २८ जाने., २०२६ अन्वये मा. आयुक्त समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य पुणे. यांच्याकडे अमलबजावणीस्तव देण्यात आली आहे. सदर योजनेस जिल्हास्तरावर उत्तम प्रतिसाद मिळत आहे सदर योजनेकरिता २०२६–२७ या वर्षात रक्कम रु. १०००.०० लक्ष दरतूद करण्यात आलेली आहे.

३. **अनुसूचित जातीच्या सहकारी सूत गिरण्यांना दीर्घ मुदतीचे कर्ज (जुने लेखाशीर्ष ६२२५०२२२ नविन लेखाशीर्ष ६२२५१०५१).** — (१) राज्यातील अनुसूचित जातीच्या सहकारी सूत गिरण्यांना वित्तीय साहाय्य करण्यासाठी ही योजना सर्वप्रथम सन १९९८ मध्ये सुरू करण्यात आलेली आहे. सूत गिरणीचे प्रकल्प मूल्य रुपये ५३.०० कोटी किंवा प्रत्यक्ष प्रकल्प मूल्य यापैकी जे कमी असेल ते विचारात घेऊन या प्रकल्प मूल्यांच्या मर्यादित राहून दीर्घ मुदतीचे कर्ज सदर सूत गिरणींना मंजूर करण्यात येते. सभासदांनी जमा केलेल्या भागभांडवलाच्या ९ पट रक्कम भागभांडवल म्हणून वस्त्रोद्योग विभागामार्फत मंजूर करण्यात येते. प्रकल्प किमतीच्या ५ टक्के आणि कमीत कमी रुपये ८०.०० लाखांपर्यंत सभासद भागभांडवल गोळा केल्यास सदर गिरण्या कर्जाकरिता पात्र समजण्यात येतात. तसेच सभासदांचे भागभांडवल आणि वस्त्रोद्योग विभागाने मंजूर केलेले भागभांडवल असे एकूण जमा भागभांडवल विचारात घेऊन सामाजिक न्याय विभागामार्फत दीर्घ मुदतीचे कर्ज म्हणून कर्ज मंजूर करण्यात येते. म्हणजे हे वित्तीय साहाय्याचे सूत्र ५ टक्के + ४५ टक्के + ५० टक्के असे आहे. आतापर्यंत अकराव्या पंचवार्षिक योजनेअखेर समाविष्ट असलेल्या १० सूत गिरण्यांना रुपये १७,३२८.२९ लाख इतकी रक्कम दीर्घ मुदतीचे कर्ज म्हणून सामाजिक न्याय विभागामार्फत मंजूर करण्यात आलेली आहे.

(२) वस्त्रोद्योग विभागाने मंजूर केलेले ४५ टक्के भागभांडवल व सामाजिक न्याय विभागाने मंजूर केलेले ५० टक्के दीर्घ मुदतीचे कर्ज असे एकूण प्रकल्प मूल्याच्या ९५ टक्के निधी सूत गिरण्यांना अदा केल्यानंतर २ वर्षांनी कर्ज वसुलीस सुरुवात करण्यात येते. कर्जाची परतफेड ६ वर्षांच्या कालावधीत एकूण २४ समान त्रैमासिक हप्त्यात करण्यात येते. यातील पहिले १६ हप्ते मुद्दल रक्कम व शेवटचे ८ हप्ते व्याजाचे असतात. सूत गिरण्यांना मंजूर करण्यात आलेल्या कर्जाची धनाकर्ष, सूत गिरणीचे अध्यक्ष व आयुक्त, समाजकल्याण यांच्या संयुक्तिक खात्यामध्ये जमा करण्यात येतात व सदर कर्जाची रक्कम संयुक्तिक खात्यात जमा केल्याच्या दिनांकापासून व्याजाची आकारणी करण्यात येते. कर्जाची वसुली देय झाल्यानंतर थकित कर्ज वसूल करण्यासंदर्भात आयुक्त, समाजकल्याण यांच्याद्वारा संबंधित सूत गिरणीस ३–३ महिन्यांच्या मुदतीनंतर ३ वेळा मागणीपत्र पाठविण्यात येते व त्यानंतरही कर्ज वसुलीला नियमानुसार सूत गिरणीद्वारे प्रतिसाद मिळाला नाही तर ते प्रकरण थकित कर्जाच्या वसुलीबाबत संबंधित तहसीलदार यांच्याकडे सोपविण्यात

येते. व्याजाचा दर, दंडनीय व्याज इत्यादीबाबत वित्त विभागाने वेळोवेळी कळविल्याप्रमाणे राष्ट्रीय कृषी व औद्योगिक विकास बँक, नवी दिल्लीद्वारे निश्चित केल्याप्रमाणे राहील. सूत गिरणीचे संयुक्तिक खात्यात जमा झालेल्या रकमेवरील व्याज रक्कम लाभधारक सूत गिरणीस वापरण्यास परवानगी देण्यात येते. सदर व्याजावर शासनाचा हक्क राहत नाही. शासनाकडून जे दीर्घ मुदतीचे कर्ज दिले जाईल त्या कर्जाची आयुक्त, समाजकल्याण व गिरणीचे अध्यक्ष यांच्या संयुक्तिक खात्यातून रक्कम उचल मागताना गिरणीने प्रथम प्रस्ताव सादर करून संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडून रक्कम खर्च करण्यासाठी लेखी स्वरूपाची परवानगी घ्यावी व त्या परवानगीच्या आधारे आयुक्त, समाज कल्याण यांनी उचल मंजूर करावी आणि त्या बाबीकरिता रक्कम खर्च करून उपयोगिता प्रमाणपत्र संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडून घेण्यात यावे. कर्जाच्या रकमेचा विनियोग योग्य प्रकारे न झाल्याचे आढळल्यास किंवा अन्य गैरप्रकारामुळे कर्जाची रक्कम अनुज्ञेय नसल्याचे आढळल्यास, दिलेली रक्कम महसुली थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल. अशी सदर योजनेमध्ये तरतूद आहे. सदर योजनेखाली सन २०२६–२७ वर्षाकरिता रुपये १०,०००.०० लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे.

**४. अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थांना अर्थसाहाय्य करण्याची योजना (४२२५०४५२/जुने लेखाशीर्ष ६२२५०२५१ नविन लेखाशीर्ष ६२२५१०६९).** — शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष साहाय्य विभाग, क्रमांक मासाका–२००३/प्र.क्र. १९/ विघयो–२, दिनांक २७ फेब्रुवारी २००४ अन्वये सदर योजना सुरू करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णय दिनांक १३ एप्रिल २००४ आणि शासन निर्णय दिनांक १३ सप्टेंबर २००४ अन्वये ही योजना शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या १ ते ३२ अटी शर्तींनुसार राबविण्यात येत आहे.

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांमध्ये असलेले बेरोजगारीचे प्रमाण कमी करण्यासाठी सदर योजना सुरू करण्यात आलेली असून, या योजनेअंतर्गत सहकारी कायद्यानुसार स्थापन करण्यात आलेल्या अनुसूचित जातीच्या सहकारी संस्थेस कर्ज व भागभांडवल उपलब्ध करून देण्याची ही योजना आहे. यामध्ये संबंधित सहकारी संस्थेचा हिस्सा प्रकल्प रकमेच्या ५ टक्के, शासकीय भागभांडवल ३५ टक्के, कर्ज ३५ टक्के व वित्तीय संस्थेचे दीर्घ मुदतीचे कर्ज २५ टक्के अर्थपुरवठा करण्याची तरतूद आहे. या योजनेअंतर्गत प्रकल्पाची महत्तम एकूण किंमत ५ ते ७ कोटींपर्यंत ग्राह्य धरण्यात आलेली आहे.

या योजनेअंतर्गत यंत्रमाग सोसायट्या, निटिंग गारमेंट, कापड प्रक्रिया उद्योग, शेतीमाल प्रक्रिया उद्योग, साखर कारखाने खांडसरी कारखान्यात रूपांतरित करणे इत्यादी उद्योग अपेक्षित आहेत.

सन २०२६–२७ या आर्थिक वर्षासाठी खालीलप्रमाणे तरतूद प्रस्तावित आहे.

१. (४२२५०४५२) या लेखाशीर्षाखाली रक्कम रुपये ७५००.०० लाख

२. (जुने लेखाशीर्ष ६२२५०२५१ नविन लेखाशीर्ष ६२२५१०६९) या लेखाशीर्षाखाली रक्कम रुपये ७५००.०० लाख

**५. कर्मवीर दादासाहेब गायकवाड अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांचे सबळीकरण व स्वाभिमान योजना (२२२५३६१८/ जुने लेखाशीर्ष ६२२५०२३९ नविन लेखाशीर्ष ६२२५१०७८).** – शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष साहाय्य विभाग, क्रमांक विघयो – २००४, प्रक्र. १२५/विघयो–२, दिनांक २ जून २००४ अन्वये सदर योजना सुरू करण्यात आलेली आहे व दिनांक १ एप्रिल २००४ पासून सदरहू योजना लागू करण्यात आलेली आहे. सदर योजनेखाली सन २०२६–२७ वर्षाकरिता रुपये ४५००.०० लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे. सदर योजना शासन निर्णय दिनांक १४ ऑगस्ट २०१८ मधील अ.क्र. (३) नुसार १०० टक्के शासन अनुदानित करण्यात आली आहे.

(१) अनुसूचित जाती व नवबौद्धांकरिता शैक्षणिक सुविधा राज्य शासनाने उपलब्ध केल्यामुळे त्यांच्यामध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढत आहे. सध्याच्या उदात्तीकरणाच्या धोरणामुळे नोकऱ्या उपलब्ध होण्याचे प्रमाण कमी झालेले आहे. त्यामुळे सर्वसाधारण लोकांमध्ये आढळून येणारे सुशिक्षित बेरोजगारांचे प्रमाण अनुसूचित जाती व नवबौद्धांच्या लोकांमध्ये जास्त आढळते. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील दारिद्र्य रेषेखालील भूमिहीन शेतमजूर कुटुंबांना उदनिर्वाहाचे अन्यसाधन नसल्याने त्यांना रोजगार हमी किंवा खाजगी व्यक्तींकडे मजुरी करावी लागते. परिणामी त्यांच्या राहणीमानावर प्रतिकूल परिणाम होतो. म्हणून त्यांचे उत्पन्नाचे स्रोत वाढावे व त्यांच्या राहणीमानात बदल व्हावा याकरिता त्यांचे मजुरीवर असलेले अवलंबित्व कमी होऊन त्यांना कायमस्वरूपी उत्पन्नाचे साधन उपलब्ध होणेकरिता दोन एकर ओलिताखालील जमीन किंवा चार एकर कोरडवाहू जमीन उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्यासाठी १०० टक्के अनुदान स्वरूपात. निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय, शासन निर्णय क्रमांक जमीन– २०१५/प्र.क्र.६४/ अजाक, दिनांक १४ ऑगस्ट २०१८ अन्वये घेण्यात आलेला आहे.

(२) दारिद्र्यरेषेखालील भूमिहीन अनुसूचित जाती व नवबौद्धांना जी जमीन वाटप करावयाची आहे त्या जमिनीचे दर निश्चित करणे, खरेदी करणे तसेच लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

१. जिल्हाधिकारी .. अध्यक्ष

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद .. सदस्य

३. जिल्हा कृषी अधिकारी .. सदस्य

४. जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख .. सदस्य

५. सहनिबंधक, नोंदणी शुल्क व मूल्यांकन .. सदस्य

६. उपविभागीय अधिकारी (संबंधित तालुका) .. सदस्य

७. सहायक आयुक्त, समाजकल्याण .. सदस्य सचिव

उपरोक्त शासन निर्णयात नमूद १ ते १३ अटी शर्तीनुसार या योजनेअंतर्गत जमीन वाटप करण्यात येणार आहे. शासन निर्णय क्रमांक विघयो–२००५, प्र. क्र. १७/ विघयो–२, दिनांक १४ जानेवारी २००५ अन्वये या योजनेच्या नावात बदल केला असून या योजनेस आता **''कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजना''** असे नाव देण्यात आले आहे. सदर योजनेमध्ये जमिनीच्या उपलब्धतेअभावी आमूलाग्र सुधारणा करण्यासाठी शासनास प्रस्तावित करण्यात आले आहे.

शासन निर्णय क्रमांक जमीन– २०१५/प्र.क्र.६४/अजाक, दिनांक १४ ऑगस्ट २०१८ अन्वये सर्व बाबी विचारात घेऊन कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेची राज्यामध्ये प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय समितीस जमीन खरेदी करून लाभार्थ्यांना वितरण करणे या प्रक्रियेमध्ये साहाय्य करण्यासाठी प्रत्येक तालुका स्तरावर संबंधित तालुक्याचे महसुली उपविभागीय अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे ''उप समिती'' गठित करण्यात आली.

१. संबंधित उपविभागीय अधिकारी .. समिती प्रमुख

२. संबंधित तहसीलदार .. सदस्य

३. संबंधित तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख .. सदस्य

४. संबंधित तालुका कृषी अधिकारी .. सदस्य

५. संबंधित मंडळ अधिकारी .. सदस्य

६. संबंधित गावाचा तलाठी .. सदस्य

७. संबंधित गावाचा ग्रामसेवक .. सदस्य

८. सहायक आयुक्त, समाजकल्याण कार्यालयातील निरीक्षक .. सदस्य सचिव

**६. अनुसूचित जाती व नवबौद्ध शेतकऱ्यांना पॉवर टिलरचा किंवा मिनी ट्रॅक्टरचा पुरवठा करणेबाबत (२२२५ डी–३३१).** — शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष साहाय्य विभाग, क्रमांक विघयो – २००८/प्र.क्र. ३१०/ विघयो– १, दिनांक १४ फेब्रुवारी २००८ अन्वये सदर योजना सुरू करण्यात आलेली आहे. सदर योजनेची अंमलबजावणी सन २००७–२००८ पासून करण्यात आलेली आहे.

(१) सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांकरिता कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान व सबळीकरण योजना सन २००४–२००५ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत दारिद्र्यरेषेखालील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांना ५० टक्के अनुदान व ५० टक्के बिनव्याजी कर्ज या तत्त्वावर दोन एकर बागायती जमीन किंवा चार एकर कोरडवाहू जमिनीचे वाटप करण्यात येते. सन २००४–२००५ पासून जानेवारी २००८ पर्यंत एकूण २,९९९ लाभार्थ्यांना एकूण १०,५७५ एकर एवढी जमीन वाटप करण्यात आली आहे. या लाभार्थ्यांना जमीन कसण्यासाठी १३ प्रतिदिन रुपये २०० एवढा खर्च करणे आर्थिकदृष्ट्या शक्य नाही. अशा शेतकऱ्यांना तसेच अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांमधील इतर अल्पभूधारक शेतकऱ्यांना किफायतशीररीत्या शेती करण्यासाठी १०० टक्के अनुदानावर पॉवर टिलरचा पुरवठा करण्यात येत होता, तथापि, शासन निर्णय क्र. २०११/प्र. क्र. ४३९/ अजाक –१, दिनांक ६ डिसेंबर २०१२ अन्वये पॉवर ट्रिलर पुरवठा ही योजना बंद करण्यात आली असून त्याऐवजी बचत गटांना ९०% अनुदानावर ९ ते १८ अश्वशक्तीचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने याचा पुरवठा करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून अटी व शर्ती पुढीलप्रमाणे.

१. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या बचत गटातील सदस्य महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असावेत.

२. सदर बचत गटातील किमान ८०% सदस्य अनुसूचित जाती नवबौद्ध घटकातील असावेत.

३. मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांच्या खरेदीची कमाल मर्यादा रु. ३.५० लाख इतकी राहील व सदर बचत गटांनी वरील कमाल मर्यादेच्या १०% स्वहिस्सा भरल्यानंतर ९०% (कमाल रु. ३.१५ लाख) शासकिय अनुदान अनुज्ञेय राहील. सदर योजनेखाली सन २०२६–२७ या वर्षाकरिता रुपये ४५००.०० लक्ष तरतूद करण्यात आली आहे.

**७. केंद्र शासनाच्या स्टॅंड अप इंडिया योजनेत अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजाच्या घटकांकरिता मार्जिन मनी उपलब्ध करून देण्याबाबतची योजना (२२२५– एफ–३१६). —** शासन निर्णय, दिनांक ८ मार्च २०१९ अन्वये सदरची योजना सुरू करण्यात आली आहे. सदर योजनेची अंमलबजावणी २०२० – २१ पासून करण्यात येत आहे. सदरच्या योजनेतंर्गत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजाच्या घटकांकरिता नवउद्योजक यांना १० टक्के स्वहिस्सा भरणा केल्यानंतर व बँकेने अर्जदारास स्टॅंड अप इंडिया योजनेंतर्गत ७५ टक्के कर्ज मंजूर केल्यानंतर उर्वरित Front end subsidy १५ टक्के राज्य शासनामार्फत देण्यात येते. सन २०२६–२७ या आर्थिक वर्षात एकूण रक्कम रुपये १०००.०० लक्ष तरतूद प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

**८. ३ टक्के नावीन्यपूर्ण/वैशिष्ट्यपूर्ण योजना (NN२८०००१). —** राज्यातील जिल्ह्यांमध्ये विविधता असून प्रत्येक विभागाच्या/जिल्ह्याच्या समस्या व गरजा वेगवेगळ्या आहेत. सबब जिल्ह्याचा आराखडा तयार करताना नियमित योजनांबरोबरच त्या जिल्ह्याच्या भौतिक, सामाजिक व आर्थिक गरजा पूर्ण करण्यास वाव राहावा तसेच स्थानिक स्तरावर जिल्हा नियोजन समितीच्या सदस्यांना काही वैशिष्ट्यपूर्ण योजना राबविण्याची संकल्पना असल्यास त्या संबंधित यंत्रणेमार्फत राबविण्यास वाव असावा या उद्देशाने जिल्ह्याच्या एकूण अर्थसंकल्पीय निधीच्या ३ टक्के निधी खर्च करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सामाजिक न्याय विभागाचे शासन निर्णय दिनांक २२ मार्च २०१७ अन्वये सन २०१७–१८ पासून सदर योजना कार्यरत करण्यात आलेली आहे. सन २०२६–२७ मध्ये सदर योजनेकरिता रुपये ९०३०.०० लक्ष इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

**९. जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांच्या मूल्यमापन, संनियंत्रण व प्रभावी अंमलबजावणी–करिता प्राप्त नियतव्ययापैकी ०.५ टक्के निधी राखीव ठेवण्याबाबत (NN२८०००३). —** जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत अनुसूचित जाती घटक कार्यक्रमाच्या मूल्यमापन, संनियंत्रण व प्रभावी अंमलबजावणीकरिता जिल्हा वार्षिक योजनेतील अर्थसंकल्पीय निधीच्या ०.५ टक्के नियतव्यय मूल्यमापन, संनियंत्रण व डाटा एंट्रीसाठी जिल्ह्यांना खालील बाबींवर खर्च करण्यास मान्यता प्राप्त झाली आहे.

१. योजनेंतर्गत योजनांचे मूल्यमापन करून घेण्यासाठी अभियंते, लेखापाल, आर्किटेक्ट, स्वयंसेवी संस्था इत्यादीतज्ज्ञ व्यक्तींचे पॅनेल तयार करणे.

२. तज्ज्ञ व्यक्तींची निवड करणेसाठी निविदा/जाहिरातींचा खर्च.

३. जिल्ह्यामध्ये घेण्यात येणाऱ्या विविध बांधकामासाठी खाजगी आर्किटेक्चरकडून आराखडे तयार करून घेणे (टाईप प्लॅन) तयार करून घेणे (अशा टाईप) प्लानसाठी आवश्यक मोबदला घ्यावा व एकदा टाईप प्लॅन तयार केल्यानंतर विभागातील कर्मचाऱ्यांनी आवश्यकतेनुसार आराखडे तयार करावेत व त्यानुसार संनियंत्रण करावे.

४. काही विशिष्ट कामांसाठी सल्लागाराची नेमणूक करणे.

५. योजनांतर्गत योजनांची प्रसिध्दी/माहिती पुस्तिका तयार करणे /माहितीचे बोर्ड तयार करून ते जिल्हाधिकारी/तहसीलदार/जिल्हा परिषद/पंचायत समिती/नगरपालिका/सहायक आयुक्त इत्यादी कार्यालयात लावणे.

६. सहायक आयुक्त कार्यालयातील आवश्यक बाबींवर खर्च जसे साधनसामग्री इत्यादी (अनुज्ञेय रकमेच्या १० टक्के च्या मर्यादित).

७. सार्वजनिक संस्थांचे लेखा परीक्षण/लेखे तयार करून घेणे.

८. मूल्यमापन/क्षेत्र पाहणीकरिता वाहन इंधन खर्च.

९. बाह्यस्रोत कर्मचारी यांचेकडून डाटा एंट्री करणे (उदा. बीम्स प्रणालीवर आराखडा नोंदविणे MPSIMS वर मासिक खर्च व आराखडा नोंदविणे).

समाज कल्याण, आयुक्तालय हे सामजिक न्याय विभागाचे राज्यस्तरीय नियंत्रण कार्यालय आहे. राज्यातील सर्व सहायक आयुक्त, समाज कल्याण व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद या कार्यालयांमार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांचे

कार्यान्व हे समाज कल्याण आयुक्तालयामार्फत केले जाते. जिल्हा वार्षिक योजना अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत मूल्यमापन, संनियंत्रण कार्यान्वित होणेसाठी आयुक्त, समाज कल्याण यांचे स्तरावर उपसंचालक (सांख्यिकी) हे कार्यरत आहे. सदर योजनेखाली सन २०२६–२७ वर्षाकरिता रुपये १५००.०० लक्ष तरतूद करण्यात आली आहे.

**१०. जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत सामाजिक न्याय विभागात कार्यरत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या मुला–मुलींच्या शासकीय निवासी शाळा, शासकीय वसतीगृहे, सफाई कामगारांच्या मुला–मुलींकरीता शासकीय निवासी शाळा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन यांचेवरील खालील बाबींकरीता खर्च भागविणेसाठी जिल्हा वार्षिक योजनेतील अर्थसंकल्पीय निधीच्या एक टक्का कमाल मर्यादेत निवतव्यय राखीव ठेवणे (NN२१००२६). —**

१. शासकिय निवासी शाळा व वसतीगृह इमारतीच्या किरकोळ व तातडीच्या दुरुस्तीसाठी येणारा खर्च.

२. निवासी शाळा व वस्तीगृहामध्ये पाणी पुरवठा योजना (विहिर खोदणे, बोर खोदणे), विद्युत पुरवठा.

३. शासकीय निवासी शाळेतील प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता स्टेशनरी, सौंदर्य प्रसाधने, क्रिडा साहित्य, विविध स्पर्धा आयोजन, विविध परिक्षा आयोजन, शैक्षणीक सहल, किरकोळ विद्युत दुरुस्ती इत्यादी प्रकारचे विविध किरकोळ खर्च.

४. शासकिय निवासी शाळा, शासकीय वसतीगृहाच्या सफाई कामगारांच्या मुलामुलींची शासकीय निवासी शाळेतील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या विविध स्तरावरील क्रिडा स्पर्धावरील खर्च व विविध स्तरावरील क्रिडा स्पर्धा आयोजनावरील खर्च.

५. शासकीय निवासी शाळा, शासकीय वसतीगृहे व सामाजिक न्याय भवन इमारतीचे स्ट्रकचरल ऑडीट/इलेक्ट्रीक ऑडीट करणे.

६. शासकीय निवासी शाळा/शासकीय वसतीगृह याकरिता ई–व्हेईकल उपलब्ध करुन देणे.

७. शासकीय निवासी शाळा/शासकीय वसतीगृह याकरिता जमिन प्राप्त झाल्यास जमिन मोजणीवरील खर्च व प्राप्त जमिनीवरील अतिक्रमण रोखण्यासाठी जमिनीच्या भोवताल कुंपन घालण्याकरीता येणारा खर्च..

सदर योजना सन २०२६–२७ पासुन कार्यरत करण्यात आलेली आहे. सन २०२६–२७ मध्ये सदर योजनेकरिता रुपये २९५६.०० लक्ष इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.

---

## (तीन) गृहनिर्माण

**१. मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थांना कर्ज व अनुदान (शहरी/ग्रामीण) (सांकेतांक क्रमांक पी – २२१६०४५६).—** सदर योजनेखाली सन २०२६–२७ वर्षाकरिता या योजनेखाली रुपये ०.०० लाख तरतूद करण्यात आली आहे.

(१) शासन निर्णय, समाजकल्याण, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक बीसीएच– १०९६/प्र. क्र. ६१९/मावक–२, दिनांक १ एप्रिल १९९८ नुसार **मागासवर्गीय घरबांधणी योजना** सुधारित करण्यात आली. महाराष्ट्र शासनाने राज्यातील प्राधिकृत केलेल्या अनुसूचित जाती (नवबौद्धांसह) अनुसूचित जमाती, विमुक्त/भटक्या जमाती (धनगर, वंजारीसह) व विशेष मागास प्रवर्गातील व्यक्तींच्या पंजीबद्ध सहकारी गृहनिर्माण संस्थांना खालील अटी व शर्तीनुसार अर्थसाहाय्य उपलब्ध होते.

**सदरील योजनेच्या अटी व शर्ती खाली नमूद केल्याप्रमाणे आहेत. –**

(१) मागासवर्गीय लोकांना एकत्र येऊन गृहनिर्माण संस्था स्थापन करून सहकार विभागाकडे पंजीबद्ध (नोंदणी) करणे आवश्यक आहे. अशा संस्थेत १० टक्के सभासद बिगर मागासवर्गीयांमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असावेत, तथापि, अट शिथिल करण्यात आलेली आहे.

(२) या योजनेमध्ये लाभ देण्यासाठी शासनाने राज्याच्या क्षेत्राची खालीलप्रमाणे विभागणी केलेली आहे.–

(अ) महानगरपालिका क्षेत्र आणि 'अ' व 'ब' वर्ग नगरपालिकांचे क्षेत्र.

(क) 'क' वर्ग नगरपालिका क्षेत्र व ग्रामीण क्षेत्र.

(३) पात्रतेसाठी उत्पन्न गट.–

(अ) **आर्थिकदृष्ट्या दुर्बल गट. –** सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न रुपये २५,०००.

(ब) **अल्प उत्पन्न गट. –** सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न रुपये २५,००१ ते रुपये ५०,००० पर्यंत.

(क) **मध्यम उत्पन्न गट. –** सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न रुपये ५०,००१ ते रुपये ७५,००० पर्यंत.

(ड) **मध्यम उच्च उत्पन्न गट. –** सर्व मार्गाने मिळणारे वार्षिक उत्पन्न रुपये ७५,००१ ते रुपये ९५,००० पर्यंत.

(४) जमिनीबाबत. –

(अ) शासकीय जमीन उपलब्ध असेल तर संस्थेला ती जिल्हाधिकारी यांचेकडून विनामूल्य देण्यात येईल.

(ब) संस्थेने खाजगी जमीन विकत घेतली असेल किंवा घ्यावयाची असेल तर सदरहू जमिनीची किंमत व नगर रचना विभाग ठरवील ती किंमत यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम संस्थेला अर्थसाहाय्य म्हणून देण्यात येईल.

(५) क्षेत्राच्या विभागानुसार बांधकाम खर्चाची मर्यादा निश्चित केली असून शासकीय अनुदान, व्यक्तिगत वर्गणी अनुक्रमे ३० टक्के, २० टक्के असे राहील. लाभार्थ्यांना बांधकाम खर्चाच्या मर्यादेच्या अधीन राहून १० टक्के व्याज अनुदान देण्यात येईल. १० टक्क्यांपेक्षा अधिकचे व्याज लाभार्थ्यांना स्वतः भरणे आवश्यक आहे. जमीन विकासासाठी बिनव्याजी कर्ज संस्थेच्या सभासदांना अनुज्ञेय राहील.

---

| अ. क्र. १ | उत्पन्न गट २ | उत्पन्न मर्यादा ३ | बांधकाम खर्चाची मार्यादा ४ | शासकीय अनुदान ३० टक्के ५ | व्यक्तिगत वर्गणी २० टक्के ६ | व्याज अनुदान ७ | जमीन विकासासाठी ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रुपये | रुपये | रुपये | रुपये | | रुपये |
| १ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल गट | रु. २५,००० पर्यंत वार्षिक | रु. ६०,००० (अ, ब) वर्ग | १८,००० | १२,००० | १० टक्के | ६,००० |
| २ | अल्प उत्पन्न गट | रु. २५,००० ते रु. ५०,००० वार्षिक | रु. १,००,००० (अ) वर्ग<br>रु. ८०,००० (ब) वर्ग | ३०,०००<br>२४,००० | २०,०००<br>२६,००० | १० टक्के<br>१० टक्के | ८,०००<br>६,००० |
| ३ | मध्यम उत्पन्न गट | रु.५०,००१ ते रु.७५,००० वार्षिक | रु. १,५०,००० (अ) वर्ग<br>रु. १,००,००० (ब) वर्ग | अनुज्ञेय नाही<br>अनुज्ञेय नाही | ४५,०००<br>२०,००० | १० टक्के<br>१० टक्के | अनुज्ञेय नाही<br>अनुज्ञेय नाही |
| ४ | मध्यम उच्च उत्पन्न | रु.७५,००१ ते अधिक रु.१५,००० | रु. १,५०,००० (अ) वर्ग<br>रु. १,००,००० (ब) वर्ग | अनुज्ञेय नाही | ४५,००० | १० टक्के | अनुज्ञेय नाही |

**(२) अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी घरकुल योजना (ग्रामीण/शहरी) (जुने लेखा शीर्ष २२१६२५४८ नवीन लेखा शीर्ष २२१६३३९३/जुने लेखा शीर्ष २२१६२५३९ नवीन लेखा शीर्ष २२१६३३८४). —** शासन निर्णय क्रमांक बीसीएच–२००८/प्र. क्र. ३६/मावक–२, दिनांक १५ नोव्हेंबर २००८ अन्वये सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी घरकुल योजना ग्रामीण भागातील दलित वस्तीतील लोक मुख्यत: कच्च्या व कुडाच्या घरामध्ये व शहरी भागातील लोक झोपडपट्टीमध्ये राहत आहेत.

अनुसूचित जातीच्या व्यक्तींना त्यांच्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे स्वत:च्या उत्पन्नातून चांगल्या प्रकारचे पक्के घर बांधणे शक्य होत नाही. ग्रामीण भागामध्ये बहुतांशी अनुसूचित जातीचे लोक हे कच्च्या घरामध्ये राहतात, तसेच नोकरीसाठी ग्रामीण भागातील बहुतांशी लोक शहराकडे आलेले आहेत. शहरातील वाढत्या किमतीमुळे तेथे ते स्वत:चे घर घेऊ शकत नाही. पर्यायाने त्यांना झोपडपट्टीमध्ये राहावे लागते. ग्रामीण व शहरी भागातील अनुसूचित जातीचे लोकांचे राहणीमान उंचवावे व त्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न

सुटावा म्हणून ग्रामीण व शहरी भागामध्ये त्यांच्या स्वत:च्या जागेवर अथवा कच्च्या घरांच्या ठिकाणी पक्के घर बांधून देण्याबाबतची योजना शासन निर्णय, दिनांक १५ नोव्हेंबर २००८ अन्वये कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी घरकुल योजनेच्या संदर्भातील लाभार्थ्यांनी करावयाच्या अर्जाचा नमुना त्याचप्रमाणे योजनेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे असून संबंधितांनी त्यांच्या जिल्ह्याचे सहायक आयुक्त, समाज कल्याण, यांच्याकडे नमूद केलेल्या कागदपत्रांच्या पूर्ततेसहे अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा. सदर योजनेखाली सन २०२६–२७ या वर्षाकरिता रुपये १२००००.०० लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे.

**परिशिष्ट 'अ'**

**योजनेच्या अटी व शर्ती**

**१. योजनेचे स्वरूप** : ग्रामपंचायत, नगरपालिका क्षेत्र व महानगरपालिका क्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौद्ध व्यक्तींना पक्की घरे बांधून देण्यात येतील. तसेच शासकीय अभिकरणामार्फत घर खरेदी या शासन निर्णयाद्वारे विहित घर किंमत मर्यादेत अनुदान उपलब्ध करून देण्यात येईल.

**२. घराची किंमत मर्यादा** : घराच्या बांधकामासाठी क्षेत्रनिहाय कमाल खर्चाची मर्यादा पुढीलप्रमाणे आहे. –

| | | |
|---|---|---|
| (अ) ग्रामीण सर्वसाधारण क्षेत्र | .. | रुपये १,२०,००० |
| (ब) ग्रामीण नक्षलग्रस्त व डोंगराळ क्षेत्र | .. | रुपये १,३०,००० |
| (क) नगरपालिका क्षेत्र | .. | रुपये २,५०,००० |
| (ड) महानगरपालिका क्षेत्र | .. | रुपये २,५०,००० |
| (ई) मुंबई महानगर विकास प्राधिकरण क्षेत्र | .. | रुपये २,५०,००० |

**३. लाभार्थी हिस्सा :**

| | | |
|---|---|---|
| (अ) ग्रामीण क्षेत्र | .. | निरंक |
| (ब) नगरपालिका क्षेत्र | .. | ७.५ टक्के |
| (ब) महानगरपालिका क्षेत्र | .. | १० टक्के |

**टीप ––** (१) ग्रामीण क्षेत्रासाठी लाभार्थी हिस्सा भरण्यापासून सूट देण्यात आलेली आहे.

(२) शहरी क्षेत्रासाठी लाभार्थी हिस्सा संबंधित सहायक आयुक्त, समाजकल्याण यांनी लाभार्थी निवडीनंतर लाभार्थीकडून घेऊन सहायक आयुक्त, समाजकल्याण यांच्या नावाने राष्ट्रीयीकृत बँकेत खाते उघडून त्यात जमा करावा. त्यानंतर शासनाच्या आदेशानुसार सदर रक्कम संबंधित बांधकाम यंत्रणेला देण्यात येईल.

(३) वरील मुद्दा क्रमांक २ प्रमाणे कोणत्याही परिस्थितीत लाभार्थ्याने हिस्सा भरल्याशिवाय बांधकाम सुरू करू नये.

(४) ग्रामविकास विभाग शा.नि.दि.४ एप्रिल,२०२५ अन्वये रमाई आवास योजना (ग्रामिण) मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यात आलेली आहे. केंद्र पुरस्कृत प्रधान मंत्री आवास योजना टप्पा–२ तसेच विविध राज्य पुरस्कृत ग्रामिण घरकूल योजनअंतर्गत सन २०२४–२५ मध्ये प्राप्त उद्दिष्टांमधील मंजूर घरकूल लाभार्थ्यांना देण्यात येणाऱ्या राज्य हिस्सातून रु.५०,०००/– ऐवढी अतिरिक्त वाढ करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. या रक्कमेमधून रु. ३५,०००/– अनुदान हे घरकूल बांधकामासाठी रु. १५,०००/– हे अनुदान प्रधानमंत्री सुर्यघर योजनेतून छतावर सौरऊर्जा यंत्रणा उभारण्याकरिता केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या अनुदाना व्यतिरिक्त अतिरिक्त अनुदान देण्यात येईल.

राज्यात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांचे मंजूरउद्दिष्टांकरिता असलेले दायित्व पूर्ण करून यापुढे नव्याने वेगळे उद्दिष्ट न देता, प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा–२ अंतर्गत सन २०२४–२५ ते २०२८–२९ मध्ये प्राप्त होणाऱ्या उद्दिष्टांसाठी आवश्यक निधी संबधीत प्रशासकीय विभागाच्या अर्थसंकल्पात तरतूद प्राप्त करुन व्यवस्थापन कक्ष ग्रामिण गृहनिर्माण यांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

**४. घराचे क्षेत्रफळ :** घराच्या बांधकामाचे चटई क्षेत्र ग्रामीण भागासाठी २६९ चौ. फूट व शहरी भागासाठी ३२३ चौ. फूट आहे.

**टीप ––** शहरी भागामध्ये इतर विभागाच्या गृहनिर्माण योजनेप्रमाणे या योजनेसाठीदेखील ४ पर्यंत चटई क्षेत्र निर्देशांक (FSI) मंजूर करण्यात येईल.

**५-अ पात्रता :** (१) लाभार्थी अनुसूचित जातीचा असावा.

(२) लाभार्थ्याचे महाराष्ट्र राज्यातील वास्तव्य किमान १५ वर्षे असावे.

(३) अर्जदाराच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा पुढीलप्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| (अ) ग्रामीण क्षेत्र रुपये | .. | १,२०,००० |
| (ब) नगरपालिका क्षेत्र रुपये | .. | ३,००,००० |
| (ब) महानगरपालिका क्षेत्र रुपये | .. | ३,००,००० |
| (ड) मुंबई महानगर प्रदेश क्षेत्र रुपये | .. | ३,००,००० |

(४) शक्यतो लाभार्थ्यांची स्वत:ची जागा असावी, अथवा त्याचे स्वतःचे कच्चे घर असलेल्या ठिकाणी घर बांधण्यात येईल.

(५) सदर योजनेचा लाभ कुटुंबातील एकाच व्यक्तीस देण्यात येईल.

(६) जमीन कमी उपलब्ध असेल तर त्या ठिकाणचे सर्व पात्र इच्छुक लाभार्थी मिळून (२ पेक्षा जास्त) एकत्रित बांधकाम (ग्रुप हाऊसिंग) करता येईल.

(७) शासनाच्या इतर गृहनिर्माण योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

**(ब) आवश्यक कागदपत्रे :**(१) रेशन कार्ड/निवडणूक मतदार ओळखपत्र/विद्युत देयक/पाणी पट्टी/घरपट्टी.

(२) जमीन ताबापत्र पुरावा (७/१२ उतारा/मालमत्ता नोंदणी प्रमाणपत्र)

(३) सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र.

(४) सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला उत्पन्नाचा दाखला.

(५) इतर अन्य पुरावा.

**टीप.--** जमिनीच्या मालकी हक्काबाबतचा पुरावा (७/१२ उतारा/पी. आर. कार्ड) नसेल तर रेशनकार्ड/ निवडणूक मतदार ओळखपत्र/विद्युत देयक ग्राह्य धरता येईल.

**६. प्राधान्य क्षेत्र :** घरे बांधताना खालीलप्रमाणे प्राधान्यक्रम देण्यात येईल.

(अ) जातीय दंगलीमध्ये घराचे नुकसान (आगीमुळे व इतर तोडफोड) झालेली व्यक्ती.

(ब) अॅट्रॉसिटी अॅक्टनुसार पीडित झालेल्या अनुसूचित जातीच्या पात्र व्यक्ती.

(क) पूरग्रस्त क्षेत्र.

(ड) विधवा महिला.

(इ) उर्वरित सर्व क्षेत्र.

**टीप.--** ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका क्षेत्रांमध्ये अनुसूचित जातीची लोकसंख्या अधिक असलेल्या ठिकाणी प्राधान्य देण्यात येईल.

## मागासवर्गीय कल्याण व इतर योजना

**१. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे (ग्रामीण) (लेखाशीर्ष NN २१००१५).** — ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गाच्या सामाजिक उन्नतीसाठी, मूलभूत गरज पुरविण्यासाठी सन १९७४ पासून ही योजना कार्यान्वित आहे. अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गाच्या वस्त्यांमध्ये प्राधान्यक्रमाने पाणीपुरवठा, मलनिस्सारण, पोहोच रस्ते, अंतर्गत रस्ते, वीजपुरवठा व समाजमंदिर या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी या योजनेंतर्गत ग्रामपंचायतीस अनुदान मंजूर करण्यात येते. दिनांक ५ डिसेंबर २०११ च्या शासन निर्णयान्वये दलित वस्ती ऐवजी अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे असा नावात बदल केलेला आहे. सदर योजनेंतर्गत शासन निर्णय दिनांक १३ एप्रिल २०१७ नुसार अनुसूचित जाती उपयोजनेंतर्गत मंजूर निधी जिल्हा नियोजन समितीमार्फत संबंधित यंत्रणेस उपलब्ध करून दिला जातो. प्रत्येक अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीला लोकसंख्येच्या प्रमाणात अनुज्ञेय असलेल्या अनुदानात दुप्पट वाढ करण्यास तसेच '' संविधान सभागृहाचे

बांधकाम करणे'' या कामाचा समावेश करण्यास शासन निर्णय, दिनांक ६ ऑक्टोबर २०२१ अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात निकषानुसार रुपये ४० लाखपर्यंत विविध कामांसाठी अनुदान मंजूर करण्यात येते. शासन निर्णय दिनांक १६ डिसेंबर २०२१ अन्वये अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे योजनेंतर्गत पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाचा समावेश करण्यात आला आहे. सन २०२६–२७ या आर्थिक वर्षाकरिता रुपये ८६३२७.४४ लक्ष इतकी तरतूद करण्यात आली आहे.

**२. अस्पृश्यता निवारण कार्यक्रम/नागरी हक्क संरक्षण अंतर्गत अधिनियम योजना (२२२५०१५४/जुने लेखा शीर्ष २२२५३१०८ नवीन लेखा शीर्ष २२२५ जी २३२/२२२५०१७२/२२२५०१६३).** — अस्पृश्यता निर्मूलनार्थ कार्यक्रमासाठी खालील योजनांमधून प्रसार करण्यात येतो तसेच नागरी हक्क संरक्षण कायदा १९५५ अन्वये अनुसूचित जाती/जमातीवर होणाऱ्या अन्यायासाठी साहाय्य देण्यात येते तसेच नागरी हक्क संरक्षण अधिनियम कायद्याची लोकांना माहिती व्हावी यासाठी खालील माध्यमातून अस्पृश्यतेचा प्रकार/प्रसिद्धी करण्यात येते.

**(अ) निबंध व वक्तृत्व स्पर्धा.** – निबंध व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करणे. ही योजना १९७४–७५ या वर्षापासून सुरू झाली असून या योजनेअंतर्गत समाजामध्ये बंधुता, समता निर्माण होऊन अस्पृश्यता निर्मूलन होण्यासाठी जागृती निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून वक्तृत्व व निबंध स्पर्धांचे आयोजन केले जाते. सदरची योजना जिल्हा स्तरावर राबविण्यात येत असून महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थ्यांमधून निबंध मागविले जातात व त्यामधून उत्कृष्ट निबंध लिहिणाऱ्या तीन विद्यार्थ्यांची निवड केली जाते. प्रथम क्रमांकाला रुपये २,०००, द्वितीय क्रमांकाला रुपये १,५००, तृतीय क्रमांकासाठी रुपये १,००० याप्रमाणे प्रत्येक जिल्ह्यासाठी रुपये ४,५०० इतकी रक्कम पारितोषिक वितरणासाठी दिली जाते.

**(ब) खेडेगावांना बक्षीस.** – सदरची योजना सन १९७४–७५ पासून सुरू करण्यात आली. या योजनेअंतर्गत ज्या ग्रामपंचायतीने त्यांच्या गावातील दलित वस्त्यांमध्ये जे उत्कृष्ट काम केलेले आहे, तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ मागासवर्गीय लोकांना मिळवून दिलेला आहे अशा गावाची बक्षिसासाठी निवड करण्यात येते.

ग्रामपंचायतीने दलित वस्त्यांमध्ये रस्ते, वीज, पाणी, घरकुल, समाजमंदिर या मूलभूत सोयी–सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. याशिवाय त्या गावामध्ये जातीयतेच्या कारणावरून दंगल झालेली नाही तसेच अस्पृश्यता पाळली जात नाही, आंतरजातीय विवाह झालेले आहेत आदी बाबी विचारात घेऊन जिल्हा दक्षता समितीकडून प्रत्यक्ष पाहणी करून अशा गावाची बक्षिसाकरिता निवड करण्यात येते. पहिले बक्षीस रुपये २,०००, दुसरे बक्षीस १,०००.

**(क) एक दिवसीय शिबिर.** – पंचायत समिती स्तरावर ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, पोलीस पाटील, तलाठी व पोलीस शिपाई यांचे एक दिवसीय प्रशिक्षण. ही योजना सन २००१–०२ या वर्षापासून सुरू झाली असून या योजनेअंतर्गत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, १९८९ व नागरी हक्क संरक्षण कायदा, १९५५ अंतर्गत ग्रामीण क्षेत्रात काम करणारे अधिकारी, कर्मचारी, स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी यांना या कायद्याची माहिती देणे तसेच जातीय सलोखा व राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत करण्यासाठी, जागरुकता निर्माण होण्यासाठी एक दिवसाचे अशी प्रत्येक तालुक्यासाठी तीन शिबिरे दरवर्षी घेण्यात येतात. या प्रशिक्षणावर गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचे नियंत्रण असते व तहसीलदार यांच्या सहकार्याने या प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले आहे.

**(ड) अस्पृश्यता निवारण द्विसप्ताह साजरा करणे.** – ही योजना दरवर्षी दिनांक १ एप्रिल ते १४ एप्रिल या द्विसप्ताहामध्ये जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येते. अस्पृश्यतेचे उच्चाटन समाजाच्या मनातून करणेसाठी या द्विसप्ताहामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन संपूर्ण जिल्ह्यामध्ये ग्रामपंचायत स्तरापर्यंत केले जाते. यासाठी प्रत्येक जिल्हा परिषदेस रुपये ३,००० अनुदान दिले जाते.

वरील योजनांकरिता सन २०२६–२७ करिता रुपये १००.०० लक्ष तरतूद करण्यात आली आहे.

**३. आंतरजातीय विवाहास प्रोत्साहनपर आर्थिक साहाय्य (जुने लेखाशीर्ष २२२५२४६२ नवीन लेखाशीर्ष २२२५ जी २१४/ जुने लेखाशीर्ष २२२५२४३३ नवीन लेखाशीर्ष २२२५जी ३८६).** — अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती यापैकी एक व्यक्ती, दुसरी सवर्ण, हिंदू, जैन, लिंगायत, बौद्ध (मूळचे), शीख व्यक्ती अशांनी विवाह केल्यास आंतरजातीय विवाह संबोधण्यात येतो. या योजनेअंतर्गत आंतरजातीय विवाह करणाऱ्या विवाहितांना रुपये १५,००० अर्थसाहाय्य देण्यात येते. यापैकी अर्धी रक्कम संयुक्त नावाने अल्पबचतीत गुंतविणेत येते व उर्वरित अर्ध्या रकमेचे संसारोपयोगी साहित्य दिले जाते. शासन निर्णय, क्रमांक आजावि–२००३/प्र. क्र. ५०१/मावक–२, दिनांक ६ ऑगस्ट २००४ अन्वये मागासवर्गातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती यामधील आंतरप्रवर्गातील आंतरजातीय विवाहितांनाही सदर योजना लागू करण्यात आली आहे.

शासन निर्णय, क्रमांक आजावि–२००७/ प्र. क्र. १९१/मावक–२, दिनांक १ ऑक्टोबर २०१० अन्वये रुपये १५,००० वरून रुपये ५०,००० इतके अर्थसाहाय्य मंजूर केले असून सदर योजनेचा लाभ विशेष मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांनाही लागू राहील. सदर रक्कम धनाकर्षाद्वारे पती–पत्नीच्या संयुक्त नावाने देण्यात येईल. सन २०२६–२७ करिता रुपये २०२५.०० लक्ष (केंद्र हिस्सा) तरतूद करण्यात आली आहे.

**४. (अ) राज्यातील समाजसेवकांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण म्हणून सन्मान (जुने लेखा शीर्ष २२२५०९९६ नवीन लेखा शिर्ष २२२५ जी ४२१). —** सामाजिक क्षेत्रामध्ये कार्य करीत असलेल्या समाजसेवकांच्या कामाची दाद घ्यावी व इतर कार्यकर्त्यांना त्यापासून प्रेरणा मिळावी, जेणेकरून सामाजिक उत्थानासाठी कार्यकर्ते सरसावून पुढे यावेत यासाठी शासनाने सन १९७१–७२ मध्ये सदरची योजना सुरू केलेली आहे. या योजनेखाली समाजकल्याण क्षेत्रात म्हणजे अनुसूचित जाती– जमाती, भटक्या व विमुक्त जातींचे कल्याण कार्य, तसेच अपंग, मनोदुर्बल, कुष्ठरोग इत्यादींच्या कल्याणासाठी झटणाऱ्या नामवंत समाजसेवकांचा गौरव केला जातो. सदरचे सेवक किमान १० वर्षे तरी उपरोक्त क्षेत्रात कार्य करीत असले पाहिजेत. अशा समाजसेवकांना पती – पत्नीसह ३ दिवस शासकीय पाहुणे म्हणून निमंत्रित करण्यात येते व समारंभपूर्वक त्यांना शाल, श्रीफळ, प्रशस्तिपत्रक व पुरस्काराची रक्कम देण्यात येते. त्यांच्या निवासस्थानापासून समारंभास उपस्थित राहण्यासाठी त्यांना प्रवास भत्ता दिला जातो. सर्वसाधारणपणे अशा व्यक्तीचे वय ५० वर्षांपेक्षा कमी व स्त्रियांच्या बाबतीत ४० वर्षांपेक्षा कमी असू नये व सध्या आमदार–खासदार नाहीत किंवा जिल्हा परिषदांमध्ये पदाधिकारी नाहीत अशांचीच निवड केली जाते. जिल्हाधिकारी किंवा समाजकल्याण अधिकारी हे नावाची शिफारस करतात व शासनाने माननीय समाजकल्याण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या निवड मंडळामार्फत योग्य त्या कार्यकर्त्यांची ’डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण म्हणून निवड केली जाते. दरवर्षी सर्वसाधारण ५१ समाजसेवकांचा ’सदरचा पुरस्कार ही पदवी देऊन गौरव करण्यात येतो. त्याचप्रमाणे ज्या संस्था सामाजिक कार्य करतात त्यांचाही गौरव करण्याची योजना नव्याने सुरू करण्यात आलेली आहे. ज्या संस्थेचा गौरव केला जातो त्या संस्थेस रुपये २५,००१ चा पुरस्कार अर्पण करण्यात येतो. तसेच स्मृतिचिन्ह देण्यात येते, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कारार्थी व त्याच्या सोबत्यास राज्यात एस. टी. चा विनामूल्य प्रवास अनुज्ञेय आहे. सन २०००–०१ पासून ५१ व्यक्ती व १० संस्थांना हा पुरस्कार देण्यात येतो, तसेच व्यक्तीसाठी रुपये ७५,००० व संस्थांसाठी रुपये १००००० इतक्या रकमेचा पुरस्कार देण्यात येतो. सदर योजनेखाली सन २०२६–२७ करिता २०००.०० लक्ष तरतूद करण्यात आली आहे.

**(ब) लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार. –** ’अण्णा भाऊ साठे पुरस्कार ही योजना १९९७–९८ पासून शासनाने सुरू केलेली आहे. या योजनेअंतर्गत मातंग समाजाचा सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकास होण्याच्या दृष्टीने कार्य करणाऱ्या मातंग समाजातील कलावंत, साहित्यिक, समाजसेवक अशा व्यक्तीस पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. या योजनेमध्ये व्यक्तीस रुपये ५१,००० रोख व संस्थेस रुपये १,००,०००, शाल, श्रीफळ यांचा समावेश आहे व सन २०००–२००१ पासून दरवर्षी २५ व्यक्ती व ६ संस्थांची निवड करून पुरस्कार देण्यात येतो.

**(क) संत रविदास पुरस्कार –** राजकीय चर्मकार समाज व इतर दलित समाजाच्या उद्धारासाठी कार्य करणाऱ्या व्यक्ती/ संस्थांना संत रविदास यांच्या जयंतीनिमित्त दिनांक ६ फेब्रुवारी रोजी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते. सदर योजना सुरू करण्यास शासनाने सन २००४ मध्ये मंजुरी दिलेली आहे.

सदर योजना डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार योजनेच्या धर्तीवरच आहे. या योजनेअंतर्गत एका व्यक्तीसाठी शासनाने मान्यता दिलेले सन्मानपत्र, रुपये ५१,००० रोख रक्कम, १ शाल किंवा साडी/खण व श्रीफळ आणि एका सामाजिक संस्थेसाठी शासनाने मान्यता दिलेले सन्मानपत्र, रुपये १,००,००० रोख रक्कम, १ शाल व श्रीफळ देऊन गौरविण्यात येणार आहे.

**५. पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड पुरस्कार (जुने लेखा शीर्ष २२२५३१२६ नवीन लेखा शीर्ष २२२५ जी ४०१). —** दिनांक १५ ऑक्टोबर २००१ ते दिनांक १५ ऑक्टोबर २००२ या कालावधीत पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांची जन्मशताब्दी साजरी करण्यात आली. त्यांच्या जन्मशताब्दी वर्षापासून त्यांच्या नावाने संपूर्ण महाराष्ट्रातून एका व्यक्तीस सन्मानपत्र, शाल, श्रीफळ तसेच रोख रक्कम रुपये ५१,००० व संस्थेसाठी सन्मानपत्र, शाल, श्रीफळ, रोख रक्कम रुपये १,००,००० पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. हे पुरस्कार प्रत्येक वर्षासाठी दिले जातात. सन २०२६–२७ करिता योजनांतर्गत योजनेखाली रुपये १०.०० लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे.

**६. शाहू, फुले, आंबेडकर दलित वस्ती व स्वच्छता अभियान (जुने लेखा शीर्ष २२२५३३७८ नवीन लेखा शीर्ष २२२५ जी ३१२).—** राज्यातील दलित वस्त्यांमधून राहणाऱ्या अनुसूचित जातीच्या लोकांचे राहणीमान उंचवावे. तसेच दलित वस्त्यांमध्ये स्वच्छता राहण्यासाठी तेथील रहिवाशांचा सहभाग वाढावा व सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी, दलितांचे प्रश्न सोडविण्यासाठी

ज्यांनी आपले आयुष्य खर्च केले त्या शाहू, फुले व आंबेडकर यांच्या नावाने शासन निर्णय क्रमांक २००३/प्र. क्र. ९५/मावक– २, दिनांक १७ फेब्रुवारी २००६ अन्वये सन २००६–०७ पासून 'दलित वस्ती विकास व सुधारणा अभियान' दरवर्षी संपूर्ण महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात राबविण्यात येईल. सदर योजनेखाली सन २०२६–२७ वर्षाकरिता रुपये २००.०० लक्ष तरतूद करण्यात आली आहे. या अभियानांतर्गत ज्या ग्रामपंचायती हिरिरीने सहभागी होतील त्यांच्यातून उत्कृष्ट ठरणाऱ्या ग्रामपंचायतींना पुढीलप्रमाणे बक्षिसे देण्यात येतील.

**(१) पंचायत समिती स्तरावरील बक्षीस समारंभ. –** पंचायत समिती स्तरावरील गुणानुक्रमे ३ उत्कृष्ट दलित वस्तींच्या ग्रामपंचायतींना शाहू, फुले, आंबेडकर स्वच्छ दलित वस्ती पारितोषिक, पंचायत स्तरावर दिनांक २६ जानेवारी रोजी प्रदान करण्यात येईल. पारितोषिकाची रक्कम पुढीलप्रमाणे. –

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांकाचे बक्षीस | .. | रुपये २५ हजार |
| द्वितीय क्रमांकाचे बक्षीस | .. | रुपये १५ हजार |
| तृतीय क्रमांकाचे बक्षीस | .. | रुपये १० हजार |

**(२) जिल्हा स्तरावरील बक्षीस समारंभ. –** जिल्हा स्तरावरील प्रत्येकी गुणानुक्रमे ज्या ३ उत्कृष्ट दलित वस्तीच्या ग्रामपंचायती जिल्हास्तरीय समितीने घोषित केल्या असतील त्यांना शाहू, फुले, आंबेडकर स्वच्छ दलित वस्ती बक्षीस जिल्हा स्तरावर दिनांक १ मे रोजी प्रदान करण्यात येतील. बक्षिसांची रक्कम पुढीलप्रमाणे असेल––

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांकाचे बक्षीस | .. | रुपये ५.०० लाख |
| द्वितीय क्रमांकाचे बक्षीस | .. | रुपये ३.०० लाख |
| तृतीय क्रमांकाचे बक्षीस | .. | रुपये २.०० लाख |

**(३) विभागीय स्तरावरील बक्षीस समारंभ. –** विभागीय स्तरावर प्रथम आलेल्या दलित वस्तीच्या ग्रामपंचायतीला मा. मंत्रिमहोदयांच्या (शासनाने नियुक्त केलेल्या) उपस्थितीत शक्यतो संबंधित गावात किंवा विभाग स्तरावर कार्यक्रम घेऊन बक्षिसे देण्यात येतील.

प्रत्येक विभागातून प्रथम येणाऱ्या दलित वस्तीच्या ग्रामपंचायतीला रुपये १० लाख याप्रमाणे देण्यात येईल.

**(४) राज्यस्तरावरील बक्षीस समारंभ. –** राज्यस्तरीय समितीने घोषित केलेल्या गुणानुक्रमे दलित वस्तीच्या प्रत्येकी गुणानुक्रमे पहिल्या तीन ग्रामपंचायतींना मा. राज्यपाल किंवा मा. मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत शक्यतो संबंधित गावात कार्यक्रम घेऊन दिनांक २ ऑक्टोबर रोजी बक्षीस देण्यात येईल. अन्यथा तो कार्यक्रम सोयीनुसार मुंबई येथे घेण्यात येईल.

राज्यस्तरावरून देण्यात येणाऱ्या बक्षिसांची रक्कम

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांकाचे बक्षीस | .. | रुपये २५.०० लाख |
| द्वितीय क्रमांकाचे बक्षीस | .. | रुपये १५.०० लाख |
| तृतीय क्रमांकाचे बक्षीस | .. | रुपये १२.५० लाख |

दलित वस्तीविरहित ज्या ग्रामपंचायतींची बक्षिसासाठी निवड होईल त्या ग्रामपंचायतीला रुपये २५.०० लाख व सुवर्णपदक त्याच दिवशी वरील समारंभामध्ये देण्यात येईल.

**७. अत्याचाराचे बळी ठरणाऱ्या अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या कुटुंबातील सदस्यांना आर्थिक साहाय्य देण्याची योजना (जुने लेखा शीर्ष २२२५२४४२ नवीन लेखाशीर्ष २२२५ जी २९७/जुने लेखा शीर्ष २२२५२४५१ नवीन लेखा शीर्ष २२२५ जी २८८/जुने लेखा शीर्ष २२२५०६०१ नवीन लेखा शीर्ष २२२५ जी ३०३). —** जातीच्या कारणावरून झालेल्या दंगलीतील मागासवर्गीय अत्याचार – पीडितांना सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग शासन निर्णय, क्रमांक युटीए–२०१६/प्र. क्र. २९८/ सामासू– दिनांक २३ डिसेंबर २०१६ गुन्ह्याच्या स्वरुपानुसार ०.७५ लक्ष ते ८.२५ लक्ष पर्यंत अर्थसाहाय्य मंजूर केले जाते.

सदर योजनेखाली सन २०२६–२७ वर्षाकरिता रुपये १००२०.०० लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे.

**८. सामूहिक विवाह सोहळ्यामध्ये भाग घेऊन विवाह करणाऱ्या मागासवर्गीय दाम्पत्यांसाठी कन्यादान योजना (जुने लेखा शीर्ष २२२५३५३८ नवीन लेखा शीर्ष २२२५ जी ३२१). —** महाराष्ट्रात अनुसूचित जाती (नवबौद्धांसह), कुटुंबातील सामूहिक विवाह सोहळ्यामध्ये सहभागी होऊन विवाह करणाऱ्या जोडप्यांस एकूण रुपये २०,००० (रुपये वीस हजार) इतके अर्थसाहाय्य वस्तुस्वरूपाने देण्याचा निर्णय सन २०१६–१७ या आर्थिक वर्षापासून महाराष्ट्र शासनाने घेतलेला आहे.

शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष विभाग, क्रमांक सावियो – २००५/प्र.क्र. ४१/सुधार – १, दिनांक १८ डिसेंबर २००८ व दिनांक २ डिसेंबर २०१६ च्या शासन निर्णयानुसार अन्वये सामूहिक विवाह सोहळ्यामध्ये भाग घेऊन विवाह करणाऱ्या मागासवर्गीय दाम्पत्यांसाठी असलेल्या कन्यादान योजनेत खालीलप्रमाणे सुधारणा लागू करण्यात आली आहे.

(१) सामूहिक विवाह सोहळ्यामध्ये भाग घेणाऱ्या मागासवर्गीय दाम्पत्यांना वस्तुरूपात देण्यात येणारे अनुदान रुपये २०,००० इतकी रक्कम वधूचे वडील, आई किंवा पालकांच्या नावे अधोरेखित धनादेशाद्वारे (क्रॉस चेकने) लग्नाच्या दिवशी देण्यात यावी.

(२) सामूहिक विवाह सोहळा आयोजित करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना प्रति पात्र जोडपे रुपये ४,००० प्रोत्साहनात्मक अनुदान देण्यात यावे. यासाठी तीन महिन्यांच्या आत विवाह नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(३) या योजनेतील २० जोडप्यांची अट शिथिल करण्यात आली असून ती किमान १० जोडपी इतकी राहील.

(४) या योजनेचा लाभ फक्त प्रथम विवाहासाठी आहे. तथापि, विधवा महिलेस दुसऱ्या लग्नाकरितासुद्धा अनुज्ञेय राहील.

स्वयंसेवी संस्था/यंत्रणेने सामूहिक विवाह सोहळ्यामध्ये सहभागी झालेल्या मागासवर्गीय जोडप्यांची छायाचित्रे, विहित नमुन्यातील अर्ज इत्यादी कागदपत्रे विवाह संपन्न होण्याच्या किमान १५ दिवस अगोदर विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचेकडे सादर करावे लागतील.

सदर योजनेखाली सन २०२६–२७ वर्षाकरिता रुपये २००.०० लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे.

**९. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन प्रशिक्षण संस्था (जुने लेखाशीर्ष २२२५३६८१ नवीन लेखा शीर्ष २२२५ जी ३३२/ जुने लेखाशीर्ष २२२५०६३७ नविन लेखाशीर्ष २२२५ जी ३५९).** — समाजकल्याण संचालनालय, पुणे समता विचार समारंभाचा एक भाग म्हणून माननीय माजी मुख्यमंत्री नामदार वसंतदादा पाटील यांनी दिनांक १ मे १९९७ रोजी महाड येथे केलेल्या घोषणेनुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता विचारपीठाची स्थापना दिनांक २९ डिसेंबर १९७८ रोजी मुंबई येथे करण्यात आली. या विचारपीठाचे नाव डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था असे ठेवण्यात आले. ही संस्था मुंबई येथून १९८७ मध्ये पुणे येथे स्थलांतरित करण्यात आली. संस्थेच्या अधिकारी, कर्मचारी वर्गास मार्गदर्शनानुसार सन १९९५ मध्ये नियामक मंडळाची स्थापना करण्यात आली. सन २००२ मध्ये संस्थेची भव्य इमारत पुणे येथे क्वीन्स गार्डन परिसरात उभी करण्यात आलेली आहे. संस्थेच्या सुरुवातीपासून प्रस्थापित करण्यासाठी निबंध, वक्तृत्व, निबंध स्पर्धा तसेच चर्चासत्रे आणि परिसंवाद यांचे आयोजन केले जात होते. समता प्रस्थापित करून जनजागृतीचे काम करण्यात येत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनावरील विविध प्रकारचे संशोधनात्मक कार्य, दुर्मिळ ग्रंथ, साहित्य जतन यास्तव संग्रहालय, संस्थेचे सुसज्ज ग्रंथालय आहे.

शासनाने या संस्थेच्या बळकटीकरणासाठी सन २०२६–२७ या वर्षाकरिता रुपये ५००५५.३१ लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे. संस्थेमार्फत घेण्यात येणारे कार्यक्रम खालीलप्रमाणे आहेत.

१. समाजकल्याण खात्यातील कर्मचारी व अनुदानित शाळेतील अधिकारी आणि कर्मचारी यांचे प्रशिक्षण.

२. समता व सामाजिक न्याय या विषयांवर संशोधन,

३. विविध योजनांचे मूल्यमापन

४. ग्रामीण भागातील कृती संशोधन कार्यक्रम

५. समता परिषद

६. चर्चासत्र व प्रशिक्षण

७. समाजकल्याण खात्यातील सेवा प्रवेशोत्तर परीक्षा व अर्हताकारी अधिकारी यांचे प्रशिक्षणाचे आयोजन करणे

८. निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धेचे राज्यस्तरीय आयोजन

९. समाजकार्य महाविद्यालये व विद्यापीठे यांच्याशी नेटवर्किंग करणे

१०. समाजकल्याण खात्यातील विविध बैठकींचे आयोजन करणे

११. सदर संस्थेमार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, महाड येथील देखभाल व प्रशासकीय खर्च करण्यात येतो.

१२. अनुसूचित जातीच्या उमेदवारांना हॉर्टिकल्चरल प्रशिक्षणाचे कार्यक्रम आयोजित करणे

१३. राज्यातील सर्व जात प्रमाणपत्रे पडताळणी समित्यांवर प्रशासकीय देखरेख व कामकाजाचे नियंत्रण संस्थेमार्फत करण्यात येते.

**नियोजित कार्यक्रम**

१. नियतकालिके आणि प्रकाशने.

२. संस्थेतील संग्रहालयाचे नूतनीकरण करणे.

३. एचआरडी सेंटरची स्थापना करणे.

४. प्रशिक्षणार्थीकरिता वसतिगृह बांधणे.

५. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर शिष्यवृत्ती आणि फेलोशिप देणे.

६. स्वयंसाहाय्य गटांची निर्मिती करणे.

७. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्था तसेच विद्यापीठे यांच्याशी नेटवर्किंग करणे.

८. संस्थेला स्वायत्त दर्जा प्राप्त करून देणे.

९. विभागीय पातळीवर संस्थेच्या शाखा स्थापन करणे.

१०. सामाजिक न्याय विभागाचे तथ्य संकलन व विश्लेषण यंत्रणा तयार करणे.

**१०. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारक, महाड, जिल्हा रायगड (जुने लेखा शीर्ष २२२५३६४५ नवीन लेखा शीर्ष २२२५ जी ३६८). —** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनाच्या शतक महोत्सवाचे औचित्य साधून तसेच त्यांचे दलितोद्धारक ऐक्य, कार्य व भारतीय घटनेचे शिल्पकार यांची चिरकाल स्मृती राहील. त्यांनी दिनांक २० मार्च १९२७ रोजी महाड येथील चवदार तळे सत्याग्रह करून दलितांना खुले करून दिले. या ऐतिहासिक घटनेची स्मृती रहावी म्हणून दिनांक १४ एप्रिल १९९८ रोजी त्यांच्या जयंतीदिनी राष्ट्रीय स्मारकाची कोनशिला बसविण्यात आली.

राष्ट्रीय स्मारकाचे बांधकाम पूर्ण होऊन त्याचे उद्घाटन दिनांक १० ऑगस्ट २००४ रोजी मा. मुख्यमंत्री यांच्या हस्ते करण्यात आले व ते सर्वांसाठी खुले करण्यात आले. स्मारकामध्ये १०४६ आसनक्षमतेचे संपूर्ण वातानुकूलित प्रेक्षागृह, वस्तुसंग्रहालय, वाचनालय, तरणतलाव, बहुउद्देशीय सभागृह, ६ सेमिनार हॉल, १२ विश्रामकक्ष, डॉ. बाबासाहेबांचा पुतळा, प्रशस्त बगीचा आहे. प्रेक्षागृह विविध संस्थांच्या कार्यक्रमासाठी भाडेपद्धतीने सुरू असून वस्तुसंग्रहालय, ग्रंथालय निर्मितीसाठी समितीची स्थापना शासन निर्णय, दिनांक ५ एप्रिल २००५ अन्वये करण्यात आली असून, त्यासाठी अंतर्गत सजावट, पुस्तक खरेदी इत्यादीची कार्यवाही सुरू आहे. ६ सेमिनार हॉलपैकी २ महाराष्ट्र जलप्राधिकरण मंडळ, महाड यांना सार्वजनिक बांधकाम विभाग ठरवील त्या दराने दरमहा भाड्याने दिले जाणार आहेत.

या राष्ट्रीय स्मारकाचे सुरक्षेसाठी ६ सुरक्षा कर्मचारी, १ सफाईगार शासनाच्या मान्यतेने नेमण्यात आलेले असून माळी पदाचे काम वने व उपवने विभाग यांचेकडे देण्यात आलेले आहे. शासन निर्णय, दिनांक २७ डिसेंबर २००५ अनुसार शासनाने राष्ट्रीय स्मारकाच्या व्यवस्थापनासाठी १ व्यवस्थापक, १ कनिष्ठ लिपिक, १ शिपाई, १ माळी, ६ सुरक्षा कर्मचारी व १ सफाईगार अशा ११ पदांना मान्यता दिली आहे. सदर योजनेखाली सन २०२६–२७ या वर्षाकरिता योजनांतर्गत योजनेखाली रुपये ५०००.०० लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे.

**११. अनुसूचित जातीच्या सुशिक्षित बेरोजगारांसाठी व्यवसायाभिमुख क्षमतावृद्धीसाठी प्रशिक्षण (जुने लेखा शीर्ष २२२५३७५२ नवीन लेखा शीर्ष २२२५ जी १२५). —** अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील बेरोजगारांसाठीचे प्रमाण कमी करून त्यांच्या क्षमतावृद्धीसाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. अनुसूचित जातीच्या व्यक्तींना आर्थिक परिस्थितीमुळे कौशल्यावर आधारित व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण करता येत नाहीत. त्यांचेकडे शेतीचे प्रमाणही अतिशय कमी आहे. शेतजमिनीमध्ये बारमाही पाणी, भांडवल, आधुनिक तंत्रज्ञानाची उपलब्धता इत्यादी कमी असल्यामुळे परंपरागत पद्धतीमध्ये शेती व्यवसाय करून उपजीविका करणे अशक्य आहे. त्यासाठी त्यांना कृषी, औद्योगिक, कृषी प्रक्रिया, फळबागा, फुलशेती, रेशीम उद्योग, कृषी पणन, मत्स्य व्यवसाय, पशु संवर्धन, दुग्ध प्रक्रिया यासारख्या व्यावसायिक बाबींवर प्रशिक्षण देऊन त्यांची कौशल्यवृद्धी व क्षमतावृद्धी करण्याची आवश्यकता आहे. यासाठी शासनाने शासन निर्णय क्रमांक इबीसी–२००६/प्र. क्र. १४८ /मावक–२, दिनांक १५ सप्टेंबर २००६ अन्वये ही योजना सुरू केली आहे. त्यासाठी महाराष्ट्र शासन राज्य, कृषी पणन मंडळ, पुणे यांचेतर्फे तळेगाव दाभाडे, जिल्हा पुणे येथे सुरू करण्यात आलेल्या हॉर्टिकल्चर ट्रेनिंग सेंटरमार्फत प्रशिक्षण देण्यात येते. त्याद्वारे एकूण ९ अभ्यासक्रम निश्चित केलेले आहेत. हा प्रशिक्षण कालावधी ५ दिवसांचा असून त्यासाठी प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यासाठी रुपये ४,००.०० खर्च अपेक्षित आहे. यासाठी अनुसूचित जातीच्या किमान इयत्ता ८ वी उत्तीर्ण अर्जदार पात्र असून या प्रशिक्षणासाठी वयोमर्यादा १८ ते ४५ वर्षे राहील. सदर योजनेखाली सन २०२६–२७ या वर्षाकरिता रुपये २५००.०० लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे.

**१२. सांख्यिकी आधार सामग्रीचे संगणकीकरण (जुने लेखा शीर्ष २२२५२३३५ नवीन लेखा शीर्ष २२२५ जी ३७७).** — शासन निर्णय क्रमांक सीओएम १००१/ प्र. क्र. १७४/१/३९, मुंबई, दिनांक २९ ऑक्टोबर २००१ अन्वये सांख्यिकी आधार सामग्रीचे संगणकीकरण योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे. शासनाचे सामाजिक न्याय विभाग व त्यांचे अधिनस्त कार्यालयातील पेपरलेस पद्धत वापरण्याचे धोरण शासनाने अंगीकारलेले असल्याने आयुक्तालय सर्व क्षेत्रीय कार्यालये, जात प्रमाणपत्र पडताळणी समिती आणि राज्य मागासवर्ग आयोग यांना संगणक व त्या अनुषंगाने लागणारे साहित्य व संगणकोपयोगी स्टेशनरी साहित्याचा पुरवठा या योजनेमधून करण्यात येत आहे. सदर योजनेखाली सन २०२६–२७ या वर्षाकरिता रुपये २००.०० लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे.

**१३. नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्याचे समूळ उच्चाटन करण्याबाबत (२२३५ बी–३६१).** — शासन निर्णय क्रमांक अंश्रनि–२०१४/प्र. क्र. २९३ (अ)/सामासु, मुंबई, दिनांक १२ सप्टेंबर २०१४ अन्वये शासनाने महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबत व त्याचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम २०१३ या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व प्रचार आणि प्रसिद्धी या करिता विविध कार्यक्रम/कार्यशाळा इत्यादी आयोजित करण्यासाठी शा.नि.क्र. अश्रनि–२०२०/प्र.क्र.१८१/सामासू दि.२८ जून,२०२२ व शा.नि.क्र. अश्रनि–२०२२/प्र.क्र.१४५/सामासू दि.२८ जून,२०२२ अन्वये विभागीय जिल्हा स्तरावर समिती स्थापन करण्यात आलेली आहे. सन २०२६–२७ या वर्षाकरिता रुपये २०००.०० लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे.

**१४. वृद्ध व अपंग गृहे /वृध्दाश्रमांना राज्यशासनाचे अनुदान (२२३५१४३२, २२३५ डी७७६, २२३५ डी७८५) –**

**अ) वृद्धाश्रम योजना (सर्वसाधारण) :–**

अनाथ, निराधार, निराश्रित ज्येष्ठ नागरिकांचे जीवन जगणे सुसह्य व्हावे, त्यांना हक्काचा निवारा उपलब्ध व्हावा, म्हणून राज्य शासनाने दिनांक २० फेब्रुवारी १९६३ अन्वये वृद्धाश्रम ही योजना सुरु केलेली आहे. ही वृद्धाश्रमे स्वयंसेवी संस्थांमार्फत अनुदान तत्त्वावर चालविली जातात. आतापर्यंत राज्यात एकूण शासन मान्यताप्राप्त २९ वृद्धाश्रमे अनुदान तत्त्वावर सुरू आहेत. या वृद्धाश्रमामध्ये निराधार, निराश्रित व गरजू ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवेश देण्यात येतो. वृद्धाश्रमामध्ये प्रवेशितांना निवास, अंथरुण–पांघरुण, भोजन, वैद्यकीय सुविधा, मनोरंजनाच्या सोयी मोफत पुरविण्यात येतात. वृद्धाश्रमामध्ये ६० वर्षे वयावरील पुरुष व ५५ वर्षे वयावरील स्त्रियांना मोफत प्रवेश देण्यात येतो. तसेच शासन निर्णय क्रमांक बीसीएच–२०१८/प्र.क्र.७९/शिक्षण– २, दिनांक ३ मार्च, २०१९ नुसार वृद्धाश्रम चालविणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना दरमहा प्रतिवृध्द रुपये १५००/– इतके परिपोषण अनुदान अदा करण्यात येते.

**ब) मातोश्री वृद्धाश्रम :–**

'वृद्धाश्रम योजनेबरोबरच ज्येष्ठ नागरिकांना वृद्धाश्रमामध्ये काही अधिकच्या सोयी–सुविधा उपलब्ध व्हाव्यात, (उदा. बाग–बगीचा, वाचनालय, दूरदर्शनवरील कार्यक्रम पाहण्यासाठी सुविधा, बैठे खेळ इत्यादी) म्हणून सर्व सोयींनी युक्त असे 'मातोश्री वृद्धाश्रम ही योजना शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने शासन दिनांक १७ नोव्हेंबर, १९९५ रोजी स्वयंसेवी संस्थांमार्फत सुरू करण्यात आली आहे. सन २००१ मध्ये मातोश्री वृद्धाश्रमांचा आढावा घेतल्यानंतर राज्यातील सर्व मातोश्री वृद्धाश्रम खाजगी स्वयंसेवी संस्थांमार्फत कायमस्वरुपी व कोणतेही अनुदान न देता चालू ठेवण्याचा निर्णय शासन निर्णय दिनांक ३ डिसेंबर, २००१ नुसार घेण्यात आला आहे. तदनंतर शासन निर्णय क्रमांक ज्येष्ठना– २०१६/प्र.क्र.१८/ सामासु, दिनांक ६ मार्च, २०१९ नुसार राज्यात २३ मातोश्री वृद्धाश्रम अनुदान तत्त्वावर आणण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच सदर वृद्धाश्रमातील वृध्दांना परिपोषण अनुदान रु. १५००/– दरडोई दरमहा मंजूर करण्यात आले आहे. तसेच प्रती वृद्धाश्रम १४ पदे याप्रमाणे २३ वृद्धाश्रमांसाठी ३२२ मानधनावरील पदे उच्चाधिकार समितीची मान्यता घेण्याच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रत्येक मातोश्री वृद्धाश्रमाची प्रवेशितांची संख्या १०० इतकी आहे. त्यामधील ५०% जागांवर शुल्क भरुन व ५०% जागांवर विनाशुल्क प्रवेश देण्यात येतो.

सन २०२६–२७ या आर्थिक वर्षासाठी (अ) वृद्धाश्रम योजना (सर्वसाधारण) व (ब) मातोश्री वृद्धाश्रम अशा दोन्ही वृद्धाश्रमांसाठी लेखा शीर्ष क्र. २२३५१४३२, २२३५ डी७७६, २२३५ डी७८५ अंतर्गत रक्कम रुपये ६२०.०० कोटी इतकी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आलेली आहे.

**ज्येष्ठ नागरिक धोरण अंमलबजावणी :** भारताच्या संविधानातील राज्य धोरणाची निदेशक तत्त्वावरील अनुच्छेद ३९ क व ४१ मध्ये ज्येष्ठ नागरिक सुस्थितीत असावा, अशी तरतूद आहे. ज्येष्ठ नागरिकांचे समाजातील स्थान विचारात घेता त्यांना वृध्दापकाळ चांगल्या तऱ्हेने घालविता यावा, समाजामध्ये त्यांचे जीवन सुसह्य व्हावे, शारीरिक/मानसिक आरोग्य सुस्थितीत राहावे, वृद्धापकाळामध्ये

त्यांच्या आर्थिक क्षमता, कामाचा हक्क, शिक्षणाचा हक्क आणि सार्वजनिक मदत मिळवण्यासाठी राज्य शासनाने दिनांक १४ जून २००४ रोजी राज्याचे ज्येष्ठ नागरिक धोरण, २००४ (भाग-१) जाहीर केले आहे.

सदर धोरणाच्या अंमलबजावणीसाठी शासनाने दिनांक ९ जुलै २०१८ च्या शासन निर्णयानुसार राज्याचे सर्वसमावेशक धोरणाबाबत दिनांक ३० सप्टेंबर २०१३ रोजी मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला आहे. दिनांक ९ जुलै २०१८ च्या शासन निर्णयामध्ये नमूद बाबींकरिता ज्येष्ठ नागरिकांची वयोमर्यादा ६० किंवा त्यापेक्षा जास्त अशी करण्यात आली आहे. राज्य शासनाच्या सर्वसमावेशक ज्येष्ठ नागरिकांच्या धोरणाबाबत झालेल्या शासन निर्णय, दिनांक ९ जुलै २०१८ नुसार संबंधित प्रशासकीय विभागाने ज्येष्ठ नागरिक योजनेसंबंधी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी. अशी तरतूद आहे.

ज्येष्ठ नागरिक हा समाजाचा महत्त्वपूर्ण घटक असल्याने त्यांचे राहणीमान सुसह्य व्हावे, आरोग्याच्या सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात, त्यांच्या पालन पोषणाची जबाबदारी व अधिकार यांची जाणीव समाजाला आणि त्यांच्या पाल्यांना व्हावी, म्हणून केंद्र शासनाने ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी आई, वडील, ज्येष्ठ नागरिकांच्या चरितार्थ व कल्याणासाठी अधिनियम, २००७ पारित केला आहे. त्याची राज्यात अंमलबजावणीसाठी आई वडील व जेष्ठ नागरिक यांच्या चरितार्थ व कल्याणासाठी नियम २०१० लागू केले आहे.

ज्येष्ठ नागरिकांच्या कल्याणासाठी आई वडील, ज्येष्ठ नागरिकांच्या चरितार्थ व कल्याणासाठी अधिनियम, २००७ व नियम, २०१० नुसार ज्येष्ठ नागरिकांच्या पालन पोषणाची जबाबदारी व ज्येष्ठ नागरिकांचे अधिकार यांची जाणीव समाजाला आणि त्यांच्या पाल्यांना होणे आवश्यक आहे. ज्येष्ठ नागरिकांना कायद्यानेही संरक्षण दिले आहे.

**१४ अ. जेष्ठनागरिक धोरण योजनेअंतर्गत प्रचार व प्रसिध्दी (२२३५ बी३१६). —** सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी ज्येष्ठ नागरिक धोरण अंमलबजावणी योजनेंतर्गत प्रचार व प्रसिध्दी करिता रक्कम रुपये १०००.०० लक्ष इतकी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आलेली आहे.

**१५. राज्य सफाई कर्मचारी आयोग (२२२५२६३१). —** सफाई कामगारांच्या सामाजिक व आर्थिक उन्नती आणि पुनर्वसनासाठी महाराष्ट्र राज्यात असलेल्या विविध कल्याण योजनांच्या संनियंत्रणाकरिता राज्यस्तरीय आयोगाची स्थापना महाराष्ट्र शासनातर्फे करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाने सफाई कर्मचारी आयोग, अधिनियम, १९७७ च्या कलम ३ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक १२ मार्च १९९८ रोजी महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाची स्थापना केली.

आयोग सफाई कामगारांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकासाचे आणि कल्याणाचे काम करणाऱ्या व्यक्तींमधून गठित करण्यात येईल व तो अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि पाच सदस्यांनी बनलेला असेल.

आयोगाची कार्ये आणि अधिकार पुढीलप्रमाणे असतील :--

(१) सफाई कर्मचाऱ्यांचा दर्जा, त्यांना मिळणाऱ्या सुविधा आणि संधी या संबंधीच्या विषमता दूर करण्याकरिता कालबद्ध कृती करण्यासाठी राज्य शासनास विशिष्ट कार्यक्रमांची शिफारस करणे.

(२) सफाई कर्मचाऱ्यांच्या सामाजिक आणि आर्थिक पुनर्वसनाशी संबंधित कार्यक्रमाच्या व योजनेच्या अंमलबजावणीचा अभ्यास, मूल्यमापन आणि अशा कार्यक्रमांचे व योजनांचे अधिक चांगले सुसूत्रीकरण तथा अंमलबजावणी करण्याकरिता राज्य शासनाला सूचना करणे.

(३) राज्य शासन, नि-शासकीय संस्था, तसेच प्राप्त अनुदान संस्था यांच्या विविध आस्थापनांना भेट देणे व उक्त संस्थांची माहिती मिळविणे किंवा त्यांना सल्ला आणि सूचना देणे.

(४) विशिष्ट गाऱ्हाण्यांबाबत तपास करणे आणि पुढील कामांची अंमलबजावणी राहिली आहे, अशा प्रकरणांची स्वत: होऊन दखल घेणे व संबंधित प्राधिकरणाकडे व राज्य शासनाकडे या बाबी नेणे.

सदर योजनेखाली सन २०२६-२७ या वर्षाकरिता योजनांतर्गत योजनेखाली रुपये २७,७००.०० लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे.

**१६. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना (लेखा शीर्ष २२२५ एफ-०८५). —** राज्यातील नागरी व ग्रामीण क्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांना/गावांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सन १९७४ पासून अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्ती सुधारणा योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत राज्यामध्ये नागरी व ग्रामीण क्षेत्रातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांचा/गावांचा कमी अधिक प्रमाणात विकास झाला तरी तो एकसमान झालेला दिसून येत नाही. राज्यातील नागरी तसेच ग्रामीण भागातील विशेष घटक संवर्गातील वस्त्यांमध्ये/गावांमध्ये विकास

कामे निधी अभावाने प्रलंबित राहिल्याने ग्रामस्थांना तसेच नागरी भागातील रहिवाशांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. यासंदर्भात लोकप्रतिनिधींकडून अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीस/गावाच्या विकास कामांकरिता वारंवार मोठ्या प्रमाणात निधीची मागणी होत आहे.

उपरोक्त बाब विचारात घेऊन राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या नागरी व ग्रामीण भागातील वस्ती/गावांचा विकास करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या कामांना शासन स्तरावरुन मान्यता देण्यासंदर्भात नव्याने राज्यस्तर योजना तयार करून सदर योजनेचे निकष निश्चित करणे आवश्यक होते. तसेच या योजनेंतर्गत घ्यावयाची कामे, अंमलबजावणी यंत्रणा व इतर निकष निश्चित करून राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या नागरी व ग्रामीण भागातील वस्ती/गावांचा विकास करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या कामांना शासन स्तरावरून मान्यता देऊन या योजनेंतर्गत घ्यावयाची कामे, अंमलबजावणी यंत्रणा व इतर निकष निश्चित करण्यासाठी '' भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना '' अशी राज्यस्तर योजना सन २०१८–१९ या वर्षापासून दिनांक ९ मार्च २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुरू करण्यात आली आहे.

या योजनेंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीतील/गावातील पाणीपुरवठा, मलनिःसारण, पोहोच रस्ते, अंतर्गत रस्ते, गटारे बांधणे, स्मशानभूमीचा विकास करणे, पथदिवे, पर्जन्य पाण्याचा निचरा, सार्वजनिक सुलभ शौचालये, ग्रंथालय/अभ्यासिका, व्यायामशाळा या व्यतिरिक्त स्थानिक वस्तीतील रहिवाशांच्या गरजा लक्षात घेता विकास कामांचा समावेश शासन स्तरावरून करण्यात येईल. सदर योजनेंतर्गत केवळ विद्यमान खासदार व आमदार यांनी सुचविलेली कामे मंजूर केली जातात.

दिनांक २८ जुलै २०२१ रोजीच्या शासन शुध्दीपत्रकान्वये सदर योजनेंतर्गत घ्यावयाच्या कामांमध्ये वाढ करण्यात आली असून नवीन अटी व शर्ती समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत.

सन २०२६–२०२७ या आर्थिक वर्षाकरिता रुपये १३३०००.०० लाख इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली आहे.

**प्रधान मंत्री आदर्श ग्राम योजना**

- केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाने सन २००९–१० या आर्थिक वर्षापासून प्रधानमंत्री आदर्शग्राम योजना लागू केली आहे. या योजनेसोबतच राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी सदर गावांमध्ये अंमलबजावणी करून सदर गावांचा सर्वांगीण विकास करणे हा योजनेचा मुख्य हेतू आहे. सदर योजनेअंतर्गत संबंधित गावात मुलभूत सोयीसुविधा उपलब्ध करणे व गावातील सर्व नागरिकांचे जीवनमान उंचावणे हा प्रमुख हेतू आहे.
- सदर योजनेंतर्गत अनुसूचित जातीची ५० टक्के पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावात मुलभूत सोईसुविधांची कामे व इतर उपक्रम राज्य शासनाच्या इतर योजनांशी मेळ घालून मंजूर केली जातात. सदर योजनेंतर्गत प्रत्येक गावात रुपये २१.०० लक्ष इतका निधी उपलब्ध होणार असून रुपये २०.०० लक्ष निधी योजनेंतर्गत करावयाच्या कामांसाठी व रुपये १.०० लक्ष इतका निधी प्रशासकीय खर्चासाठी उपलब्ध होणार आहे. सदर योजना १०० टक्के केंद्र पुरस्कृत निधी असल्याने योजनेसाठी संपूर्ण निधी केंद्र शासनाकडून उपलब्ध होणार आहे.
- सदर गावांमध्ये योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी संबंधित यंत्रणांनी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा व मलनिःसारण, शिक्षण, आरोग्य व पोषक आहार सुविधा, सामाजिक संरक्षण, ग्रामीण रस्ते व गृहनिर्माण, वीज पुरवठा व गॅस जोडणी, कृषी विषयक उपाययोजना, वित्तीय पुरवठ्याच्या सोयीसुविधा, संगणकीकरण सुविधा (डिजिटायजेशन), रोजगार निर्मिती व कौशल्य विकास इत्यादी बाबींवर/घटकांवर काम करणे.
- राज्य शासनाने व केंद्र शासनाने सदर योजनेसाठी विहीत केलेली मार्गदर्शक तत्त्वे विचारात घेऊन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय, क्रमांक प्रगायो–२०१९/प्र.क्र.१०३/अजाक, दिनांक २६ ऑगस्ट २०१९ नुसार सदर योजना राबविण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे निर्गमित करण्यात आलेली आहेत.

**१७. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील मान्यवर व्यक्तींची स्मारके बांधणे सांस्कृतिक व ऐतिहासिक स्थळांचा विकास करण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना अनुदान (जुने लेखा शीर्ष २२२५३६३६ नवीन लेखा शीर्ष २२२५ जी ४१२). —** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय, दिनांक ५ नोव्हेंबर २०२० अन्वये अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील मान्यवर व्यक्तींचे स्मारक बांधणे, तसेच अनुसूचित जातीसाठी सांस्कृतिक व ऐतिहासिकदृष्ट्या महत्व असलेल्या स्थळांचा विकास करणे व अनुसूचित जातीच्या सांस्कृतिक व नितीमूल्यांवर आधारित विकास साधणाऱ्या प्रकल्पांसाठी स्वयंसेवी संस्थांना अनुदान मंजूर करणे ही योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

सदर योजनेंतर्गत स्वयंसेवी संस्थांना प्रकल्प खर्चाच्या ९० टक्के अनुदान देण्यात येते व उर्वरीत १० टक्के हिस्सा संस्थेने स्वत: भरावयाचा आहे. प्रस्तावाची छाननी – प्रस्ताव जागा मालकीची कागदपत्रे, प्रकल्प आराखडा, सार्वजनिक बांधकाम विभागातील सक्षम प्राधिकारी यांचे अंदाजपत्रक, इत्यादी कागदपत्रांसह संबंधित सहायक आयुक्त, समाजकल्याण यांचेकडे सादर करावा. संबंधित सहायक आयुक्त, समाजकल्याण यांनी सदर प्रस्तावाची पडताळणी व शिफारस करून सदर प्रस्ताव संबंधित प्रादेशिक उपायुक्त समाजकल्याण विभाग यांचेकडे सादर करण्यात येतो. संबंधित प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग यांनी सदर प्रस्ताव छाननी समितीच्या अभिप्रायासह प्रस्ताव समाजकल्याण आयुक्तालयास सादर करण्यात येतो. समाजकल्याण आयुक्तालयामार्फत सदर प्रस्ताव मंजुरीसाठी शासनास सादर करण्यात येऊन शासन स्तरावरुन अंतिम मंजुरी दिली जाते.

**१८. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ वे जयंती वर्ष सन २०१५–१६ हे वर्ष समता व सामाजिक न्याय वर्ष साजरे करण्याबाबत (२२२५–डी–८२३).** — सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सान्यावि–२०१५/प्र. क्र. १६३/ बांधकामे दिनांक ९ ऑक्टोबर २०१५ शासन निर्णयानुसार शासनाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे १२५ व्या जयंती वर्ष (दि. १४ एप्रिल २०१५ ते दि. १४ एप्रिल २०१६) हे समता व सामाजिक न्याय वर्ष म्हणून साजरे करण्यास व त्या अनुषंगाने या वर्षामध्ये कार्यक्रम/उपक्रम हाती घेण्यास मान्यता प्रदान केली आहे.

सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने कार्यक्रम भाग–१ मध्ये अनुक्रमांक ६ वर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाशी निगडीत असलेली घटनास्थळे व महत्वाच्या ऐतिहासिक स्थळांना पर्यटनाचा दर्जा देऊन स्थळांचा विकास करणे या उपक्रमांचा समावेश आहे.

**१९. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ जयंती वर्ष ‘‘ समता व सामाजिक न्याय वर्ष साजरे करणे (२२२५ डी–८२३).** — शासन निर्णय, क्रमांक सान्यावि–२०१५/प्र.क्र.१६३/बांधकामे, दिनांक ९ ऑक्टोबर २०१५ अन्वये शासनाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दिनांक १४ एप्रिल २०१५ ते दिनांक १४ एप्रिल २०१६ हे वर्ष ‘‘ समता व सामाजिक न्याय वर्ष ’’ म्हणून साजरे करण्यात आले आहे. सदरच्या वर्षामध्ये अनेक कार्यक्रम/उपक्रम हाती घेण्यास शासनाने मान्यता दिली असून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही चालू झालेली आहे. सदर योजनेसाठी सन २०२६–२७ या आर्थिक वर्षाकरिता रुपये ४००००.०० लक्ष इतकी तरतूद करण्यात आली आहे.

**२०. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लंडन येथे सन १९२१ – २२ मध्ये वास्तव्य केलेल्या घराची खरेदी (४२२५११६३).** — शासन निर्णय, क्रमांक विधयो–२०१४/प्र.क्र.८०/विधयो, दिनांक १६ फेब्रुवारी २०१५ अन्वये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सन १९२१ – २२ मध्ये वास्तव्य केलेले लंडनस्थित १०, किंग्ज हेन्री रोड, एनडब्ल्यू – ३ येथील घर शासनाने घेतले आहे. सदर घर खरेदी केंद्र शासन, परराष्ट्र व्यवहार मंत्रालय व भारतीय रिझर्व्ह बँक यांच्या मान्यतेच्या अधीन राहून करण्यात आले आहे. सदर योजनेसाठी सन २०२६–२७ या आर्थिक वर्षाकरिता रुपये ०.०१ लक्ष इतकी तरतूद करण्यात आली आहे.

**२१. तृतीयपंथीयांची कल्याण योजना (२२३५ सी १९९).** — तृतीयपंथी समुदायाशी संबंधित सर्व बाबी याबाबत सुरुवातीस महिला व बाल विकास विभागाचा शासन निर्णय क्रमांक तृतीपं–२०१४/प्र.क्र. ४९/ का–९, दिनांक ६ सप्टेंबर २०१४ अन्वये मान्यता दिली होती. त्यानंतर सामाजिक न्याय विभागाकडे महिला बाल विकास विभागाचा शासन निर्णय क्रमांक तृतीपं–२०१४/प्र.क्र.४९/ का–९, दिनांक ३ ऑक्टोबर २०१७ अन्वये सदरचा विषय हस्तांतरित झाला आहे. त्यानंतर सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक तृतीपं–२०१८/ प्र.क्र.२६/सामासू, दिनांक १३ डिसेंबर २०१८ नुसार राज्यस्तरावर व विभागीय स्तरावर राज्यातील तृतीयपंथीयांचे हक्काचे संरक्षण आणि कल्याण मंडळ स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार लेखाशीर्ष क्रमांक २२३५–सी–१९९ योजनांतर्गत सन २०२६–२७ या आर्थिक वर्षाकरिता रुपये ३०००.०० लक्ष इतकी तरतूद अर्थसंकल्पीय करण्यात आलेली आहे.

तसेच तृतीयपंथीय/ट्रान्सजेंडर यांना कायद्याने निश्चित अशी ओळख/स्थान मिळवून देणे व त्यासाठी शासनाच्या विविध विभागांकडे पाठपुरावा करणे, तृतीयपंथीयांना सामाजिक संरक्षण प्राप्त करून देणे, तृतीयपंथीयांच्या मानवी हक्कांची पायमल्ली होऊ नये, यासाठी उपाययोजना करणे, तृतीयपंथीयांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देऊन त्यांचा आर्थिक व सांस्कृतिक विकास घडवून आणणे, तृतीयपंथीयांच्या विकासासाठी त्यांना संघटित करणेकरिता प्रयत्न करणे व तृतीयपंथीयांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेणे इत्यादी योजना कार्यान्वित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

---

# २. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील दुर्बल घटकाला व्यवसायाकरिता अल्प व्याजदरात कर्ज देवून स्वंयरोजगाराच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याकरिता कंपनी कायदा अधिनियम १९५६ अन्वये १० जुलै, १९७८ रोजी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. महामंडळाचे सध्याचे अधिकृत भाग भांडवल रु.१००० कोटीचे आहे. राज्य शासनाचे ५१% व केंद्र शासनाचे ४९% भागभांडवल आहे.

अनुसूचित जाती व नवबौद्ध यांचेकरिता प्रामुख्याने स्वयंरोजगाराच्या खालील योजना महामंडळामार्फत राबविण्यात येत आहेत.

**राज्य शासनाच्या योजना**

**(१) अनुदान योजना**
**(२) बीज भांडवल योजना**
**(३) थेट कर्ज योजना**
**(४) प्रशिक्षण योजना**

**केंद्रीय महामंडळाच्या योजना**

**(अ) रा.अ.जा.वि.वि.म.च्या योजना**
**(१) मुदती कर्ज योजना**
**(२) सुक्ष्मपतपुरवठा कर्ज योजना**
**(३) उच्च शैक्षणिक योजना**

**(ब) रा.रा.क.वि.वि.म.च्या योजना**
**(१) जनरल मूदती कर्ज योजना**
**(२) महिला अधिकारीता योजना**
**(३) महिला समृध्दी योजना**
**(४) सुक्ष्मपतपुरवठा योजना**
**(५) उच्च शैक्षणिक कर्ज योजना**
**(६) ग्रीन बिजनेस योजना**
**(७) सॅनेटरी मार्ट योजना**
**(८) पे ॲण्ड युज कम्युनिटी टॉयलेट योजना**
**(९) स्वच्छता उद्यमी योजना**
**(१०) स्कीम फॉर रिहॅबिलिटेशन ऑफ मॅन्युअल स्कॅव्हेंजर्स योजना**

### राज्य शासनाच्या योजना

- **५०% अनुदान योजना –**

१. प्रकल्प मर्यादा रु. ५०,०००/– पर्यंत

२. प्रकल्प मर्यादेच्या ५०% किंवा जास्तीत जास्त रु. २५,०००/– पर्यंत अनुदान देण्यात येते व उर्वरीत रक्कम बँकेमार्फत देण्यात येते. बँक कर्जावर बँकेच्या नियमाप्रमाणे व्याज आकारण्यात येते. कर्जाची परतफेड सर्वसाधारणपणे ३ वर्षात करावयाची आहे.

- **बीज भांडवल योजना –**

महात्मा फुले महामंडळास प्राप्त होणाऱ्या भाग भांडवलामधून बीजभांडवल योजना राबविण्यात येते. योजनेचे स्वरुप खालीलप्रमाणे

१. प्रकल्प मर्यादा रु. ५०,००१/– ते रु. ५ लाखापर्यंत.

२. प्रकल्प मर्यादेच्या २०% बीज भांडवल कर्ज महामंडळामार्फत ४ % द. सा. द. शे. व्याजदराने देण्यात येते. सदर राशीमध्ये महामंडळाचे अनुदानाचा रु. ५०,०००/– समावेश आहे.

३. बँकेचे कर्ज ७५% देण्यात येते व सदर कर्जावर बँकेच्या नियमाप्रमाणे व्याजदर आकारण्यात येतो.

४. महामंडळाचे व बँकेच्या कर्जाची परतफेड एकाच वेळेस ठरवून दिलेल्या समान मासिक हफ्त्यानुसार ३ ते ५ वर्षाचे आत करावी लागते.

५. अर्जदारास ५ %स्वत:चा सहभाग भरावयाचा आहे.

- **महामंडळामार्फत राबविण्यात येणारी नवीन रु. १.०० लक्ष थेट कर्ज योजना –**

सदर योजनेअंतर्गत महात्मा फुले विकास महामंडळास प्राप्त होणाऱ्या भाग भांडवलातून थेट कर्ज योजना राबविण्यात येते. योजनेचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे.

१. प्रकल्प मर्यादा रु. १,००,०००/– पर्यंत

२. महामंडळाचा सहभाग रु. ४५,०००/– इतका असून अनुदान रु. ५०,०००/– (मर्यादेसह) आहे.

३. अर्जदाराचा सहभाग रु. ५,०००/- आहे.

४. सदर कर्जाची परतफेड समान मासिक हप्त्यानुसार ३ वर्षात (३६ महिन्यांच्या) आत करावयाची आहे.

५. सदर देण्यात येणाऱ्या कर्जावर ४% द.सा.द.शे. व्याजदर आहे.

- **प्रशिक्षण योजना –**

प्रधानमंत्री अनुसूचित जाती अभुदय योजनेअंतर्गत सेक्टर स्किल काउन्सिल यांच्यामार्फत अनुसूचित जाती, बौद्ध / नवबौद्ध समाजातील युवक / युवती यांना रोजगार – स्वयंरोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण देण्यात येते. प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थीस मासिक रु १०००/- विद्यावेतन देण्यात येते.

## एन.एस.एफ.डी.सी,योजना

राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली यांच्या योजना महाराष्ट्र राज्यात राबविण्याकरिता महात्मा फुले मागसवर्ग विकास महामंडळाची वाहिनीकृत यंत्रणा म्हणुन नियुक्ती करण्यात आलेली आहे.

एनएसएफडीसी, नवी दिल्ली यांच्या संकेतस्थळावर (www.nsfdc.nic.in) वर उपलब्ध असलेल्या माहितीनुसार खालीलप्रमाणे योजना आहेत.

**१. सुक्ष्मपत पुरवठा योजना**

| कर्ज मर्यादा (रुपये) | म.फु.मा.वि.म. | एनएसएफडीसी चे कर्ज | व्याजदर | परतफेड कालावधी |
|---|---|---|---|---|
| १,४०,०००/- पर्यंत (रु.एक लाख चाळीस हजार पर्यंत) | रु.५०,०००/- च्या कमाल मर्यादेत अनुदान | जास्तीत जास्त ९०% पर्यंत | ६.५०% | ३ वर्षे |

या योजनेमध्ये रु.१,४०,०००/- ची मर्यादा असुन एकुण रकमेच्या ९०% एनएसएफडीसी, नवी दिल्ली देणार असुन उर्वरित रक्कम अनुदान स्वरुपात महामंडळाला दयावयाची आहे.

**२. मुदती कर्ज योजना**

| कर्ज मर्यादा (रुपये) | सहभाग | | व्याजदर | परतफेड कालावधी |
|---|---|---|---|---|
| | म.फु.मा.वि.म. | एनएसएफडीसी | | |
| | अनुदान/बीज भांडवल | | | |
| रु. १,४०,००० पासून ते रु.५०,००,०००/- पर्यंत | रु.५०,०००/-(रु.पन्नास हजार) कमाल मर्यादेत अनुदान | प्रकल्प मुल्याच्या ९०% | ८% | ७ वर्षे |
| | उर्वरित रक्कम बीज भांडवल म्हणून देण्यात येईल. | (जास्तीत जास्त) | | |

तसेच या योजनेमध्ये रु.१,४०,०००/- पासुन ते ५०,००,०००/- पर्यंत देण्याचे प्रावधान आहे एकूण प्रकल्प मुल्याच्या ९०% एनएसएफडीसी, नवी दिल्ली यांच्यामार्फत प्राप्त होणार असुन रु.५०,०००/- च्या कमाल मर्यादेत अनुदान आहे व अर्जदाराच्या सहभागाचा ५% प्रमाणे कमाल मर्यादा आहे.

**३. शैक्षणिक कर्ज योजना – उच्च शिक्षणासाठी (देशांतर्गत व देशाबाहेर)**

| कर्ज मर्यादा (रुपये) | एनएसएफडीसी | अर्जदार सहभाग | व्याजदर |
|---|---|---|---|
| ४०,००,०००/- पर्यंत (रु.चाळीस लाख पर्यंत) | ९०% | १०% | ६.५% |

## एनएसकेएफडीसी योजना

### १. जनरल मुदती कर्ज योजना (General Term Loan) (GTL)

| अ.क्र | कर्ज मर्यादा (रुपये) | सहभाग | | व्याजदर | परतफेड कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | एनएसकेएफडीसी | अर्जदाराचा सहभाग | | |
| १ | रु.१.०० लाख ते रु.१०.०० लाखापर्यंत | ९०% | १०% | ८% | १० वर्ष |
| २ | रु.१०.०० लाखाच्या वर ते रु.१५.०० लाखापर्यंत | ९०% | १०% | ९% | १० वर्ष |

या योजनेमध्ये रु.१.०० लाख ते रु.१५.०० लाखापर्यंत कर्ज मर्यादा असुन एनएसकेएफडीसी, नवी दिल्ली यांच्याकडुन ९०% पर्यंत कर्ज देण्यात येत असून प्रकल्प मर्यादेच्या १०% रक्कम अर्जदाराचा सहभाग म्हणुन घेण्यात येतो.

### २. महिला अधिकारिता योजना (Mahila Adhikarita Yojana) (MAY)

| अ.क्र | कर्ज मर्यादा (रुपये) | सहभाग | | व्याजदर | परतफेड कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | एनएसकेएफडीसी | अर्जदाराचा सहभाग | | |
| १ | रु.२.०० लाख | ९०% | १०% | ७% | ५ वर्ष |

या योजनेमध्ये रु.२.०० लाखापर्यंत कर्ज मर्यादा असुन एनएसकेएफडीसी, नवी दिल्ली यांच्याकडुन ९०% पर्यंत कर्ज देण्यात येत असून प्रकल्प मर्यादेच्या १०% रक्कम अर्जदाराचा सहभाग म्हणुन घेण्यात येतो.

### ३. महिला समृध्दी योजना (Mahila Smruddhi Yojana) (MSY)

| अ.क्र | कर्ज मर्यादा (रुपये) | सहभाग | | व्याजदर | परतफेड कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | एनएसकेएफडीसी | अर्जदाराचा सहभाग | | |
| १ | रु.१.०० लाखापर्यंत | ९०% | १०% | ६% | ३ वर्ष |

या योजनेमध्ये रु.१.०० लाखापर्यंत कर्ज मर्यादा असुन एनएसकेएफडीसी, नवी दिल्ली यांच्याकडुन ९०% पर्यंत कर्ज देण्यात येत असून प्रकल्प मर्यादेच्या १०% रक्कम अर्जदाराचा सहभाग म्हणुन घेण्यात येतो.

### ४. सुक्ष्मपत पुरवठा योजना (Micro Credit Finance) (MCF)

| अ.क्र | कर्ज मर्यादा (रुपये) | सहभाग | | व्याजदर | परतफेड कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | एनएसकेएफडीसी | अर्जदाराचा सहभाग | | |
| १ | रु.१.०० लाखापर्यंत | ९०% | १०% | ७% | ३ वर्ष |

या योजनेमध्ये रु.१.०० लाखापर्यंत कर्ज मर्यादा असुन एनएसकेएफडीसी, नवी दिल्ली यांच्याकडुन ९०% पर्यंत कर्ज देण्यात येत असून प्रकल्प मर्यादेच्या १०% रक्कम अर्जदाराचा सहभाग म्हणुन घेण्यात येतो.

### ५. उच्च शैक्षणिक कर्ज योजना (Education Loan) (EL)

| अ.क्र | कर्ज मर्यादा (रुपये) | सहभाग | | व्याजदर | परतफेड कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | एनएसकेएफडीसी | अर्जदाराचा सहभाग | | |
| १ | रु.१०.०० लाखापर्यंत (देशाअंर्तगत) | ९०% | १०% | ६% (महिलांकरिता ०.५० % कमी व्याजदर) | ५ वर्ष |
| २ | रु.२०.०० लाखापर्यंत (देशाबाहेर) | ९०% | १०% | ७% (महिलांकरिता ०.५० % कमी व्याजदर) | ५ वर्ष |

या योजनेमध्ये देशाअंर्तगत रु.१०.०० लाखापर्यंत व देशाबाहेर रु.२०.०० लाखापर्यंत कर्ज मर्यादा असुन एनएसकेएफडीसी, नवी दिल्ली यांच्याकडुन ९०% पर्यंत कर्ज देण्यात येत असून प्रकल्प मर्यादेच्या १०% रक्कम अर्जदाराचा सहभाग म्हणुन घेण्यात येतो. उत्पन्न मर्यादा रु.४,५०,०००/- असणाऱ्या अर्जदारास व्याज प्रतिपुर्ती करण्याचे नमुद आहे.

### ६. ग्रीन बीजनेस योजना (Green Business) (GB)

| अ.क्र | कर्ज | सहभाग | | व्याजदर (वार्षिक) | परतफेड कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | एनएसकेएफडीसी | अर्जदाराचा सहभाग | | |
| १ | रु.७.५० लाखापर्यंत | ९०% | १०% | ६% | १० वर्षे |
| २ | रु.७.५० ते रु.१५.०० लाखापर्यंत | ९०% | १०% | ७% | १० वर्षे |
| ३ | रु.१५.०० ते रु.३०.०० लाखापर्यंत | ९०% | १०% | ८% | १० वर्षे |

या योजनेमध्ये रु.३०.०० लाखापर्यंत कर्ज मर्यादा असुन एनएसकेएफडीसी, नवी दिल्ली यांच्याकडुन ९०% पर्यंत कर्ज देण्यात येत असून प्रकल्प मर्यादेच्या १०% रक्कम अर्जदाराचा सहभाग म्हणुन घेण्यात येतो.

### ७. सॅनेटरी मार्ट योजना (Sanitary Mart) (SM)

| अ.क्र | कर्ज मर्यादा (रुपये) | सहभाग | | व्याजदर (वार्षिक) | परतफेड कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | एनएसकेएफडीसी | अर्जदाराचा सहभाग | | |
| १ | रु.१५.०० लाखापर्यंत | ९०% | १०% | ६% (महिला लाभार्थीकरिता)<br>७% (पुरुष लाभार्थीकरिता) | १० वर्षे |

या योजनेमध्ये रु.१५.०० लाखापर्यंत कर्ज मर्यादा असुन एनएसकेएफडीसी, नवी दिल्ली यांच्याकडुन ९०% पर्यंत कर्ज देण्यात येत असून प्रकल्प मर्यादेच्या १०% रक्कम अर्जदाराचा सहभाग म्हणुन घेण्यात येतो.

नियमित वसुली भरणाऱ्या लाभार्थ्यांना व्याजामध्ये ०.५% सूट देण्याचे नमूद केलेले आहे.

### ८. पे ॲण्ड युज कम्युनिटी टॉयलेट योजना (Pay  Use Community Toilets)

| अ.क्र | कर्ज मर्यादा (रुपये) | सहभाग | | व्याजदर (वार्षिक) | परतफेड कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | एनएसकेएफडीसी | अर्जदाराचा सहभाग | | |
| १ | रु.२५.०० लाखापर्यंत | ९०% | १०% | ७% (महिला लाभार्थीकरिता)<br>८% (पुरुष लाभार्थीकरिता) | १० वर्षे |

या योजनेमध्ये रु.२५.०० लाखापर्यंत कर्ज मर्यादा असुन एनएसकेएफडीसी, नवी दिल्ली यांच्याकडुन ९०% पर्यंत कर्ज देण्यात येत असून प्रकल्प मर्यादेच्या १०% रक्कम अर्जदाराचा सहभाग म्हणुन घेण्यात येतो.

### ९. स्वच्छता उद्यमी योजना (Swachhta Udyami Yoajan) (SUY)

| अ.क्र | कर्ज | सहभाग | | व्याजदर (वार्षिक) | परतफेड कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| | | एनएसकेएफडीसी | स्थानिक स्वराज्य संस्थेचा सहभाग (ULBs) | | |
| a | रु.१५.०० लाखापर्यंत (वैयक्तिक) | ९०% | १०% | ६% | ७ वर्षे |
| b | रु.५०.०० लाखापर्यंत. (बचतगट/जेआरजी/सहकारी संस्था) | | | ६% | ७ वर्षे |
| | खासगी/शहरी स्थानिक संस्थानी नियुक्त केलेले एजन्सी/कंत्राटदार | | | ८% | ७ वर्षे |
| रु.५०.०० लाखापर्यंतच्या योजनेअंतर्गत नियमित वसुली भरणाऱ्या लाभार्थ्यांना व्याजामध्ये १% सूट देण्यात येईल. | | | | | |
| **Concessional Loans to ULBS** | | | | | |
| c | रु.७५.०० लाखापर्यंत. | ९०% | - | ७% | ७ वर्षे |
| | (महानगरपालिका/नगरपालिका/जल प्राधिकरण/आरोग्य व तांत्रिक विभाग/कंटोनमेंट बोर्ड/रेल्वे) | | | | |
| रु.७५.०० लाखापर्यंतच्या योजनेअंतर्गत नियमित वसुली भरणाऱ्या लाभार्थ्यांना व्याजामध्ये १% सूट देण्यात येईल. | | | | | |

**१०. स्कीम फॉर रिहॅबिलिटेशन ऑफ मॅन्युअल स्कॅव्हेंजर्स योजना (SRMS)**

**(एनएसकेएफडीसी,नवी दिल्ली यांच्यामार्फत मॅन्युअल स्कॅव्हेंजर्सच्या बँक खात्यात प्रत्येकी रु.४०,०००/- इतकी रक्कमेचा लाभ मिळालेले मॅन्युअल स्कॅव्हेंजर्स हे सदर योजनेस पात्र असतील.)**

| **प्रकल्प श्रेणी** | **अनुदानाचा दर** |
|---|---|
| **वैयक्तिक साठी** | |
| रु.५,००,०००/- पर्यंत | ५०% (प्रकल्प खर्च) |
| रु.५,००,०००/- ते रु. १५,००,०००/- | रु. २.५ लाख + उर्वरित प्रकल्प खर्चाच्या २५% |
| **गट प्रकल्पांसाठी** | |
| रु. ५०,००,०००/- पर्यंत (कमाल मर्यादा) प्रति लाभार्थी रु. १०,००,०००/- पर्यंत | जास्तीत जास्त रु. ३.७५ लाख प्रति लाभार्थी |

१. कर्जाची परतफेड ७ वर्षात मासिक समान हप्त्यांत करावयाची आहे.

२. व्याजदर ६ % आकारण्यात येते.

## राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली यांच्या योजना (एन. एस. एफ. डी. सी.)

केंद्र सरकारने राष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त विकास महामंडळाची स्थापना केलेली असून या महामंडळाचे मुख्य कार्यालय नवी दिल्ली येथे कार्यरत आहे. सदर महामंडळाच्या योजना महाराष्ट्र राज्यात राबविण्याकरिता महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाची वाहिनीकृत पत्रणा म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. केंद्रीय महामंडळाच्या योजनेचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.

**अ) सुविधा कर्ज योजना (Suvidha Loan Scheme)** -

- प्रकल्प मर्यादा रु. १०.०० लाख.
- एनएसएफडीसी मुदती कर्ज प्रकल्प मर्यादा ९०% असून ८% व्याज दराने आकारले जाते.
- त्यामध्ये रु.५०,०००/- च्या कमाल मर्यादेत अनुदानाचा सहभाग आहे.
- कर्जाची परतफेड ५ वर्षात समान हप्त्यांत करावयाची आहे.

**ब) उत्कर्ष कर्ज योजना (Utkarsh Loan Scheme)** -

- प्रकल्प कर्ज मर्यादा रु. १०.०० लाख ते ५०.०० लाखा पर्यंत.
- एनएसएफडीसी मुदती कर्ज प्रकल्प मर्यादा ९०% असून ९% व्याज दराने आकारले जाते.
- त्यामध्ये रु.५०,०००/- च्या कमाल मर्यादेत अनुदानाचा सहभाग आहे.
- कर्जाची परतफेड ७ वर्षात समान हप्त्यांत करावयाची आहे.

**क) सुक्ष्मपत पुरवठा योजना - (MCF)**

- प्रकल्प मर्यादा रु.१,४०,०००/- इतका आहे.
- एनएसएफडीसी मुदती कर्ज प्रकल्प मर्यादा ९०% असून ६.५% व्याज दराने दिले जाते.
- त्यामध्ये रु. ५०,०००/- च्या कमाल मर्यादेत अनुदानाचा समावेश आहे.
- कर्जाची परतफेड ३ वर्षांमध्ये मासिक समान हप्त्यांत करावयाची आहे.

**ड) महिला समृद्धी योजना- (MSY)**

- प्रकल्प मर्यादा रु. १,४०,०००/- आहे.
- एनएसएफडीसी मुदती कर्ज प्रकल्प मर्यादा ९०% असून ६% व्याज दराने दिले जाते.
- त्यामध्ये रु. ५०,०००/- च्या कमाल मर्यादेत अनुदानाचा सामावेश आहे.
- कर्जाची परतफेड ३ वर्षांमध्ये मासिक समान हप्त्यांत करावयाची आहे.

**इ) उच्च शैक्षणिक कर्ज योजना - (ELS)**

- एनएसफएसडीसी कर्ज योजनेअतंर्गत व्यवसायिक व तांत्रिक उच्च शिक्षणाकरिता देशाअंतर्गत कर्ज मर्यादा रु.३०,००,०००/- पर्यंतचे प्रावधान आहे व देशाबाहेर कर्ज मर्यादा रु.४०,००,०००/- चे प्रावधान आहे.
- एनएसएफडीसी मुदती कर्ज मर्यादा व्याज देशाअंतर्गत दर द.सा.द.शे. ५.५%, महिला करिता व पुरूषा करिता ६ % व्याज दर तसेच देशाबाहेरील व्यवसायिक व तांत्रिक उच्च शिक्षणाकरिता व्याज दर द.सा.द.शे. ६.५%, पुरूषा करिता व ६ % महिला करिता व्याज दर आकारावयाचा आहे.
- अर्जदाराच्या कुटुंबातील वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.३,००,०००/- इतकी आहे.

## राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ नवी दिल्ली यांच्या योजना (एन.एस.के.एफ.डी.सी.)

केंद्र सरकारने राष्ट्रीय स्तरावर,अस्वच्छ काम करणाऱ्या सफाई कामगारांचे व त्यांचेवर अवलंबून असलेल्या कुटुंबियांचे पुनर्वसन करण्याकरिता राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळाची स्थापना केली आहे.त्यात विविध व्यवसाय करण्यासाठी रु. १५ लाख कमाल मर्यादेपर्यंत कर्ज देण्यात येते.

**अ) मुदती कर्ज योजना - (टर्म लोन)**

अ) प्रकल्प मर्यादा रु. १५ लाख.

ब) केद्रींय महामंडळामार्फत देण्यात येणाऱ्या कर्जावर १०.०० लाखा पर्यंत ८% व १५.०० लाखापर्यंत ९% व्याज आकारले जातो.

क) अर्जदाराचा सहभाग १०% असतो.

ड) कर्जाची परतफेड १० वर्षात समान हप्त्यांत करावयाची आहे.

**आ) सुक्ष्मपत पुरवठा- (एम. सी. एफ.)**

या योजनेअंतर्गत रु. १,००,०००/- पर्यंत कर्ज देण्यात येत असून प्रकल्पाच्या १०% रक्कम अर्जदाराचा सहभाग म्हणुन घेण्यात येते. व्याजदर ७ % आकारण्यात येत असून कर्जाची परतफेड ३ वर्षात समान हप्त्यांत करावयाची आहे.

**इ) महिला समृद्धि योजना (एम.एस. वाय.)**

महिलांना या योजनेअंतर्गत रु. १,००,०००/- पर्यंत कर्ज देण्यात येत असून प्रकल्प किमतीच्या १०% अर्जदाराचा सहभाग असतो. व्याज दर ६% आकारण्यात येत असून कर्जाची परतफेड ३ वर्षात समान हप्त्यांत करावयाची आहे.

**ई) महिला अधिकारिता योजना- (एम.ए.वाय.)**

महिलांना या योजनेअंतर्गत रु.२,००,०००/- पर्यंत कर्ज देण्यात येत असून प्रकल्पाच्या १०% रक्कम अर्जदाराचा सहभाग म्हणून घेण्यात येते. व्याजदर ७% आकारण्यात येत असून कर्जाची परतफेड ५ वर्षात समान हप्त्यांत करावयाची आहे.

**उ) शैक्षणिक कर्ज (ई.एल.एस.)**

एनएसकेएफडीसी, नवी दिल्ली यांच्यामार्फत व्यावसायिक व तांत्रिक उच्च शिक्षणाकरिता देशात तसेच परदेशात शिक्षण घेण्यासाठी कर्ज उपलब्ध करून देण्यात येते. सदर योजनेअंतर्गत देशाअंतर्गत उच्च शिक्षण घेण्याकरीता रु. १०.०० लाखापर्यंत कर्ज देण्याचे प्रावधान आहे, तसेच देशाबाहेर रू.२०.००लाखापर्यंत कर्ज देण्याचे प्रावधान आहे. देशाअंतर्गत व्याजदर द.सा.द.शे. ६% व परदेशात व्याजदर द.सा.द.शे. ७% आकारावयाचा आहे. तसेच स्त्री लाभधारकांकरिता द.सा.द.शे. ०.५०% कमी व्याजदर आकारावयाचा आहे.

**ऊ) ग्रीन बिजनेस योजना (जी.बी.)**

अ) प्रकल्प मर्यादा रु. ७.५० लाख पर्यंत - व्याजदर ६%
रु.७.५१ लाख ते रु.१५.०० लाखपर्यंत - व्याजदर ७%
रु.१५.०१ लाख ते ३०.०० लाखपर्यंत - व्याजदर ८%

ब) अर्जदाराचा सहभाग १०% असतो.

क) कर्जाची परतफेड १० वर्षात मासिक समान हप्त्यांत करावयाची आहे.

**ए) स्वच्छता उद्यमी योजना (एस.यु.वाय.)**

अ) प्रकल्प मर्यादा वैयक्तीक - रु.१५.०० लाखापर्यंत - व्याजदर ६%
बचतगट /JRG/ सहकारी संस्था - रु.५०.०० लाखापर्यंत - व्याजदर ६%
(तसेच स्त्री लाभधारकांकरिता द.सा.द.शे. ०.५०% कमी व्याजदर आकारावयाचा आहे.)
खाजगी संस्था/स्थानीक स्वराज्य संस्थेशी संलग्न असलेले कंत्राटदार -रु.५०.०० लाखापर्यंत - व्याजदर-८%
(तसेच स्त्री लाभधारकांकरिता द.सा.द.शे. १% कमी व्याजदर आकारावयाचा आहे.)

ब) अर्जदाराचा सहभाग १०% असतो.

क) कर्जाची परतफेड ७ वर्षात मासिक समान हप्त्यांत करावयाची आहे.

**ऐ) पे ॲण्ड युज कम्युनिटी टॉयलेट योजना (Pay & Use community Toilet Scheme)**

अ) प्रकल्प मर्यादा - रु.२५.०० लाखापर्यंत आहे.

ब) व्याजदर ८ % आकारण्यात येतो तसेच स्त्री लाभधारकांकरिता द.सा.द.शे. ०.५०% कमी व्याजदर आकारावयाचा आहे

क) अर्जदाराचा सहभाग १०% असतो.

ड) कर्जाची परतफेड १० वर्षात मासिक समान हप्त्यांत करावयाची आहे.

**ओ) सॅनेटरी मार्ट (Sanitary Mart Yojana)**

अ) प्रकल्प मर्यादा – रु.१५.०० लाखापर्यंत आहे.

ब) व्याजदर ७ % आकारण्यात येतो तसेच स्त्री लाभधारकांकरिता द.सा.द.शे. ०.५०% कमी व्याजदर आकारावयाचा आहे.

क) अर्जदाराचा सहभाग १०% असतो.

ड) कर्जाची परतफेड १० वर्षात मासिक समान हप्त्यांत करावयाची आहे.

**औ) स्कीम फॉर रिहॅबिलिटेशन ऑफ मॅन्युअल स्कॅव्हेंजर्स योजना (SRMS)**

| प्रकल्प श्रेणी | अनुदानाचा दर |
|---|---|
| **वैयक्तिक साठी** | |
| रु. ५,००,०००/– पर्यंत | ५०% (प्रकल्प खर्च) |
| रु. ५,००,०००/– ते रु. १५,००,०००/– | रु. २.५ लाख + उर्वरित प्रकल्प खर्चाच्या २५% |
| **गट प्रकल्पांसाठी** | |
| रु. ५०,००,०००/– पर्यंत (कमाल मर्यादा) प्रति लाभार्थी रु. १०,००,०००/– पर्यंत | जास्तीत जास्त रु. ३.७५ लाख प्रति लाभार्थी |

१. कर्जाची परतफेड ७ वर्षात मासिक समान हप्त्यांत करावयाची आहे.

२. व्याजदर ६ % आकारण्यात येते.

सन १९७८ ते मार्च २०२४ पर्यंत महामंडळाने विविध योजनेअंतर्गत एकूण १०७५२६६ इतक्या लाभार्थ्यांना एकूण रुपये १,११,४०६.४१ लाख इतक्या रकमेचे कर्ज वितरीत करण्यात आलेले आहे.

# ३. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) मुंबई

**१) महामंडळाची स्थापना –**

महाराष्ट्र शासनाने समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक एमपीसी–१०८४/१५४७/(४०५)/ एससीपी–०१ मंत्रालय विस्तार भवन, मुंबई–४०० ०३२ दिनांक ६ मार्च, १९८५ अनुसार साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली असुन भारतीय कंपनी कायदा, १९५६ साली रु. २.५० कोटीच्या भागभांडवला सहीत दिनांक ११ जुलै, १९८५ रोजी नोंदणीकृत करण्यात आलेली आहे.

**२) महामंडळाचे भागभांडवल –**

महामंडळ स्थापनेच्या वेळी महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल रु. २.५० कोटी निश्चित करण्यात आले होते. त्यात शासनामार्फत वेळोवेळी वाढ होऊन सध्या शासन निर्णय क्र. संकिर्ण २०२१/प्र.क्र.४६/महामंडळे दिनांक ८ जून, २०२२ अन्वये महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रक्कम रू. १०००.०० कोटी आहे.

महामंडळामार्फत भागभांडवल निधीतुन बीज भांडवल योजना एनएसएफडीसी, दिल्ली यांचे योजनेतील बीज भांडवल निधीचा हिस्सा, थेट कर्ज योजना इ. योजना राबविण्यात येतात. सन २०२४–२५ (३० जुन २०२४ पर्यंत) अखेर पर्यंत महामंडळास भागभांडवला अंतर्गत रु. ५७२.८४ कोटी निधी प्राप्त झालेला असुन त्यापैकी सुमारे रु. ५००.०० कोटी निधी विविध योजनांवर खर्च करण्यात आला आहे.

तसेच शासनामार्फत सन २०२४–२५ या आर्थिक वर्षाकरिता रु. १००.०० कोटी निधीची तरतूद करण्यात आलेली असुन त्यापैकी रु. २०.०० कोटी निधी महामंडळास प्राप्त झालेला आहे.

**३) उद्देश –**

महाराष्ट्रामध्ये मागासवर्गीयांपैकी संख्येने मोठ्या प्रमाणात असलेला मातंग समाज व तत्सम १२ पोटजाती यांचा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकास होण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या कर्ज योजना राबवून त्यांना दारिद्र्य रेषेवर आणणे हा या महामंडळाच्या स्थापनेचा मुख्य उद्देश आहे. १२ पोटजाती पुढील प्रमाणे ➤मांग➤मदारी➤मातंग➤राधेमांग➤मिनी–मादींग➤मांग गारूडी➤मादींग➤मांग गारोडी➤दानखनी मांग➤मादगी➤मांग महाशी➤मादिगा.

**महामंडळामार्फत सद्या राबविण्यात येत असलेल्या योजना –**

(१) महामंडळास प्राप्त होणाऱ्या विशेष केंद्रीय अर्थसहाय्याच्या निधितून राबविण्यात येत असलेल्या योजना

**(अ) अनुदान योजना** : विशेष केंद्रीय अर्थसहाय्य योजनेअंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीतून अनुदान योजना राबविण्या येते. ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ३,००,०००/– लाख पर्यंत आहे अशा कुटुंबातील अर्जदारांना रु. ५०,०००/– पर्यत प्रकल्प मर्यादा असलेल्या व्यवसायासाठी बँकेच्या सहाय्याने कर्ज उपलब्ध करुन दिले जाते. एकूण मंजूर प्रकल्प रक्कमेमध्ये ५०% किंवा जास्तीत जास्त रु.१०,०००/– यापैकी जी कमी असेल ती रक्कम महामंडळामार्फत लाभार्थीस अनुदान म्हणून दिली जाते. उर्वरित रक्कम बँकेकडून कर्जाचे रूपात वितरीत करण्यात येते.

**(ब) प्रशिक्षण योजना** : विशेष केंद्रीय अर्थसहाय्य योजने अंतर्गत प्राप्त होणाऱ्या एकूण निधीच्या १०% रक्कम ही प्रशिक्षण योजनेवर खर्च करण्यात येते. मातंग समाजातील इयत्ता ४ थी. पासून पुढे शिक्षण घेतलेल्या १८ ते ३५ वयोगटातील युवक/युवतींना वाहनचालक, वेल्डींग,मोटार मँकेनिकल, शिवणकाम, ब्युटीपार्लर, फिटर, रेडीओ/टिव्ही दुरुस्ती, सुतारकाम इ. व्यवसायिक प्रशिक्षण शासन मान्य संस्थामार्फत दिले जाते. ज्यामुळे युवक/युवतींना स्वयंरोजगार मिळण्यास सोईस्कर होते.

**(२) बीजभांडवल योजना** : महामंडळास प्राप्त होणाऱ्या भागभांडवल निधीतून सदर योजना राबविण्यात येते. सदर योजना बँकेच्या संयुक्त सहभागाने राबविण्यात येत असून, रु. ७.०० लाख प्रकल्प मर्यादा असलेल्या व्यवसायाचे कर्ज प्रस्ताव बँकेकडे शिफारस करून मंजूर करण्यात येतात. यापूर्वी सदर योजना ही ७५ टक्के बँक, २० टक्के महामंडळ व ५ टक्के लाभार्थी रक्कम अशा स्वरुपात राबविण्यात येत होती. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. एलएएसव्हीएम/प्रकल्प/परिपत्रक/४५–५०–५/२१०८/२०२३–२४ दि.१२.०६.२०२३ नूसार क्रांतीवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाच्या शिफारस क्र.६०/२१ ची अंमलबजावणी करण्याकामी सदर योजनेमध्ये बदल करुन बँकेचा सहभाग ५० टक्के महामंडळाची बीजभांडवल रक्कम ४५ टक्के (रु. १०,००० अनुदानासह) व ५ टक्के लाभार्थ्यांचा सहभाग रक्कम अशा स्वरुपात राबविण्यात येत आहे. सदर योजनेस बँकेकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

**(३) थेट कर्ज योजना :** महामंडळास प्राप्त होणाऱ्या भागभांडवल निधीतून सदर योजना राबविण्यात येते. यापूर्वी या योजनेची कर्जमर्यादा रु. २५,०००/– ऐवढी होती. तथापी एवढ्या कमी रकमेत सध्या महागाईच्या युगामध्ये कोणताही व्यवसाय करणे अशक्य होत असल्याने शासन निर्णय क्र. एलएएस–२०२२/प्र. क्र. ९४/महामंडळे/दिनांक ४/११/२०२२ अन्वये सदर योजनेची कर्ज मर्यादा रु.२५,०००/– वरुन रु. १,००,०००/– पर्यंत वाढविण्यात आलेली आहे. या योजनेमध्ये ९५ टक्के रक्कम (रु. १०,०००/– अनुदानासह) भागभांडवलातून देण्यात येते व उर्वरित ५ टक्के रक्कम लाभार्थ्यांची असते.

**(४) लोहशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजना :** मातंग समाजातील विद्यार्थ्याकरिता लोकशाहिर अण्णाभाऊ साठे प्रोत्साहनपर शिष्यवृत्ती योजना राबविली जाते. त्यामध्ये प्रतीवर्षी १० वी, १२ वी व पदवीमध्ये ६० टक्के पेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना १० वी, १२ वी, पदवी व पदव्युत्तर मध्ये उत्तीर्ण होणाऱ्या युवक–युवकांना पुढील शिक्षणणासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून अनुक्रमे रु. १०००/–, रु. १५००/–, रु. २०००/– व रु. २५००/– याप्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येत होती.

त्यात वाढ करुन महामंडळाच्या संचालक मंडळाच्या मान्यतेनुसार चालू आर्थिक वर्षापासून असून १० वी साठी रु. ५०००/–, १२ वी साठी रु. ७५००/– व पदवी व पदवीकांसाठी रु. १०,०००/– पदव्युत्तरसाठी रु. १२,५००/– प्रमाणे शिष्यवृत्ती रक्कमेत वाढ करण्यात आली आहे. तसेच आगामी संचालक मंडळाच्या बैठकीत पुन्हा या रक्कमेमध्ये दुप्पट वाढ करण्याचा प्रस्ताव संचालक मंडळास सादर करण्यात येणार आहे.

**(३) राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त विकास महामंडळ (NSFDC) यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या निधीतून योजना राबविण्यात येतात.**

राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त विकास महामंडळ (NSFDC) दिल्ली यांची महाराष्ट्रामध्ये अधिकृत वाहीनी म्हणून साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळही सन १९९३ मान्यता देण्यात आलेली आहे. त्याअंतर्गत महामंडाळामार्फत एनएसएफडीसी महामंडळाच्या सूविधा/मुदत कर्ज योजना लघुऋण वित्त योजना, महिला समृद्धी योजना, शैक्षणिक योजना या विविध योजना राबविण्यात येतात.

**(अ) सुविधा कर्ज/ मुदत कर्ज योजना –**

सदर योजनेअंतर्गत विविध व्यवसायांकरीता एनएसएफडीसी मार्फत रु. ५.०० लाखापर्यंत असलेल्या व्यवसायांकरिता मुदत कर्ज मंजूर केले जाते. सदर कर्ज रक्कमेमध्ये ७५ टक्के हिस्सा एनएसएफडीसी महामंडळाचा असतो. २० टक्के हिस्सा महामंडळाचे भागभांडवल निधीतून (रु. १०,०००/– अनुदानासह) देण्यात येतो. उर्वरीत ५ टक्के रक्कम ही लाभार्थ्यांची असते. सदर कर्जाची परतफेड जास्तीत जास्त ५ वर्षे असते. एनएसएफडीसी च्या रक्कमेवर द.सा.द.शे ७ टक्के व महामंडळाच्या रक्कमेवर द.सा.द.शे ४ टक्के व्याज आकारण्यात येते.

**(ब) लघुऋण वित्त योजना –**

एनएसएफडीसी योजने अंतर्गत लघुऋण वित्त योजना सन २०००–०१ पासून राबविण्यात येते. सदर योजनेअंतर्गत रु. १,४०,०००/–प्रकल्प मर्यादा असलेल्या कर्ज प्रकरणामध्ये प्रती लाभार्थीस एनएसएफडीसी चे मूदत कर्ज रु. १,२५,०००/– व महामंडळाचे अनुदान रु. १०,०००/– व लाभार्थी सहभाग रु. ५०००/– असे एकूण रु. १,४०,०००/– च्या मर्यादेत लघुउद्योगाकरिता लाभ देण्यात येतो.

**(क) महिला समृद्धी योजना –**

महिला समृद्धी योजना (MSY) ही योजना सन २००४–०५ पासून महामंडळामार्फत राबविण्यात येत आहेत. सदर योजनेअंतर्गत रु. १,४०,०००/–प्रकल्प मर्यादा असलेल्या कर्ज प्रकरणामध्ये प्रती लाभार्थीस एनएसएफडीसी चे मूदत कर्ज रु. १,२५,०००/– व महामंडळाचे अनुदान रु. १०,०००/– व लाभार्थी सहभाग रु. ५०००/– असे एकूण रु. १,४०,०००/– च्या मर्यादेत लघुउद्योगाकरिता लाभ देण्यात येतो. सदर योजना फक्त महिला लाथार्थीसाठी राबविण्यात येते.

**(ड) शैक्षणिक कर्ज योजना** :

मातंग समाजाच्या युवक युवतींना एनएसएफडीसी योजने अंतर्गत देशांत व परदेशांत उच्च शिक्षण घेण्याकरिता एनएसएफडीसी अंतर्गत शैक्षणिक कर्ज योजना राबविण्यात येते. देशांतर्गत उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थांना रु. ३०,००,०००/– व परदेशांतर्गत उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीना रु. ४०,००,०००/– कर्ज मंजूर केले जाते. सदर कर्जाची परत फेड शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ६ महिनेपासून अथवा नोकरी लागले पासून करावयाची असते.

**महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांचे स्वरुप**

**(अ) विशेष केंद्रीय अर्थसहाय्य योजनेतून राबविण्यात येत असलेल्या योजना –**

| अ.क्र. | योजनेचे नाव | प्रकल्प मर्यादा | उत्पन्न मर्यादा | बँकेचा हिस्सा | महामंडळाचे अनुदान | लाभार्थी हिस्सा | बँकेच्या रक्कमेवर व्याज | परतफेडीचा कालावधीही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अनुदान योजना | ५०,०००/– | ३,००,०००/– | ४०,०००/– | १०,०००/– | निरंक | नियमाप्रमाणे | ६० महिने |
| २ | प्रशिक्षण योजना | वि.के.अ एकूण प्राप्त निधीच्या १०% रक्कम खर्च करणे अपेक्षित | ३,००,०००/– | – | – | – | – | – |

**(ब) महामंडळाचे भागभांडवली अंशदानातून राबविण्यात येत असलेल्या योजना –**

| अ. क्र. | योजनेचे नाव | प्रकल्प मर्यादा | उत्पन्न मर्यादा | बँकेचा हिस्सा | महामंडळाचे बीज भांडवल हिस्सा | अनुदान रक्कम | लाभार्थी हिस्सा | बँकेच्या रक्कमेवर व्याज दर | महामंडळाच्या रक्कमेवर व्याज दर | परतफेडीचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बीज भांडवल योजना | ५०,०००/– ते ७,००,०००/– | ३,००,०००/– | ५० टक्के | ४५ टक्के (अनुदानासह) | १०,०००/– | ५ टक्के | नियमाप्रमाणे | ४ टक्के | ४८ ते ६० महिने |
| २ | थेट कर्ज योजना | १,००,०००/– | ३,००,०००/– | ० | ८५,०००/– | १०,०००/– | ५,०००/– | – | ४ टक्के | ३६ महिने |

**(क) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजना –**

मातंग समाजीतील प्रतीवर्षी इ.१० वी., १२ वी., पदवी, पदवीका व पदव्युत्तर परिक्षेत कमीत कमी ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविण्याऱ्या विद्यार्थी व विद्यार्थींची जिल्हानिहाय प्राप्त गुणाच्या टक्केवारीनुसार निवड केली जाते व उपलब्ध निधीच्या मर्यादेत शिष्यवृत्ती एकदाच पुढील शिक्षणासाठी प्रोत्साहनपर दिली जाते हि योजना मुख्यमंत्री निधीतून महामंडळास मिळालेल्या २० लाख निधीच्या मिळणाऱ्या व्याजातून प्रतीवर्षी राबविण्यात येते. शिष्यवृत्ती–(१) १० वी.– रु. ५०००/–, (२) १२ वी.– रु. ७५००/–, (३) पववी व पदवीका– रु. १०,०००/–, (४) पदव्युत्तर– रु. १२,५००/–

**(ड) राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्तीय विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजना (NSFDC) –**

| अ. क्र. | योजनेचे नाव | प्रकल्प मर्यादा | उत्पन्न मर्यादा | NSFDC हिस्सा | महामंडळाचे बीज भांडवल हिस्सा | अनुदान रक्कम | लाभार्थी हिसा | NSFDC रक्कमेवर व्याज दर | महामंडळाच्या रक्कमेवर व्याज दर | परतफेडीचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुविधा कर्ज योजना | ५,००,०००/– | ३,००,०००/– | ७५ टक्के | २० टक्के (अनुदानासह) | १०,०००/– | ५ टक्के | ६ टक्के | ४ टक्के | ६० महिने |
| २ | लघुऋण वित्त योजना | १,४०,०००/– | ३,००,०००/– | ४०,०००/– | निरंक | १०,०००/– | निरंक | ५ टक्के | – | ३६ महिने |
| ३ | महिला समृद्धी योजना | १,४०,०००/– | ३,००,०००/– | ४०,०००/– | निरंक | १०,०००/– | निरंक | ४ टक्के | – | ३६ महिने |
| ४ | शैक्षणिक कर्ज योजना | अ) देशाअंतर्गत रु. ३० लाख ब) परदेशाअंतर्गत | ३,००,०००/– | ९० टक्के | निरंक | निरंक | १० टक्के | ७.५ टक्के | – | शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यापासून अथवा नोकरी लागेपर्यंत |

## लेखाशिर्षानुसार कार्यक्रम अंदाजपत्रक २०२६-२०२७ साठी आवश्यक असलेला निधी

(रु. लाखात)

| अ. क्र. | लेखाशिर्ष | योजना | | कार्यक्रम अंदाजपत्रक २०२५-२०२६ प्रस्तावित निधी |
|---|---|---|---|---|
| १. | २२२५ ०२७२ | विशेष केंद्रीय अर्थसहाय्य योजना | १) | २००.०० |
| | | | २) | २००.०० |
| | | | ३) | २००.०० |
| | | | ४) | ३५०.०० |
| | | | ५) | १५००.०० |
| | | | ६) | ०.०० |
| | | | ७) | ०.०० |
| | | | ८) | ०.०० |
| | | एकूण (१) | | ३२५०.०० |
| २. | ४२२५ ००२२ | बीजभांडवल योजना | १) | ०.०० |
| | | | २) | ६१००.०० |
| | | | ३) | १७००.०० |
| | | | ४) | १३५०.०० |
| | | | ५) | २२४२३.२० |
| | | | ६) | ०.०० |
| | | | ७) | ०.०० |
| | | | ८) | ०.०० |
| | | एकूण (२) | | ३१५७३.५० |
| | | **एकूण (१)+(२)** | | **३४८२३.२०** |

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) मुंबई

मागील ०५ वर्षातील (सन २०१९-२०२० ते २०२३-२०२४ (३१-३-२०२५ अखेर) योजनानिहाय वाटपाचा तपशिल

(रु. लाखात)

| अ. क्र. | योजनेचे नाव | सन | अर्थसंकल्पीय तरतूद | प्रत्यक्ष प्राप्त निधी | साध्य लाभार्थी संख्या | खर्च रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | विशेष केन्द्रीय अर्थसहाय्य योजना(अनुदान/Subsidy) | २०१९-२०२० | १०४२८.०० | ०.०० | ९८२ | १४८.१७ |
| | | २०२०-२०२१ | १०९११.०० | ०.०० | ५५६ | ११५.४७ |
| | | २०२१-२०२२ | १०९११.०० | ०.०० | ४७६ | ६१.५० |
| | | २०२२-२०२३ | ४५६७.७० | ०.०० | २४४ | ३५.६० |
| | | २०२३-२०२४ | ०.०० | ०.०० | २६५ | २८९.०६ |
| | | एकूण | ३६८१७.७० | ०.०० | २५२३ | ६४९.८० |
| २ | बीजभांडवल योजना | २०१९-२०२० | १०००.०० | ०.०० | २५० | १३१.८४ |
| | | २०२०-२०२१ | ५००.०० | ०.०० | २०४ | १२२.६४ |
| | | २०२१-२०२२ | ५००.०० | ८८२४.०० | १४२ | ८९०९.२५ |
| | | २०२२-२०२३ | १००००.०० | २१००.०० | ११२ | ७१.३९ |
| | | २०२३-२०२४ | १००००.०० | ७०००.०० | ११३३ | १०३५.८३ |
| | | एकूण | २२०००.०० | १२९२४.०० | १८४१ | १०२७०.९५ |
| ३ | एनएसकेएफडीसी योजना | २०१९-२०२० | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | २०२०-२०२१ | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | २०२१-२०२२ | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | २०२२-२०२३ | ० | ०.०० | ० | ०.०० |
| | | २०२३-२०२४ | ७.५० | ७.५० | १ | ७.५० |
| | | एकूण | ७.५० | ७.५० | १ | ७.५० |

## सन १९८५-१९८६ ते २०२३-२०२४ (३१-३-२०२५ अखेर) अंतर्गत योजनानिहाय वाटपाचा तपशिल

(रु. लाखात)

| अ. क्र. | योजनेचे नाव | सन | अर्थसंकल्पीय तरतूद रु. लाखात | प्रत्यक्ष प्राप्त निधी रु. लाखात | साध्य लाभार्थी रु. लाखात | खर्च रक्कम रु. लाखात |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | विशेष केन्द्रीय अर्थसहाय्य योजना | | ७५१३३.०० | १८०६१.२२ | १३३६३५ | १७०५४.६२ |
| २ | बीजभांडवल योजना | १९८५-१९८६ ते २०२३-२०२४ | ७९,०००.०० | ५७२८३.९८ | ३९०४० | ३८८०९.७४ |
| ३ | एनएसकेएफडीसी योजना | | १५३९८.३७ | १४५२३.९७ | २६४५० | १३७६७.०६ |
| | | एकूण | १६९५३१.३७ | ८९८६९.१७ | १९९१२५ | ६९६३१.४२ |

# ४. संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित
# बॉम्बे लाईफ बिल्डींग, ५ वा मजला, ४५, वीर नरीमन रोड, मुंबई–४०० ००१.

**स्थापना :–**

महाराष्ट्र चर्मोद्योग विकास महामंडळाची स्थापना १ मे, १९७४ रोजी कंपनी कायद्या अंतर्गत करण्यात आलेली असून, शासनाच्या दिनांक २ जानेवारी, २००३ च्या निर्णयानुसार आता या महामंडळाचे नाव संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित असे करण्यात आलेले आहे. सदरचे महामंडळ अनुसूचित जातीतील चर्मकार समाज व त्यांच्या पोटजाती उदा. चांभार, ढोर, होलार, मोची इत्यादी यांचा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकास करून त्यांना दारिद्र्य रेषेच्यावर आणण्यासाठी स्थापन झाले आहे.

**उद्दिष्टे –**

खालील उद्दिष्टांची पूर्ती करण्यासाठी महामंडळाची स्थापना :

(१) राज्यात चर्मोद्योगाचा विकास.
(२) अनुसूचित जातीमधील चर्मोद्योगातील कारागिरांचा विकास करणे.
(३) चर्मोद्योगातील तंत्रज्ञान विकसित करणे.
(४) चर्मवस्तूंसाठी बाजारपेठेची निर्मिती.
(५) चर्मोद्योगास प्रोत्साहन देणे.
(६) राज्यातील चर्मोद्योग विकासासाठी चालना देणे.

**आर्थिक तरतूद –**

शासन निर्णय क्रमांक संकिर्ण–२०२१/प्र.क्र.४६/महामंडळे दि. ८/६/२०२२ नुसार या महामंडळाच्या अधिकृत भागभांडवलाची मर्यादा रु. ७३.२१ कोटी वरून रु. १०००कोटी इतकी वाढविण्यात आलेली असून वितरीत व भरणा भागभांडवल रु. ३२८.६१ कोटी इतके आहे. महामंडळाच्या भागभांडवलात १००% सहभाग महाराष्ट्र शासनाचा आहे.

**कर्मचारीवृंद –**

या महामंडळात एकूण १९८ मंजूर पदे असून त्यांपैकी सध्या महामंडळात एकूण ३६ कर्मचारी कार्यरत आहेत.

**कामकाजासंबंधी माहिती –**

महामंडळाची राज्यात चार उत्पादन केंद्रे आहेत :

(१) दर्यापूर, जि. अमरावती
(२) हिंगोली
(३) कोल्हापूर
(४) सातारा

**विक्री केंद्रे –**

महामंडळाची राज्यात बांद्रा (मुंबई), वाशी (नवी मुंबई), धुळे, जळगांव, सोलापूर व नांदेड येथे विक्री केंद्रे आहेत. या विक्री केंद्रामध्ये महामंडळाच्या उत्पादन केंद्रामध्ये उत्पादीत केलेली पादत्राणे, चर्मवस्तू विक्रीसाठी ठेवण्यात येतात. तसेच लहान चर्मकार कारागिरांनी बनविलेल्या चर्मवस्तू व पादत्राणे सुद्धा विक्रीसाठी ठेवण्यात येतात.

**महामंडळाचे उत्पादन –**

महामंडळाचे उत्पादन केंद्रामध्ये सेफ्टी शूज, सॅन्डल, चप्पल, फॅन्सी शूज, जंगल बूट, डी. एम्. एस्. शूज, कंडक्टर कॅश बॅग, ऑक्सफर्ड शूज इत्यादी प्रकारचे उत्पादन केले जाते.

महामंडळाच्या सातारा येथील टॅनरी मधून कच्चा चामड्यापासून पक्के चामडे म्हणजे प्रेस सोल, बॅग टॅन पासून प्रेस सोल लेदर, बेल्टींग लेदर इत्यादी प्रकारच्या चामड्याचे उत्पादन करण्यात येते.

| ठिकाण | उत्पादन क्षमता | उत्पादित मालाचा तपशील |
|---|---|---|
| सातारा | १०,००० किलो | प्रेस सोल, बॅग टॅन, बी. जी. लेदर, लेदर चामडे उत्पादन |
| कोल्हापूर | २०,००० किलो | कोल्हापुरी चप्पल व क्रोम फोल्डींग चप्पलचे उत्पादन |
| दर्यापूर | १,००,००० जोड्या | डर्बी शूज, ऑक्सफर्ड शूज, सेफ्टी शूज, फॅन्सी शूज उत्पादन |
| हिंगोली | ५०,००० जोड्या | डर्बी शूज, ऑक्सफर्ड शूज, सेफ्टी शूज, फॅन्सी शूज उत्पादन |
| | आणि १२,००० नग | आणि कंडक्टर बॅग व ऑफीस बॅग उत्पादन |

**महामंडळाचे विशेष प्रकल्प**

**(१) जी. आय. इंडिकेशन –** महामंडळ कोल्हापूरी चप्पल करिता नोंदणीकृत प्रोप्रायटर व अधिकृत उपयोगर्ता असून महामंडळास जी. आय. इंडिकेशन प्राप्त झालेले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील कोल्हापूरी चप्पल उत्पादकांना संरक्षण व व्यवसाय वाढीस मदत मिळणार आहे.

**(२) कोल्हापूर प्रशिक्षण केंद्र –** कोल्हापूर येथे महामंडळाच्या भुखंडावर प्रशिक्षण केंद्राची इमारत बांधण्यासाठी शासनाची मंजूरी मिळाली असून सदर प्रशिक्षण केंद्राचे भुमिपुजन करण्यात आलेले आहे. सदर शिक्षण व प्रशिक्षण केंद्र सीएफटीआय आग्रा व महामंडळाच्या विद्यमाने उभारण्यात येत आहे.

**संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ दिनांक ३१/०१/२०२६ अखेर रिक्त पदांचा आढावा**

| वर्ग | पद | मंजूर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| गट–अ | व्यवस्थापकीय संचालक | १ | १ | – |
| गट–अ | वि. स. मू. ले. | १ | १ | – |
| गट–ब | व्यवस्थापक | १ | ० | १ |
| गट–ब | कंपनी सचिव | १ | – | १ |
| गट–क | सह व्यवस्थापक | ३ | – | ३ |
| गट–क | उप व्यवस्थापक | ९ | – | ९ |
| गट–क | उच्च लघुलेखक | १ | – | १ |
| गट–क | कनिष्ठ लघुलेखक | २ | २ | – |
| गट–क | सहा. व्यवस्थापक | ६ | – | ०६ |
| गट–क | सहाय्यक | १८ | ८ | १० |
| गट–क | वाहन चालक | २ | – | २ |
| गट–क | तंत्र सहाय्यक | २ | – | २ |
| गट–ड | मिस्त्री | ४ | – | ४ |
| गट–ड | विक्री केंद्र प्रमुख/कुशल कामगार | ८ | ०२ | ६ |
| गट–ड | विक्रेता/अकुशल कामगार | २६ | ९ | १७ |
| गट–ड | शिपाई | १३ | ०५ | ०८ |
| गट–ड | पहारेकरी | ५ | १ | ४ |
| | एकूण अ | १०३ | २९ | ७४ |
| गट–क | जिल्हा व्यवस्थापक | ३० | – | ३० |
| गट–क | लेखापाल | ३५ | ०३ | ३२ |
| गट–क | वसुली निरिक्षक | ३० | ०५ | २५ |
| | **एकूण ब** | **९५** | **८** | **८७** |
| | **एकूण (अ व ब)** | **१९८** | **३७** | **१६१** |

**चर्मकार समाजासाठी महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजना**

१ जुलै १९९६ पासून महामंडळाचे प्रशासकीय नियंत्रण उद्योग विभागाकडून समाज कल्याण विभागाकडे वर्ग करण्यात आले. अनुसूचित जातीतील चर्मकार समाजाच्या (चर्मकार, ढोर, होलार व मोची इ.) सामाजिक व आर्थिक विकासासाठी महामंडळाने कार्य करावे, यासाठी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ व महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना या महामंडळाकडे हस्तांतरीत करण्यात आल्या. चर्मोद्योगाबरोबरच चर्मकार समाजाच्या सर्वांगीण विकासाचे कामही महामंडळ करीत आहे. शासन निर्णय क्र. चविम २००१/प्र. क्र. ९०/विघयो–२ दिनांक २ जानेवारी, २००३ द्वारे महाराष्ट्र चर्मोद्योग विकास महामंडळ या नावात बदल करून, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित असा नामविस्तार करण्यात आला. यापूर्वी योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा पातळीवर महामंडळाची स्वतंत्र यंत्रणा नसल्यामुळे, या दोन योजना महामंडळाच्या विभागीय अधिकाऱ्यांमार्फत व महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या जिल्हा व विभागीय पातळीवर कार्यरत असलेल्या यंत्रणेमार्फतच योजनांची अंमलबजावणी करण्यात येत होती. ऑगस्ट, २००६ ते ऑक्टोबर, २००६ पर्यंत शासन आदेशानुसार महामंडळाने जिल्हा कार्यालयासाठी लागणाऱ्या कर्मचाऱ्यांची भरती रिडिप्लॉयमेंट द्वारे केली व कर्मचारी वर्ग प्राप्त झाल्यावर ऑक्टोबर, २००६ पासून महामंडळाची नियमितपणे जिल्हा कार्यालये सुरू झाली असून महामंडळाच्या जिल्हा व विभागीय कार्यालयामार्फत योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

अनुसूचित जातीतील चर्मकार समाजातील (चर्मकार, ढोर, होलार व मोची) आर्थिक दृष्ट्या दुर्बल व दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणाऱ्या व्यक्तींना त्यांचे जीवनमान उंचावण्याकरिता महामंडळामार्फत विविध योजना राबविण्यात येतात.

**प्रादेशिक कार्यालये** : महामंडळाची प्रादेशिक कार्यालये मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, लातूर व नागपूर येथे आहेत.

**जिल्हा कार्यालये** : महामंडळाची जिल्हा कार्यालये महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्ह्यांच्या ठिकाणी आहेत.

**महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांची तपशीलवार माहिती**

**(१) बीज भांडवल योजना** : रु. ५०,००१ ते रु. ५,००,००० पर्यंत प्रकल्प गुंतवणूक असणाऱ्या कोणत्याही योजनेसाठी बीजभांडवल योजनेअंतर्गत राष्ट्रीयकृत बँकेमार्फत कर्ज पुरवठा सवलतीच्या दराने उपलब्ध करण्यात येतो. या योजनेअंतर्गत रु. ५०,००१ पासून ते रु. ५,००,००० पर्यंतचा कर्ज पुरवठा प्रचलित व्याजदराने बँकेमार्फत करण्यात येतो. या योजने अंतर्गत बँकेने मंजूर केलेल्या कर्ज रकमेपैकी ७५ टक्के कर्ज रक्कम ही राष्ट्रीयकृत बँकेमार्फत देण्यात येते. ५ टक्के रक्कम ही लाभार्थ्याने स्वतःचा सहभाग म्हणून बँकेकडे जमा करावयाची असते. उर्वरित २० टक्के रक्कम ही महामंडळ बीज कर्ज म्हणून देते. त्या रकमेपैकी रु. १०,००० अनुदान म्हणून देण्यात येतात तर उर्वरित रक्कम ही ४ टक्के या व्याजदराने बीज कर्ज म्हणून देण्यात येते. या योजनेअंतर्गत मिळणाऱ्या कर्जाची परतफेड ही राष्ट्रीयकृत बँकेस व महामंडळास ३६ ते ६० मासिक समान हप्त्यात एकाचवेळी करावयाची असते. या योजनेवर माहे जानेवारी २०२६ अखेर एकूण ४५१४ लाभार्थ्यांना रु. ३८७.५० लाख अनुदान व रु. ११५१.८९ लाख बीज कर्जाचे वाटप करण्यात आलेले आहे.

**(२) ५० टक्के अनुदान योजना** : चर्मकार समाजाच्या कुटुंबातील व्यक्तींना राष्ट्रीयकृत बँकेमार्फत रु. ५०,००० पर्यंत प्रकल्प गुंतवणूक असणाऱ्या व्यवसायासाठी सवलतीच्या दराने अर्थ सहाय्य दिले जाते. या अर्थसहाय्यापैकी रु. १०,००० कमाल मर्यादेपर्यंत ५० टक्के कर्जाची रक्कम महामंडळ अनुदान म्हणून देते. उर्वरित ५० टक्के कर्जाची परतफेड ३६ ते ६० समान मासिक हप्त्यांत अथवा बँकेने ठरवून दिलेल्या हप्त्यांत बँकेकडे करावी लागते. बँकेकडून या योजनेखाली मिळणाऱ्या कर्जावर प्रचलित दराने व्याज आकारले जाते. माहे जानेवारी २०२६ अखेर अनुदान योजने अंतर्गत ३३१७७ लाभार्थ्यांना रु. २९०२.१४ लाखाचे वाटप करण्यात आलेले आहे.

**(३) प्रशिक्षण योजना** : चर्मकार समाजातील सुशिक्षित बेरोजगार युवकांना व्यवसायासाठी लागणारे तांत्रिक कौशल्य प्राप्त करण्यासाठी व संबंधित तांत्रिक व्यवसाय सुरू करण्यासाठी मोफत प्रशिक्षण देण्यात येते. यामध्ये निवड झालेल्या प्रशिक्षणार्थींची प्रशिक्षण फी व विद्यावेतन हे महामंडळामार्फत देण्यात येते. शासनाकडून प्राप्त झालेल्या विशेष केंद्रीय सहाय्याच्या निधीपैकी १० टक्के खर्च हा प्रशिक्षणासाठी उपयोगात आणला जातो.

**(४) गटई स्टॉल योजना** : चर्मकार समाजातील व्यक्तीला जो ऊन, वारा व पावसात रस्त्याच्या कडेला बसून गटईचे काम करतो, त्याला यापासून संरक्षण मिळवण्यासाठी शासनाने गटई कामगारांना स्टॉल पुरविण्याची योजना सुरू केली आहे. सदरची योजना ही १०० टक्के अनुदान तत्वावर संचालक, समाज कल्याण, पुणे आणि लिडकॉम महामंडळ यांच्या संयुक्तरीत्या राबविली जाते.

सन २०२०–२०२१ पर्यंत एकूण रु. ८६.९५ कोटी इतका निधी प्राप्त झाला असून २५१२७ लाभार्थ्यांना गटई स्टॉल योजने अंतर्गत गटई स्टॉलचे वाटप करण्यात आले आहे.

**केंद्र शासनाच्या योजना –**

**राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ (एन.एस.एफ.डी.सी, नवी दिल्ली), यांच्या योजना**

**१. मुदती कर्ज योजना** : सदर योजने अंतर्गत विविध व्यवसायांकरीता एन.एस.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचे मार्फत रु. १ ते २.५ लाखापर्यंत गुंतवणूक असलेल्या व्यवसायांच्या योजनांना मुदती कर्ज दिले जाते यामध्ये मंजूर केलेल्या कर्जापैकी एन.एस.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचा सहभाग ७५ टक्के महामंडळाचा सहभाग २० टक्के (रु. पन्नास हजार अनुदानासहीत) व लाभार्थी सहभाग ५ टक्के पर्यंत असतो. कर्ज फेडीची मुदत जास्तीत जास्त पाच वर्षापर्यंत असते. माहे जानेवारी २०२६ अखेर मुदती कर्ज योजने अंतर्गत ६४९६ लाभार्थ्यांना रु. ६७६३.७७ लाखाचे एन.एस.एफ.डी.सी. यांच्या निधीतून तसेच अनुदान रु. ७०८.८६ लाख व रु. १९३३.०० लाखाचे बीज कर्ज वाटप करण्यात आले.

**२. सूक्ष्म पत पुरवठा योजना** : या योजनेअंतर्गत चर्मकार समाजातील लाभार्थ्यांना ५ टक्के व्याज दराने रु. ४०,००० पर्यंत कर्ज व रु. १४००००/– रक्कम इतके असे एकूण रु. ५०,००० रक्कम दिली जाते. तसेच सुक्ष्म पत पुरवठा योजने अंतर्गत रु. १,०५,०००/– पर्यंत एन एस एफ डी सी कर्ज रु. ३१०००/– अनुदान व रु. ४०००/– लाभार्थी सहभाग असे एकूण १४००००/– रक्कम दिली जाते.

माहे जानेवारी २०२६ अखेर सुक्ष्म पत पुरवठा योजने अंतर्गत १२९५९ लाभार्थ्यांना अनुदान रु. १३०७.६५ लाख बीज कर्ज रुपये १.०५ लाख व एन.एस.एफ.डी.सी. यांच्या निधीतून २३६२.७० लाखाचे वाटप करण्यात आले.

**३. महिला समृद्धी योजना** : चर्मकार समाजातील विधवा, परित्यक्ता निराधार अशा महिला लाभार्थींसाठी महिला समृद्धी योजने अंतर्गत ४ टक्के व्याज दराने रु. ४०,००० पर्यंत कर्ज व रु. २५,००० इतके अनुदान असे एकूण रु. ५०,००० रक्कम दिली जाते. तसेच महिला समृध्दी योजनेअंतर्गत रु. १,०५,०००/– पर्यंत एन.एस.एफ.डी.सी कर्ज रु. ३१,०००/– अनुदान व रु. ४,०००/– लाभार्थी सहभाग असे एकूण रु. १४०,०००/– रक्कम दिली जाते. माहे जानेवारी २०२६ अखेर महिला समृध्दी योजने अंतर्गत ५४०३ लाभार्थ्यांना अनुदान रु. ५६३.७६ लाख बीज कर्ज रुपये ०.२४ लाख व एन.एस.एफ.डी.सी. यांच्या निधीतून रु. १०२०.३५ लाखाचे वाटप करण्यात आले.

**४. शैक्षणिक कर्ज योजना** : या योजने अंतर्गत चर्मकार समाजातील विद्यार्थ्यांना तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाकरिता ''शैक्षणिक कर्ज योजना'' सन २००९–१० या आर्थिक वर्षापासून कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. भारतामध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास रु. १०.०० लाख व परदेशात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास रु. २०.०० लाख पर्यंत कर्ज घेण्याची मर्यादा आहे. याकरीता लाभार्थ्यांच्या पालकाचा उत्पन्नाचा दाखला, लाभार्थीचा ज्या शिक्षण संस्थेत शिक्षण घेत आहे त्यांचेकडून शैक्षणिक खर्चाबाबतचा अंदाजपत्रक घेण्यात येते. यामध्ये २० टक्के लाभार्थी सहभाग म्हणून घेतला जातो. यामध्ये पुरुषांकरिता ४ टक्के व्याज दर असून ३.५० टक्के महिलांकरीता व्याज दर आहे.

माहे जानेवारी २०२६ अखेर शैक्षणिक योजने अंतर्गत ९९ लाभार्थ्यांना बीज कर्ज रु. १.७७ लाख व एन.एस.एफ.डी.सी. यांच्या निधीतून रु. २९८.८० लाखाचे वाटप करण्यात आले.

**५. लघु व्यवसाय योजना** :

सदर योजनेअंतर्गत विविध व्यवसायाकरीता एन.एस.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचे मार्फत रु. ५.०० लाखापर्यंत गुंतवणूक असलेल्या व्यवसायांच्या योजनांना कर्ज दिले जाते. यामध्ये मंजूर केलेल्या कर्जापैकी एन.एस.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचा सहभाग २० टक्के (रु. पन्नास हजार अनुदानासहीत) व लाभार्थी सहभाग ५ टक्के पर्यंत असतो. कर्ज फेडीची मुदत जास्तीत जास्त पाच वर्षापर्यत असते. माहे जानेवारी २०२६ अखेर लघु व्यवसाय योजनेअंतर्गत १९० लाभार्थ्यांना रु. ७१२.५० लाखाचे एन.एस.एफ.डी. सी.यांच्या निधीतून तसेच अनुदान रु. ८०.९० लाख व बीज कर्ज रुपये १२६.४० लाखाचे कर्ज वाटप करण्यात आले.

**६. महिला अधिकारीता योजना** :

सदर योजनेअंतर्गत विविध व्यवसायाकरिता एन.एस.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचे मार्फत रु. ५.०० लाखापर्यंत गुंतवणूक असलेल्या व्यवसायांच्या योजनांना कर्ज दिले जाते. यामध्ये मंजूर केलेल्या कर्जापैकी एन.एस.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचा ७५ टक्के महामंडळाचा सहभाग २० टक्के (रु. पन्नास हजार अनुदानासहीत) व लाभार्थी सहभाग ५ टक्के पर्यंत असतो. कर्ज फेडीची मुदत जास्तीत जास्त पाच वर्षापर्यंत असते. माहे जानेवारी २०२६ अखेर महिला अधिकारीता योजनेअंतर्गत १०१ लाभार्थ्यांना रु. ३७८.७५ लाखाचे एन.एस.एफ.डी.सी.यांच्या निधीतून तसेच अनुदान रु. ३८.७० लाख व रु. ७०.६० लाखाचे कर्ज वाटप करण्यात आले.

**७. सुविधा कर्ज योजना** :

सदर योजनेअंतर्गत विविध व्यवसायाकरिता एन.एस.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचे मार्फत रु. ५.०० लाखापासून पुढे गुंतवणूक असलेल्या व्यवसायांच्या योजनांना कर्ज दिले जोते. यामध्ये मंजूर केलेल्या कर्जापैकी एन.एस.एफ.डी.सी., नवी दिल्ली यांचा सहभाग ९० टक्के महामंडळाचा सहभाग ५ टक्के (रु. पन्नास हजार अनुदानासहीत) व लाभार्थी सहभाग ५ टक्के पर्यंत असतो. कर्ज फेडीची मुदत जास्तीत जास्त पाच वर्षापर्यंत असते. माहे जानेवारी २०२६ अखेर सुविधा कर्ज योजने अंतर्गत १ लाभार्थ्यांना रु. ९.०० लाखाचे एन.एस.एफ.डी.सी. यांच्या निधीतून तसेच अनुदान रु. ०.५० लाखाचे कर्ज वाटप करण्यात आले.

# ५. महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, मुंबई

### मंडळाची स्थापना

खादी व ग्रामोद्योग यांना प्रोत्साहन देऊन, त्याचे संघटन, विकास आणि विनियमन करण्यासाठी सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक १९ मुंबई खादी व ग्रामोद्योग अधिनियम, १९६० नुसार मंडळाची स्थापना करणेत आली.

### प्रमुख कार्ये

- खादी व ग्रामोद्योग सुरू करणे, प्रोत्साहन देणे, मदत करणे व ते चालू ठेवणे.
- लोकांना त्यांच्या घरी काम पुरवून कर्ज व अन्य स्वरूपाचे आर्थिक साहाय्य देणे.
- कारागिरांचे तांत्रिक कौशल्य वाढीसाठी प्रशिक्षण.
- खादी व ग्रामोद्योगांसाठी आवश्यक हत्यारे, अवजारे तयार करणे.
- कच्चा माल, हत्यारे, अवजारे व वस्तू पुरविण्याची व्यवस्था करणे.
- उत्पादित मालाच्या विक्रीसाठी भांडारे, दुकाने, प्रदर्शने सुरू करणे.
- खादी व ग्रामोद्योगांसाठी सहकारी संस्था स्थापन करणेस प्रोत्साहन देणे.
- खादी व ग्रामोद्योग उत्पादनांच्या वापरासाठी जनजागृती करून वापरास प्रोत्साहन देणे.
- मंडळामार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची आर्थिक प्रगती साध्य करून त्यांना दारिद्र्यरेषेच्या वर आणण्याकरिता विशेष घटक योजना ही केंद्रपुरस्कृत योजना राबविण्यात येते. सदर योजनेसाठी अनुदान महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाकडून प्राप्त होते. विशेष घटक योजना ही महाराष्ट्र शासन, समाज कल्याण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक एससीपी–१०८१/२४०४६/डी – ३१, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ मार्च १९८२ च्या शासन निर्णयान्वये अमलात आलेली आहे.

विशेष घटक योजनेअंतर्गत दारिद्र्यरेषेखालील अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील लाभार्थीसाठी जास्तीत जास्त ५०,००० पर्यंत कर्ज बँकांमार्फत दिले जाते. या कर्जावर ५० टक्के अथवा १०,००० यापैकी कमी असलेली रक्कम अनुदान स्वरूपात दिली जाते.

विशेष घटक योजनेची उत्पन्न मर्यादा शहरी भागाकरिता रुपये ५१,५०० व ग्रामीण भागाकरिता रुपये ४०, ५०० सन २०१३–१४ पासून निश्चित करण्यात आलेली आहे.

**प्रस्तावास आवश्यक कागदपत्रे खालीलप्रमाणे –**

१. शाळा सोडल्याचा दाखला

२. जातीचे प्रमाणपत्र

३. उत्पन्नाचा किंवा दारिद्र्यरेषेखाली असल्याचा दाखला

४. ग्रामपंचायत ओळखपत्र व ना–हरकत दाखला

५. आधार कार्ड व रेशन कार्ड

६. अनुभव किंवा प्रशिक्षणाचा दाखला

७. व्यवसायाचे जागेचा मुल्यांकन उतारा

८. भांडवली कर्जाचे (कोटेशन) दरपत्रक

**कार्यपद्धती –**

१. मंडळाच्या तालुका बलुतेदार सहकारी संस्थांमार्फत कारागीरांचे अर्ज घेऊन जिल्हा कार्यालयास पाठवून जिल्हा कार्यालयाची शिफारस घेऊन सदर अर्ज बँकांकडे मंजुरीसाठी पाठविणे.

२. बँकांनी पाठविलेले प्रस्ताव मंजूर व वाटप केल्यानंतर बलुतेदार सहकारी संस्थेच्या सचिवांमार्फत सदर कारागिरांकडून व बँकांकडून ५० टक्के अनुदान क्लेम तयार करून घेणे व जिल्हा कार्यालयाकडे अनुदान मागणी करणे.

३. सदर अनुदान मागणी प्रस्तावांनुसार जिल्हा कार्यालयाकडून मंडळाच्या मुख्य कार्यालयाकडे अनुदान मागणी केली जाते.

४. या संपूर्ण प्रक्रियेस १ महिन्याचा कालावधी लागतो.

५. या विशेष घटक योजनेचा लाभ घेण्यासाठी संपर्क कार्यालये

तालुका बलुतेदार सहकारी ग्रामोद्योग संस्थांची कार्यालये व मंडळाची जिल्हा कार्यालये.

- सन २०२१–२२ या वित्तीय वर्षामध्ये ५००० लाभार्थ्यांचे उद्दिष्ट ठेवले असून ५ कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे.

**MAHARASHTRA STATE KHADI AND VILLAGE IND BOARD MUMBAI**
**STATEMENT SHOWING THE REPORTS OF S. C. P. SCHEME**

<table>
<tr><th rowspan="2">Sr. No.</th><th rowspan="2">Year</th><th colspan="3">Received</th><th rowspan="2">Beneficiaries Utilized</th><th rowspan="2">Utilized Amount</th><th rowspan="2">Remarks</th></tr>
<tr><th>Previous Balance unutilized</th><th>Grant Received Govt.</th><th>Total</th></tr>
<tr><td>१</td><td>२०११–१२</td><td>––</td><td>३.००</td><td>३.००</td><td>२३७५</td><td>२.३८</td><td></td></tr>
<tr><td>२</td><td>२०१२–१३</td><td>१.०५</td><td>१.५०</td><td>२.५५</td><td>२१५०</td><td>२.१५</td><td></td></tr>
<tr><td>३</td><td>२०१३–१४</td><td>०.३९</td><td>६.६३</td><td>७.०२</td><td>३४६६</td><td>३.५२</td><td></td></tr>
<tr><td>४</td><td>२०१४–१५</td><td>३.५०</td><td>––</td><td>३.५०</td><td>२९०२</td><td>२.७९</td><td></td></tr>
<tr><td>५</td><td>२०१५–१६</td><td>०.७०</td><td>३.००</td><td>३.७०</td><td>२४८०</td><td>२.४८</td><td></td></tr>
<tr><td>६</td><td>२०१६–१७</td><td>१.२२</td><td>१.००</td><td>२.२२</td><td>२१३५</td><td>२.१२</td><td rowspan="5">रक्कम रुपये ५ कोटी शासन निर्णय दि.१८.२.२०२० नुसार निर्गमित झालेला आहे. रक्कम अप्राप्त.</td></tr>
<tr><td>७</td><td>२०१७–१८</td><td>०.५९</td><td>––</td><td>०.५९</td><td>५९७</td><td>––</td></tr>
<tr><td>८</td><td>२०१८–१९</td><td>––</td><td>––</td><td>––</td><td>––</td><td>––</td></tr>
<tr><td>९</td><td>२०१९–२०</td><td>––</td><td>––</td><td>––</td><td>––</td><td>––</td></tr>
<tr><td>१०</td><td>२०२०–२१</td><td>––</td><td>––</td><td>––</td><td>––</td><td>–––</td></tr>
</table>

# ६. महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती/जमाती आयोग, वरळी, मुंबई
## (सांकेतांक क्रमांक–२२२५ ४०७१)

अनुसूचित जाती/जमातीच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय स्थितीचा अभ्यास करून राज्य शासनाला शिफारशी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सामाजिक न्याय विभाग, शासन निर्णय क्र. समाआ, २००३/प्र. क्र. १७५/मावक–१, दिनांक १/३/२००५ अन्वये सदर राज्य अनुसूचित जाती/ जमाती आयोगाची स्थापना केलेली आहे.

**आयोगाची रचना खालीलप्रमाणे आहे.**

१. अध्यक्ष–१ पद

२. अशासकीय सदस्य–४ पदे (विधी, सेवा, सामाजिक व आर्थिक विकास व नागरी हक्क संरक्षण)

**या शिवाय खालील अधिकारी पदसिद्ध सदस्य आहेत.**

**(अ) प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग,**

**(ब) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग,**

**(क) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**सदर आयोगाची कर्तव्ये खालीलप्रमाणे आहेत.**

१. अनुसूचित जाती/जमातीसाठी संविधान व राज्य शासनाकडून उपलब्ध सवलती व हक्कांसाठी तरतूदीप्रमाणे सद्यःस्थितीचा अभ्यास करणे व शासनास उपाय सुचविणे.

२. अनुसूचित जाती/जमातीच्या तक्रारीची चौकशी करणे.

३. अनुसूचित जाती/जमातीच्या सामाजिक, आर्थिक विकासाच्या योजना प्रक्रियेत भाग घेऊन शासनास सल्ला देणे व मुल्यांकन करणे.

४. अनुसूचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९ व नागरी हक्क संरक्षण कायदा १९५५ प्रमाणे दाखल प्रकरणांचा आढावा घेणे. पिडीत व्यक्तीस देण्यात येणाऱ्या अर्थ सहाय्याचा आढावा घेणे.

५. अनुसूचित जाती/जमातीच्या कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक तक्रारी स्विकारणे व तपास करणे. अनुसूचित जाती/जमातीसंबंधी आरक्षण धोरणाचा आढावा घेणे.

६. शासनास अनुसूचित जाती/जमातीसाठी कल्याणकारी योजना संबंधी सल्ला देणे.

७. अनुसूचित जाती/जमातीच्या कल्याण, आरक्षण, संरक्षण, विकास संबंधी इतर बाबी राज्य शासनाकडून आलेल्या सूचनेवर कार्यवाही करणे.

८. अनुसूचित जाती/जमातीच्या यादीमध्ये जातीचा समावेश किंवा वगळण्यासाठी शिफारस करणे.

९. अत्याचार घडलेल्या घटनास्थळाला भेट देणे.

मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी प्रत्यक्षपणे कोणतीही आर्थिक योजना आयोगाकडून राबविली जात नाही. तथापि ''२२२५४०७१–महाराष्ट्र राज्य अनुसूचीत जाती जमाती आयोग'' या लेखाशीर्ष सांकेतांकाखाली सन २०२२–२०२३ या आर्थिक वर्षात आयोगातील अध्यक्ष, सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन, दूरध्वनी खर्च, प्रवास खर्च आणि इतर कार्यालयीन खर्च इत्यादींसाठी रु. १.२५ कोटी खर्च झाला असून २०२४–२०२५ या आर्थिक वर्षाकरिता एकूण रु. ००.० कोटी एवढा नियतव्यय मंजूर झाला आहे. तसेच आयोगातील अध्यक्ष, सदस्य, अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन, कत्रांटी सेवेवरील खर्च, दूरध्वनी खर्च, प्रवास खर्च आणि इतर कार्यालयीन खर्च इत्यादी साठी सन २०२६–२०२७ या आर्थिक वर्षाकरीता एकूण ०० कोटी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर करण्यात आली आहे.

# ७. महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोग

सफाई कर्मचाऱ्यांच्या उन्नतीसाठी, त्यांची मुक्तता व पुनर्वसन यासाठी महाराष्ट्र राज्यात असलेल्या विविध कल्याण योजनांच्या संस्थाकरिता, दिनांक १२/३/१९९८च्या शासन अधिसुचनेन्वये महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. आयोगाच्या अध्यक्षांना महाराष्ट्र शासनाच्या राज्यमंत्र्यांचा दर्जा देण्यात आलेला आहे.

सदरहू आयोगाची कार्ये आणि अधिकार खालीलप्रमाणे :—

महाराष्ट्र शासन राजपत्र, अ.सा. डिसेंबर १९९७/(भाग–४) प्रकरण ३ नुसार आयोग पुढील सर्व किंवा कोणतीही कार्ये पार पाडतील.

(अ) सफाई कर्मचाऱ्यांचा दर्जा, त्यांना मिळणाऱ्या सुविधा आणि संधी या संबंधीच्या विषमता दूर करण्याकरिता कालबद्ध कृती करण्यासाठी राज्य शासनास विशिष्ट कार्यक्रमांची शिफारस करणे.

(ब) सफाई कर्मचाऱ्यांच्या सामाजिक आणि आर्थिक पुनर्वसनाशी संबंधित कार्यक्रमांच्या व योजनेच्या अंमलबजावणीचा अभ्यास आणि मूल्यमापन आणि अशा कार्यक्रमांचे व योजनांचे अधिक चांगले सुसूत्रीकरण व अंमलबजावणी करण्याकरिता राज्य शासनाला सूचना करणे.

(क) राज्य शासन आणि निम–शासकीय संस्था, तसेच प्राप्तानुदान संस्था यांच्या विविध आस्थापनांना भेट देणे व उक्त संस्थांची माहिती मिळविणे किंवा त्यांना सल्ला किंवा सूचना देणे.

(ड) विशिष्ट गाऱ्हाण्याबाबत तपास करणे आणि पुढील कामांची अंमलबजावणी राहिली आहे अशा प्रकरणांची स्वत: होऊन दखल घेणे.

(एक) सफाई कर्मचाऱ्यांच्या कोणत्याही गटाशी संबंधित कार्यक्रम किंवा योजना.

(दोन) सफाई कर्मचाऱ्यांच्या हालअपेष्टा दूर करण्याच्या उद्देशाने घेतलेले निर्णय घालून दिलेली मार्गदर्शक तत्त्वे किंवा दिलेल्या सूचना.

(तीन) सफाई कर्मचाऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीकरिता उपाययोजना.

(चार) सफाई कर्मचाऱ्यांना लागू होणाऱ्या कोणत्याही कायद्यातील तरतुदी व संबंधित प्राधिकरणाकडे किंवा राज्य शासनाकडे या बाबी नेणे.

(इ) सफाई कर्मचाऱ्यांना येणाऱ्या कोणत्याही अडचणी किंवा त्यांच्या नि:समर्थता विचारात घेऊन सफाई कर्मचाऱ्यांशी संबंधित कोणत्याही विषयावर राज्य शासनास नियतकालिका अहवाल पाठवणे.

(ई) राज्य शासन त्यांच्याकडे निर्देशित करील अशा कोणत्याही इतर बाबतीत कार्यवाही करणे.

(२) पोटकलम (१) अन्वयेची आपली कामे पार पाडतांना, आयोगाला राज्य शासन किंवा स्थानिक किंवा इतर निम–शासकीय प्राधिकरण यांच्याकडून त्या पोट–कलमात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही बाबींशी संबंधित असलेली माहिती मागविण्याचा अधिकार असेल.

सन २०१९ ते सन २०२० करिता या आयोगातील अध्यक्ष/उपाध्यक्ष/अधिकारी/शासकीय कर्मचारी व बाह्यस्त्रोत कर्मचारी यांचे वेतन, दुरध्वनी खर्च, प्रवास खर्च व कार्यालयीन खर्च इत्यादी साठी २.०० कोटी इतका नियतव्यय मंजुर करण्यात आला असुन आजतागयत प्रत्यक्ष निधी प्राप्त नाही मात्र सदरील झालेला खर्च मागील वर्षामधील शिल्लक निधीतुन करण्यात आला आहे.

सन २०२६–२७ या चालु आर्थिक वर्षा करिता दैनंदीन खर्च भागविण्याकरिता रु. २.०० कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे.

# ८. अनुसूचित जाती उपयोजना

अनुसूचित जातींच्या लोकांना दारिद्र्यरेषेच्या वर आणणे व त्यांना स्वत:च्या उपजीविकेचे साधन मिळावे या उद्देशाने केंद्र शासनाने विशेष घटक योजना कार्यान्वित केली. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार महाराष्ट्रात सहाव्या पंचवार्षिक (१९८० ते १९८१) योजनेपासून विशेष घटक योजना राबविण्यात येत आहे.

२. विशेष घटक योजना राबविण्यासाठी राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ११.८० टक्के इतका नियतव्यय या विभागास उपलब्ध करून दिला जातो. सदरच्या नियतव्ययाचे वाटप जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय योजनांसाठी वाटप करण्यात आलेला नियतव्यय, संबंधित जिल्हा नियोजन समितीमार्फत अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांकरिता विभागून देण्यात येतो. अशाप्रकारे संबंधित जिल्हा नियोजन समितीमार्फत तयार करण्यात आलेली जिल्हा विशेष घटक योजना प्रारूप आराखडा मंत्रालय स्तरावर मंत्री, समाजकल्याण यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय बैठकांमध्ये अंतिम करण्यात येतो. अंतिम नियतव्यय संबंधित प्रशासकीय विभागांना कळविण्यात येतो. सर्व निधी अर्थसंकल्पित करून जिल्ह्यास वितरित करण्यात येतो.

३. अनुसूचित जाती उपयोजनेतील जिल्हा योजनेचा निधी वितरित करणे, कामांना प्रशासकीय मान्यता देणे व पुनर्विनियोजन याबाबतची सुधारित कार्यपद्धती दिनांक ४ फेब्रुवारी २०१० च्या शासन निर्णयाप्रमाणे निश्चित करण्यात आली होती. तथापि, शासन निर्णय दिनांक १३ एप्रिल २०१७ अन्वये जिल्हा वार्षिक उपयोजना निधी अर्थसंकल्पीत करणेबाबत सुधारित कार्यपद्धती निश्चित करण्यात आलेली आहे. त्यासाठी सन २०१७-२०१८ पासून जिल्हा योजनेसाठी सामाजिक न्याय विभागाच्या अर्थसंकल्पीय प्रकाशनामध्ये जिल्हा वार्षिक योजनेकरिता ३६ जिल्ह्यांकरिता स्वतंत्र मागणी क्रमांक निश्चित करण्यात येऊन प्रत्येक जिल्ह्याकरिता स्वतंत्र लेखाशीर्ष निर्माण करण्यात आले आहे. त्यानुसार प्रत्येक जिल्ह्याअंतर्गत योजनांच्या तरतुदी अर्थसंकल्पीत करून त्या जिल्ह्यास सूपूर्त करण्यात आलेल्या आहेत.

४. वार्षिक योजना सन २०२५-२६ साठी अनुसूचित जाती उपयोजनासाठी एकूण २२६५८.०० (कोटी) इतका नियतव्यय मंजूर करण्यात आला आहे. त्यापैकी राज्यस्तरीय योजनेसाठी १९६५८.०० (कोटी) व जिल्हास्तरीय योजनेकरिता ३०००.०० (कोटी) इतका नियतव्यय विभाजन करुन दिला आहे. तसेच सन २०२६-२७ साठी एकूण रुपये २३१५०.०० (कोटी) नियतव्यय मंजूर केला असून त्यापैकी राज्यस्तरीय योजनांकरिता २०१५०.०० (कोटी) व जिल्हास्तरीय योजनेसाठी रु. ३०००.०० (कोटी) मंजूर आहेत.

**सन २०२६-२०२७ नियतव्यय**

(रुपये कोटींत)

| अ.क्र | विभागाचे नाव | जिल्हास्तरीय | राज्यस्तरीय | ठोक तरतूद |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | सामाजिक न्याय विभाग | १०७५.३३ | १२१०६.८९ | -- |
| २ | महिला व बाल विकास विभाग | ४६.५४ | ३१३८.२० | -- |
| ३ | पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग | १५.२१ | ५३०.०० | -- |
| ४ | सार्वजनिक आरोग्य विभाग | ०.०० | ८२६.०० | -- |
| ५ | रोजगार हमी योजना विभाग | ०.०० | ०.०० | -- |
| ६ | नियोजन विभाग | ०.०० | २.०० | -- |
| ७ | कृषी विभाग | १७८.१६ | ८१४.६९ | -- |
| ८ | सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग | ५.६८ | ८१.१८ | -- |
| ९ | ग्राम विकास विभाग | ०.०० | ९३४.९४ | -- |
| १० | पद्म विभाग | ९०.६७ | ३८.३० | -- |

**सन २०२६-२०२७ नियतव्यय** - चालू

रुपये कोटींत

| १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|
| ११ | महसूल व वन विभाग | ०.०० | ८.३५ | -- |
| १२ | तांत्रिक शिक्षण विभाग | ०.०० | ०.०० | -- |
| १३ | उद्योग ऊर्जा व कामगार विभाग | १६७.९२ | १०७०.०० | -- |
| १४ | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | ६६.३९ | २३२.०० | -- |
| १५ | मृद व जलसंधारण विभाग | ०.०० | १२.०० | -- |
| १६ | कामगार कल्याण विभाग | ०.०० | ०.०० | -- |
| १७ | नगर विकास विभाग | १२५६.५४ | ०.०० | -- |
| १८ | क्रीडा व युवक कल्याण विभाग | ०.०० | ०.०० | -- |
| १९ | विद्युत विकास विभाग | ०.०० | ०.०० | -- |
| २० | साकव बांधणे (सार्वजनिक बांधकाम विभाग) | ७७.६४ | ०.०० | -- |
| २१ | माहिती व प्रसिद्धी (सार्वजनिक बांधकाम विभाग ) | ०.०० | ०.०० | -- |
| २२ | उच्च व तंत्रशिक्षण विभाग | ०.०० | १८.०९ | -- |
| २३ | कौशल्य विकास व उद्योजकता | ३.३७ | ०.०० | -- |
| २४ | गृह निर्माण विभाग | ०.०० | १७२.३४ | -- |
| २५ | अन्न व नागरी पुरवठा विभाग | ०.०० | १६०.०० | -- |
| २६ | वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्य | ०.०० | ०.०० | -- |
| २७ | सामान्य प्रशासन | १४.५५ | ०.०० | -- |
| २८ | सार्वजनिक बांधकाम | ०.०० | ०.०० | -- |
| २९ | फलोत्पादन विभाग | ०.०० | ८.० | -- |
| | **एकूण** | **३०००.००** | **२०१५०.००** | **--** |

## जिल्हावार अनुसूचित जाती व नवबौद्ध यांची २०११ ची लोकसंख्या

| अनु. क्र. | जिल्ह्याचे नाव | एकूण लोकसंख्या | अनुसूचित जाती लोकसंख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | मुंबई शहर | ३०८५४११ | २१९९३४ | ७.१३ |
| २ | मुंबई उपनगर | ९३५६९६२ | ५८३३०२ | ६.२३ |
| ३ | ठाणे | ११०६०१४८ | ७३००८९ | ६.६० |
| ४ | रायगड | २६३४२०० | १३४९५२ | ५.१२ |
| ५ | रत्नागिरी | १६१५०६९ | ६६९४८ | ४.१५ |
| ६ | सिंधुदुर्ग | ८४९६५१ | ५५५८६ | ६.५४ |
| ७ | नाशिक | ६१०७१८७ | ५५४६८७ | ९.०८ |
| ८ | धुळे | २०५०८६२ | १२७५७१ | ६.२२ |
| ९ | नंदुरबार | १६४८२९५ | ४७९८५ | २.९१ |
| १० | जळगाव | ४२२९९१७ | ३८९२७३ | ९.२० |
| ११ | अहमदनगर | ४५४३१५९ | ५७३६९८ | १२.६३ |
| १२ | पुणे | ९४२९४०८ | ११८०७०३ | १२.५२ |
| १३ | सातारा | ३००३७४१ | ३२३२३६ | १०.७६ |
| १४ | सांगली | २८२२१४३ | ३५३०९३ | १२.५१ |
| १५ | सोलापूर | ४३१७७५६ | ६४९७४५ | १५.०५ |
| १६ | कोल्हापूर | ३८७६००१ | ५०४४६१ | १३.०१ |
| १७ | बुलढाणा | २५८६२५८ | ४७०८९५ | १८.२१ |
| १८ | अकोला | १८१३९०६ | ३६४०५९ | २०.०७ |
| १९ | वाशिम | ११९७१६० | २२९४६२ | १९.१७ |
| २० | अमरावती | २८८८४४५ | ५०६३७४ | १७.५३ |
| २१ | यवतमाळ | २७७२३४८ | ३२८५१८ | ११.८५ |
| २२ | नागपूर | ४६५३५७० | ८६७७१३ | १८.६५ |
| २३ | वर्धा | १३००७७४ | १८८८३० | १४.५२ |
| २४ | भंडारा | १२००३३४ | २००३७२ | १६.६९ |
| २५ | गोंदिया | १३२२५०७ | १७५९६१ | १३.३१ |
| २६ | चंद्रपूर | २२०४३०७ | ३४८३६५ | १५.८० |
| २७ | गडचिरोली | १०७२९४२ | १२०७४५ | ११.२५ |
| २८ | छत्रपती संभाजीनगर | ३७०१२८२ | ५३९३६८ | १४.५७ |
| २९ | जालना | १९५९०४६ | २७२२६६ | १३.९० |
| ३० | बीड | २५८५०४९ | ३५१२५४ | १३.५९ |
| ३१ | परभणी | १८३६०८६ | २४७३०८ | १३.४७ |
| ३२ | हिंगोली | ११७७३४५ | १८२५६५ | १५.५१ |
| ३३ | नांदेड | ३३६१२९२ | ६४०४८३ | १९.०५ |
| ३४ | धाराशिव | १६५७५७६ | २६५१८४ | १६.०० |
| ३५ | लातूर | २४५४१९६ | ४८०९१३ | १९.६० |
| | **एकूण** | **११२३७४३३३** | **१३२७२८९८** | **११.८१** |

## विवरणपत्र ''अ''
## विशेष घटक योजना तरतूद व साध्य

(रुपये कोटींमध्ये)

| वर्ष | राज्यासाठीचा एकूण नियतव्यय | वि. घ. यो. साठीचा नियतव्यय | राज्य योजनाची वि. घ. यो. च्या नियतव्ययाची टक्केवारी | वि. घ. यो. चा एकूण खर्च |
|---|---|---|---|---|
| १९९६-१९९७ | ५,८५०.०० | ५९४.६७ | १०.०० | ४५९.२१ |
| १९९७-१९९८ | ८,३२८.०० | ६००.०० | ७.२० | ५५२.२१ |
| १९९८-१९९९ | ११,६००.०० | ६०८.०० | ५.१८ | ४७०.०० |
| १९९९-२००० | १२,१६१.६६ | ६४०.०० | ५.२६ | ४५७.०९ |
| २०००-२००१ | ५,७९८.०० | ५५१.०० | ९.५० | ४२२.२० |
| २००१-२००२ | ११,७२०.५६ | ५५१.०० | ५.०० | २६८.५६ |
| २००२-२००३ | ११,१३५.३७ | ५३०.२७ | ५.०० | २८५.८६ |
| २००३-२००४ | ६,८३०.०० | ७५१.३० | ११.०० | ३०५.२३ |
| २००४-२००५ | ९,२३३.०० | १०१५.६३ | ११.०० | ५५०.०० |
| २००५-२००६ | ११,०००.०० | ११२२.०० | ११.०० | ११२२.०० |
| २००६-२००७ | १३,३००.०० | १५९२.०० | ११.९७ | १४९४.७३ |
| २००७-२००८ | २२,०००.०० | २०६०.०० | १०.०२ | १८७०.७८ |
| २००८-२००९ | २५,०००.०० | २३३३.०० | ९.३३ | २२१३.०० |
| २००९-२०१० | २६,०००.०० | २६५२.०० | १०.२० | -- |
| २०१०-२०११ | ३७,९१५.०० | ३८६७.१० | १०.२० | २६०३.४५ |
| २०११-२०१२ | ४१,५००.०० | ४२८४.०० | १०.२० | ३१११.६२ |
| २०१२-२०१३ | ४५,०००.०० | ४५९०.०० | १०.२० | ३२३६.५९ |
| २०१३-२०१४ | ४६९३८.०० | ५०१८.६३ | १०.६९ | ३५६३.११ |
| २०१४-२०१५ | ५१२२२.५४ | ६०४४.२६ | ११.८० | ३३९४.१० |
| २०१५-२०१६ | ५४९९९.०० | ६४९०.०० | ११.८० | ३७७०.८६ |
| २०१६-२०१७ | ५६९९७.०० | ६७२५.६५ | ११.८० | ४४४८.२९ |
| २०१७-२०१८ | ७७१८४.०० | ७२३१.०० | ९.३७ | ५५४२.१७ |
| २०१८-२०१९ | ९५०००.०० | ९९४९.२२ | १०.४७ | ६१५५.४५ |
| २०१९-२०२० | ९९०००.०० | ९२०८.०० | ९.३० | -- |
| २०२०-२०२१ | ११५०००.०० | ९६६८.०० | ८.४१ | ६३८९.५१ |
| २०२१-२०२२ | १३००००.०० | १०६३५.०० | ८.१८ | ६४६२.३७ |
| २०२२-२०२३ | १५००००.०० | १२२३०.०० | ८.१५ | ८८२७.४७ |
| २०२३-२०२४ | १७२०००.०० | १३८२०.०० | ८.०३ | -- |
| २०२४-२०२५ | १९२०००.०० | १५८९३.०० | ८.२८ | -- |
| २०२५-२०२६ | २५४५६०.०० | २२६५८.०० | ८.९० | -- |

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग मागणी क्रमांक एन–६

## २२२५, अनुसूचित जाती घटक कार्यक्रम (SCCS)
## (जिल्हा योजना)

रुपये हजारांत

| अनु. क्र. | जिल्ह्याचे नाव | लेखाशीर्ष सांकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज २०२६–२७ |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | मुंबई | २२२५ ई ४१८ | २२००००.००० |
| २ | मुंबई उपनगर | २२२५ ई ४२७ | ७१००००.००० |
| ३ | ठाणे | २२२५ ई ४३६ | १३९९७००.००० |
| ४ | रायगड | २२२५ ई ४४५ | १८७०७०.००० |
| ५ | रत्नागिरी | २२२५ ई ४५४ | २४९९०५.००० |
| ६ | सिंधुदुर्ग | २२२५ ई ४६३ | २५९८४०.००० |
| ७ | पुणे | २२२५ ई ४७२ | १३४४०००.००० |
| ८ | सातारा | २२२५ ई ४८१ | ८४९९९०.००० |
| ९ | सांगली | २२२५ ई ४९२ | ८३५५००.००० |
| १० | सोलापूर | २२२५ ई ५०७ | १४३००००.००० |
| ११ | कोल्हापूर | २२२५ ई ५१६ | १०५४४००.००० |
| १२ | नाशिक | २२२५ ई ५२५ | ९९९८४०.००० |
| १३ | धुळे | २२२५ ई ५३४ | २९९९५०.००० |
| १४ | जळगाव | २२२५ ई ५४३ | ९७९८००.००० |
| १५ | अहमदनगर | २२२५ ई ५५२ | १३५८२००.००० |
| १६ | नंदुरबार | २२२५ ई ५६१ | १४००००.००० |
| १७ | छत्रपती संभाजीनगर | २२२५ ई ५७२ | १०३७४००.००० |
| १८ | जालना | २२२५ ई ५८१ | ७५००००.००० |
| १९ | परभणी | २२२५ ई ५९९ | ६१९६५०.००० |
| २० | नांदेड | २२२५ ई ६०५ | १६२९९००.००० |
| २१ | बीड | २२२५ ई ६१४ | १२६००००.००० |
| २२ | लातूर | २२२५ ई ६२३ | १२२७०००.००० |
| २३ | धाराशिव | २२२५ ई ६३२ | ७३९९००.००० |
| २४ | हिंगोली | २२२५ ई ६४१ | ५२९९५०.००० |
| २५ | नागपूर | २२२५ ई ६५२ | १९४८९९०.००० |
| २६ | वर्धा | २२२५ ई ६६१ | ४५००००.००० |
| २७ | भंडारा | २२२५ ई ६७९ | ५५५०००.००० |
| २८ | चंद्रपूर | २२२५ ई ६८८ | ७२७७००.००० |
| २९ | गडचिरोली | २२२५ ई ६९७ | ३५९८५०.००० |
| ३० | गोंदिया | २२२५ ई ७०३ | ४५००००.००० |
| ३१ | अमरावती | २२२५ ई ७१२ | ९९९८९९.००० |
| ३२ | अकोला | २२२५ ई ७२१ | ८६९९५०.००० |
| ३३ | यवतमाळ | २२२५ ई ७३२ | ८३००००.००० |
| ३४ | बुलढाणा | २२२५ ई ७४१ | ९८९९२०.००० |
| ३५ | वाशिम | २२२५ ई ७५९ | ७५९९८०.००० |
| ३६ | पालघर | २२२५ ई ७६८ | १३९९३०.००० |
| | | **एकूण** | **२९१९३२१४.०००** |

## सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग मागणी क्रमांक एन-७
## ४२२५, अनुसूचित जाती घटक कार्यक्रम (SCCS) भांडवली खर्च
## (जिल्हा योजना)

रुपये हजारांत

| अनु. क्र. | जिल्ह्याचे नाव | लेखाशीर्ष सांकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज २०२६-२७ |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | मुंबई | ४२२५ १५६६ | ०.००० |
| २ | मुंब उपनगर | ४२२५ १५७५ | ०.००० |
| ३ | ठाणे | ४२२५ १५८४ | ०.००० |
| ४ | रायगड | ४२२५ १५९३ | ९२६००.००० |
| ५ | रत्नागिरी | ४२२५ १६०१ | ८९७९५.००० |
| ६ | सिंधुदुर्ग | ४२२५ १६१९ | १२००००.००० |
| ७ | पुणे | ४२२५ १६२८ | १०६०००.००० |
| ८ | सातारा | ४२२५ १६३७ | १०००००.००० |
| ९ | सांगली | ४२२५ १६४६ | २४०००.००० |
| १० | सोलापूर | ४२२५ १६५५ | १००००.००० |
| ११ | कोल्हापूर | ४२२५ १६६४ | २५०५००.००० |
| १२ | नाशिक | ४२२५ १६७३ | ०.००० |
| १३ | धुळे | ४२२५ १६८२ | ०.००० |
| १४ | जळगाव | ४२२५ १७९१ | ०.००० |
| १५ | अहमदनगर | ४२२५ १७०८ | ७००.००० |
| १६ | नंदुरबार | ४२२५ १७१७ | ०.००० |
| १७ | छत्रपती संभाजीनगर | ४२२५ १७२६ | ०.००० |
| १८ | जालना | ४२२५ १७३५ | ०.००० |
| १९ | परभणी | ४२२५ १७४४ | ०.००० |
| २० | नांदेड | ४२२५ १७५३ | ०.००० |
| २१ | बीड | ४२२५ १७६२ | ०.००० |
| २२ | लातूर | ४२२५ १७७१ | २५००.००० |
| २३ | धाराशिव | ४२२५ १७८२ | ०.००० |
| २४ | हिंगोली | ४२२५ १७९१ | ०.००० |
| २५ | नागपूर | ४२२५ १८०६ | ०.००० |
| २६ | वर्धा | ४२२५ १८१५ | ०.००० |
| २७ | भंडारा | ४२२५ १८२४ | ०.००० |
| २८ | चंद्रपूर | ४२२५ १८३३ | २०००.००० |
| २९ | गडचिरोली | ४२२५ १८४२ | ०.००० |
| ३० | गोंदिया | ४२२५ १८५१ | ०.००० |
| ३१ | अमरावती | ४२२५ १८६२ | ०.००० |
| ३२ | अकोला | ४२२५ १८७१ | ०.००० |
| ३३ | यवतमाळ | ४२२५ १८८९ | ०.००० |
| ३४ | बुलढाणा | ४२२५ १८९८ | ०.००० |
| ३५ | वाशिम | ४२२५ १९०४ | ०.००० |
| ३६ | पालघर | ४२२५ १९१३ | ०.००० |
| | | **एकूण** | **७९८०९५.०००** |

## सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभाग मागणी क्रमांक एन-८
## ६२२५, अनुसूचित जाती घटक कार्यक्रम (SCCS) कर्जे व आगाऊ रकमा
## (जिल्हा योजना)

रुपये हजारांत

| अनु. क्र. | जिल्ह्याचे नाव | लेखाशीर्ष सांकेतांक | अर्थसंकल्पीय अंदाज २०२६-२७ |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | मुंबई | ६२२५ ०३११ | ०.००० |
| २ | मुंबई उपनगर | ६२२५ ०३२२ | ०.००० |
| ३ | ठाणे | ६२२५ ०३३१ | ३००.००० |
| ४ | रायगड | ६२२५ ०३४९ | ३३०.००० |
| ५ | रत्नागिरी | ६२२५ ०३५८ | ३००.००० |
| ६ | सिंधुदुर्ग | ६२२५ ०३६७ | १६०.००० |
| ७ | पुणे | ६२२५ ०३७६ | ०.००० |
| ८ | सातारा | ६२२५ ०३८५ | १०.००० |
| ९ | सांगली | ६२२५ ०३९४ | ५००.००० |
| १० | सोलापूर | ६२२५ ०४०२ | ०.००० |
| ११ | कोल्हापूर | ६२२५ ०४११ | १००.००० |
| १२ | नाशिक | ६२२५ ०४२९ | १६०.००० |
| १३ | धुळे | ६२२५ ०४३८ | ५०.००० |
| १४ | जळगाव | ६२२५ ०४४७ | २००.००० |
| १५ | अहमदनगर | ६२२५ ०४५६ | ११००.००० |
| १६ | नंदुरबार | ६२२५ ०४६५ | ०.००० |
| १७ | छत्रपती संभाजीनगर | ६२२५ ०४७४ | २६००.००० |
| १८ | जालना | ६२२५ ०४८३ | ०.००० |
| १९ | परभणी | ६२२५ ०४५२ | ३५०.००० |
| २० | नांदेड | ६२२५ ०५०९ | १००.००० |
| २१ | बीड | ६२२५ ०५१८ | ०.००० |
| २२ | लातूर | ६२२५ ०५२७ | ५००.००० |
| २३ | धाराशिव | ६२२५ ०५३६ | १००.००० |
| २४ | हिंगोली | ६२२५ ०५४५ | ५०.००० |
| २५ | नागपूर | ६२२५ ०५५४ | १०१०.००० |
| २६ | वर्धा | ६२२५ ०५६३ | ०.००० |
| २७ | भंडारा | ६२२५ ०५७२ | ०.००० |
| २८ | चंद्रपूर | ६२२५ ०५८१ | ३००.००० |
| २९ | गडचिरोली | ६२२५ ०५९२ | १५०.००० |
| ३० | गोंदिया | ६२२५ ०६०७ | ०.००० |
| ३१ | अमरावती | ६२२५ ०६१६ | १०१.००० |
| ३२ | अकोला | ६२२५ ०६२५ | ५०.००० |
| ३३ | यवतमाळ | ६२२५ ०६३४ | ०.००० |
| ३४ | बुलढाणा | ६२२५ ०६४३ | ८०.००० |
| ३५ | वाशिम | ६२२५ ०६५२ | २०.००० |
| ३६ | पालघर | ६२२५ ०६६१ | ७०.००० |
| | | **एकूण** | **८६९१.०००** |

# १. ग्राम विकास व जलसंधारण विभाग

## मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी कमीत कमी २० टक्के खर्च

जिल्हा परिषदांनी व पंचायत समित्यांनी निर्दिष्ट केलेल्या बाबींपासून उत्पन्नाच्या किमान २० टक्के रक्कम अनुसूचित जाती / जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व नवबौद्धांच्या कल्याणासाठी ठेवून खर्च करावी, असे धोरणात्मक आदेश महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ च्या कलम २६१, पोट–कलम (१) खाली अधिकारांचा वापर करून मागासवर्गीयांच्या कल्याणाच्या सामूहिक व वैयक्तिक लाभाच्या खालील बाबींवर खर्च करण्याचे आदेश दिले आहेत :––

(१) मागासवर्गीयांसाठी बालवाड्या ;

(२) मागासवर्गीयांना नवीन घरबांधणीसाठी अगर दुरुस्तीसाठी अर्थसाहाय्य ;

(३) मागासवर्गीयांना वसतिगृह / अभ्यासिका तसेच वसतिगृहातील विद्यार्थ्यांना / विद्यार्थिनींना गणवेश पुरविणे ;

(४) आंतरजातीय विवाहित जोडप्यांना पूरक अर्थसाहाय्य ;

(५) मागासवर्गीयांसाठी पाणीपुरवठा सोयी / विहीर दुरुस्ती इत्यादी ;

(६) मागासवर्गीयांना लघु उद्योगासाठी अर्थसाहाय्य उदाहरणार्थ प्रशिक्षित मागासवर्गीयांना शिलाई मशिन पुरविणे, लेथ, ऑईल इंजिन, इलेक्ट्रिक मोटार खरेदीसाठी अर्थसाहाय्य इत्यादी ;

(७) मागासवर्गीय अनुसूचित वसतिगृहातील मुलांच्या शैक्षणिक सहली ;

(८) मागासवर्गीयांना बायोगॅस प्लॅटसाठी अर्थसाहाय्य ;

(९) मागासवर्गीय वस्तीत जोडरस्ते बांधणे, रस्त्यावरील दिवाबत्ती, रस्त्यालगतची गटारे इत्यादी जलनिस्सारणाच्या योजना ;

(१०) मागासवर्गीय वस्त्यांमध्ये उद्याने / बगिचे / समाजमंदिरे, प्रौढ शिक्षण व्यवस्था, क्रीडांगण, ग्रंथालय इत्यादी ;

(११) प्राथमिक व माध्यमिक शाळांतील मागासवर्गीय हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती पुस्तके, लेखनसाहित्य, गणवेश पुरविणे ;

(१२) मागासवर्गीयांसाठी कमी खर्चाने संडास बांधणे ;

(१३) मागासवर्गीयांसाठी घरगुती वापरासाठी विद्युतपुरवठा करणे ;

(१४) मागासवर्गीय कुष्ठरोग्यांना पुनर्वसनासाठी अर्थसाहाय्य ;

(१५) मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वासंतिक वर्ग चालू करणे ;

(१६) समाजकल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या हरिजन वस्त्यांची सुधारणा या योजनांतर्गत बांधलेल्या समाजमंदिराचे अपूर्ण काम पूर्ण करण्यास आर्थिक साहाय्य ;

(१७) व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळत असलेली शिष्यवृत्ती अपुरी पडत असल्यास अर्थसाहाय्य ;

(१८) मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे ;

(१९) मागासवर्गीय लोकांना २० टक्के उत्पादनातून बायोगॅससाठी शेगडी, लॉक व पाईप इत्यादी साहित्याचा पुरवठा करणे ;

(२०) जीवनधारा / जवाहर रोजगार योजनेअंतर्गत मागासवर्गीय लाभार्थीचे विहिरीवर विजेचे पोल पुरविण्यासाठी अर्थसाहाय्य देणे ;

(२१) मागासवर्गीय एस. एस. सी. अनुत्तीर्ण उमेदवारांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने वाहनचालकांचे प्रशिक्षण देणे ;

(२२) गवती छप्पर बदलून घरावर टीन पत्रे घालणे;

(२३) मागासवर्गीय शेतकऱ्यांना शेतीची अवजारे व चाकजोडे पुरविणे;

(२४) बेघर, भूमिहीन घरकुल योजनेखाली बांधलेल्या घरांना नागरी सुविधा पुरविणे;

(२५) सिंचन योजना (एकूण निधीच्या २५ टक्केपेक्षा जादा खर्च होणार नाही या अटीवर )

उपरोक्त योजनांच्या अनुषंगाने अशा प्रकारच्या अनेक सामुदायिक अथवा वैयक्तिक लाभाच्या सद्भावमूलक योजना (बोनाफाइड) जिल्हा परिषदांनी स्वतःच्या अखत्यारीत आयुक्त, समाजकल्याण यांच्या सल्याने घ्यावयाच्या आहेत. परंतु एकाच योजनेचा लाभ पुन्हा–पुन्हा एका कुटुंबातील व्यक्तीला दिला जाऊ नये म्हणून एक नोंदवही ठेवण्याबाबतही संबंधिताना कळविले आहे. सदर २० टक्के रकमेपैकी ३० टक्के रक्कम मागासवर्गीय महिलांसाठी खर्च करण्यात यावी.

**१. तथापि, २० टक्के रकमेतून खालील योजनांवर खर्च करण्यात येऊ नये, असेही आदेश दिले आहेत :**

(१) कार्यालयीन इमारतींचे बांधकाम;

(२) कर्मचाऱ्यांचे वेतन/भत्ते;

(३) मनोरंजनात्मक व प्रेक्षणीय स्थळांना भेटीसाठी आयोजित केलेल्या सहली अथवा अधिकाऱ्यांचे दौरे;

(४) दूरचित्रवाणी संच अथवा तत्सम चैनीच्या वस्तूंची खरेदी;

(५) जाहिरातींवरील खर्च;

(६) पुतळे / स्मारके उभारणे;

(७) मेळावे आयोजित करणे;

२. जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांनी २० टक्के निधीतून मागासवर्गीयांसाठी घेण्यात येणाऱ्या विकास योजनांसाठी जिल्ह्यातील अनुसूचित जाती/जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमातींचे लाभार्थी उपलब्ध झाले नाहीत तर जिल्हा परिषद व पंचायत व पंचायत समित्यांनी आदिवासी विकास महामंडळ, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, अण्णा भाऊ साठे मातंग विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ यांच्याशी संपर्क साधून लाभार्थी उपलब्ध करून घ्यावयाचे आहेत.

३. हा निधी त्याच वित्तीय वर्षामध्ये खर्च होईल असे सर्व संबंधिताना कळविले आहे. तथापि, ही रक्कम त्या वित्तीय वर्षामध्ये खर्च होऊ शकली नाही तर ती पुढील वर्षी अनुशेष दाखवून खर्च करावयाची असून या खर्चाचा अनुशेष भरून काढण्याबाबत सर्व मुख्य कार्यवाही अधिकारी यांना कळविले आहे.

४. या रकमेच्या खर्चाच्या संनियंत्रणाची जबाबदारी मंत्रालयीन स्तरावर उपसचिवांकडे, विभागीय स्तरावर सहायक आयुक्त (विकास) व जिल्हा स्तरावर मु. का. अ. व स. क. अधिकारी यांच्यावर सोपविली आहे.

## स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना /

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

**केंद्र शासनाने दिनांक १ एप्रिल १९९९ पासून स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना :** ही दारिद्र्यनिर्मूलनाची योजना सुरू केली आहे. सदर योजनेअंतर्गत केंद्र व राज्य यांचा हिस्सा ७५ : २५ असा आहे. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांना बँकांचे कर्ज व शासकीय अनुदान देऊन स्वयंरोजगाराचे साधन उपलब्ध करून देणे व असा लाभ देण्यात आलेल्या कुटुंबांना तीन वर्षात दारिद्र्यरेषेच्या वर आणून अशा कुटुंबांची किमान रुपये २००० इतकी मासिक प्राप्ती व्हावी, हा स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचा प्रमुख उद्देश आहे.

**योजनेची ठळक वैशिष्ट्ये**

१. स्थानिक स्तरावर ग्रामीण जनतेच्या क्षमतेचा वापर करून लहान उद्योग निर्मितीचे साधन निर्माण करून पुरेसा रोजगार निर्माण करणे हे स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे उद्दिष्ट आहे.

२. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना हा लहान उद्योजकांसाठी सामाजिक कार्यक्रम असून स्वरोजगारासंबंधी सर्व मुद्दे लक्षात घेऊन तयार करण्यात आलेला आहे. या योजनेअंतर्गत ग्रामीण स्वयंरोजगारांचे स्वयंसहायता गट निर्माण करणे, कृतीचे नियोजन करणे, मूलभूत सोयींचा विकास, तांत्रिक कौशल्य व विपणन व्यवस्था इत्यादी बाबींचा समावेश आहे.

३. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत लहान उद्योजकांना प्रस्थापित करताना गटसमूहाला प्राधान्य दिले जाईल. गटस्तरावर ४–५ प्रमुख कार्यक्रम निवडताना व्यावसायिक कौशल्य, साधनसामग्रीची उपलब्धता, बाजारपेठेची उपलब्धता याचा विचार करण्यात येईल. प्रमुख कार्यक्रम निवडताना गटस्तरावर पंचायत समितीची मान्यता तसेच जिल्हास्तरावर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा / जिल्हा परिषद यांची मान्यता घेण्यात येते.

४. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेंतर्गत गटसमूहाला प्राधान्य देण्यात येईल. गटपातळीवरील स्वयंसहायता गटांपैकी किमान ५० टक्के गट खासकरून महिलांचे असावेत. त्या अनुषंगाने प्रत्येक स्वयंसहायता गटामध्ये महिलांचा जास्तीत–जास्त सहभाग वाढविण्याबाबत प्रयत्न करण्यात येतील.

५. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेअंतर्गत प्रकल्पाच्या ३० टक्के व जास्तीत जास्त रुपये ७५०० असे अनुदान देता येईल. अनुसूचित जाती / जमातीसाठी ५० टक्के व जास्तीत–जास्त रुपये १०,००० अनुदान देता येईल. स्वरोजगाराच्या गटसमूहासाठी ही मर्यादा प्रकल्प किमतीच्या ५० टक्के व जास्तीत–जास्त रुपये १.२५ लाख अनुदान इतकी राहील. सिंचन प्रकल्पासाठी सदरहू आर्थिक मर्यादा लागू राहणार नाही.

६. या योजनेअंतर्गत ग्रामीण क्षेत्रातील तळागाळातील लोकांना मदत देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. त्याचप्रमाणे स्वयंरोजगारापैकी अनुसूचित जाती/जमातीसाठी ५० टक्के स्त्रिया ४० टक्के व विकलांग ३ टक्के याप्रमाणे स्वरोजगार असावेत.

७. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना ही जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने पंचायत समितीमार्फत राबवायची आहे.

८. सन २०१४–१५ पासून सदर स्वग्राम योजना '' महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान'' या नावाने राज्यस्तरीय योजना म्हणून राबविण्यात येत आहे.

## जलसंधारण विभाग

**एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम (NL१७००१२ ) . –** अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांच्या जमिनींच्या विकासासाठी सदर योजना राबविली जाते. सदरहू योजनेसाठी सन २०२६–२७ करिता रुपये २१७.०० लाख इतका नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर आहे.

# २. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

## शालेय शिक्षण

### १. प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी मोफत पाठपुस्तक योजना व माध्यमिक शाळांच्या विकासासाठी सहायक अनुदान (NE०८०००१ and NE०८०००६)

प्राथमिक शाळेत प्रवेश करणाऱ्या मुलांची संख्या बरीच वाढली तरी त्यामध्ये अनुसूचित जाती, जमाती व समाजातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत गटातील मुलांची संख्या अतिशय कमी आहे. म्हणून या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी अनुसूचित जाती (नवबौद्ध धरून), अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व समाजातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेले इतर गट यांच्यातील विद्यार्थ्यांच्या लाभासाठी इयत्ता १ ली ते १० वी इयत्तांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी चालविलेल्या प्राथमिक शाळा व मान्यताप्राप्त अनुदानित अशासकीय माध्यमिक शाळा यामध्ये पुस्तकपेढी स्थापन करण्याची योजना १९७६-७७ पासून सुरू करण्यात आली. या योजनेनुसार १ ली ते ४ थी इयत्तेमधील विद्यार्थ्यांचा १९७६-७७ मध्ये समावेश करण्यात आला व ही योजना १९७७-७८ मध्ये स्थानिक संस्थांनी चालविलेल्या प्राथमिक व अशासकीय अनुदानित माध्यमिक शाळांमधील ५ वी ते ७ वी इयत्तांना लागू करण्यात आली. १९७९-८० मध्ये ही योजना १० व्या इयत्तेला लागू करण्यात आली. इयत्ता पहिली व दुसरी मधील पुस्तकांचे संच दरवर्षी बदलण्यात येतात. इतर इयत्तांमधील पुस्तकांचे संच दर तीन वर्षांनी बदलून देण्यात येतात.

अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांसाठी सदर योजनेकरिता सन २०२६-२७ साठी रुपये ६०.०० लक्ष नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर आहे.

### २. प्राथमिक शाळांतील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या विद्यार्थ्यांना विशेष सुविधा (NE०८०००२)

प्राथमिक शाळांतील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, विमुक्त जाती यामधील प्रवेश घेणाऱ्या मुलींची संख्या किंवा उपस्थिती बरीच कमी आहे. याशिवाय या समाजातून बरीचशी मुले शाळा मध्येच सोडून जातात. त्यामध्ये माध्यमिक शाळांत प्रवेश घेताना या विद्यार्थ्यांची संख्या ही इतर विद्यार्थ्यांच्या तुलनेत कमी होते. या परिस्थितीवर मात करण्यासाठी आणि प्राथमिक शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्याकरिता प्रत्येक विद्यार्थ्यामागे दरवर्षी गणवेशाचे दोन संच व लेखनसामग्री विनामूल्य पुरविण्याची एक योजना शासनाने १९७९-८० या वर्षांपासून सुरू केली आहे.

वार्षिक योजना २०२६-२७ साठी रुपये २०.०० लक्ष इतका नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर आहे.

### ३. दुर्बल घटकातील मुलींना शाळेत येण्यासाठी उपस्थिती भत्ता (NE०८०००३)

आदिवासी उपयोजना क्षेत्रातील तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राव्यतिरिक्त राज्यातील अन्य भागातील इयत्ता १ ली ते ४ थी मध्ये शाळेत जाणाऱ्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या दारिद्र्यरेषेखालील मुलींना प्रतिदिन रुपये १ प्रमाणे उपस्थिती भत्ता देण्याची योजना दिनांक ३ जानेवारी १९९२ पासून शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक पीआरई/१०९१/९६१४/प्राशि- १, दिनांक १० जानेवारी १९९२ अन्वये सुरू करण्यात आली आहे.

यासाठी महिन्यातील एकूण शालेय दिवसांच्या ७५ टक्के उपस्थिती अनिवार्य राहील, तसेच ज्या मुली या भत्त्यास पात्र आहेत पण त्या सलग तीन महिने शाळेत अनुपस्थित राहिल्यास ज्या काळापासून त्या अनुपस्थित आहेत त्या काळापासून शैक्षणिक वर्षअखेरपर्यंत भत्ता मिळण्यास अपात्र राहतील.

शासन निर्णय दिनांक १० जानेवारी १९९२ अन्वये सदरची योजना ३ जानेवारी १९९२ पासून कार्यान्वित करण्यात येत आहे. शैक्षणिक वर्षात एकूण कामकाजाच्या दिवसांचा विचार करता साधारणत: २२० दिवस होतात. त्यामुळे प्रत्येक वर्षासाठी प्रत्येक दिवसाचे रुपये १ प्रमाणे एकूण २२० रुपये उपस्थिती भत्ता अनुज्ञेय राहील. मुलींच्या माध्यमातून सदरचा उपस्थिती भत्ता पालकांना मिळेल. शिक्षणाधिकारी, प्रशासन अधिकारी ही रक्कम शिक्षण विस्तार अधिकारी, पर्यवेक्षक यांचेमार्फत मुख्याध्यापकांना डी. डी. ने वाटप करतील. मुख्याध्यापकांनी त्या रकमेचे वाटप मुलींना / पालकांना ग्राम शिक्षण समितीच्या अध्यक्षांच्या / सदस्यांच्या उपस्थितीमध्ये करावयाचे आहे.

वार्षिक योजना २०२६-२७ साठी रुपये ३३४.७३ लक्ष इतका नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर आहे.

**४. १०३ विकास गटांतील इयत्ता १ ली ते ४ थी च्या सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचा मोफत पुरवठा करणे (NE०८०००४)**

ज्या विकास गटांमध्ये स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण स्त्रियांच्या राष्ट्रीय साक्षरता प्रमाणापेक्षा कमी आहे ते विकास गट शैक्षणिक विकासाच्या बाबतीत सर्वात खालच्या स्तरावर असतात. हे विकास गट आर्थिकदृष्ट्या मागासलेले आहेत. या विकास गटांमध्ये असलेल्या मोठ्या प्रमाणातील गरिबीमुळे कामात मुले गुंतलेली असतात किंवा लहान भावंडांना सांभाळण्याकरिता घरीच थांबलेली असतात. त्याचा परिणाम शाळेतील गळतीचे प्रमाण वाढते. ज्या तालुक्यातील १०० टक्के पटनोंदणी होण्यासाठी आणि विद्यार्थी टिकवून ठेवण्यासाठी विद्यार्थ्यांना इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंत मोफत पाठ्यपुस्तके देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वार्षिक योजना २०२६-२७ साठी रुपये ०.०० लक्ष इतका नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर आहे.

**५. १०३ विकास गटांतील प्राथमिक शाळेतील इयत्ता १ ते ४ थी च्या सर्व विद्यार्थ्यांना गणवेश व लेखनसामग्री पुरविणे (NE०८०००५)**

ज्या विकास गटांमध्ये स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण स्त्रियांच्या राष्ट्रीय साक्षरता प्रमाणापेक्षा कमी आहे, असे विकास गट शैक्षणिक विकासाच्या बाबतीत सर्वात खालच्या स्तरावर असतात. महाराष्ट्र राज्यात असे १०३ विकास गट आहेत, ते आर्थिकदृष्ट्या मागासलेलेसुद्धा आहेत. मोठ्या प्रमाणावरील गरिबीमुळे या विकास गटातील बरीचशी मुले शाळेत येत नाहीत व त्यामुळे शाळेतील गळतीचे प्रमाण वाढण्यावर त्याचा परिणाम होतो. या विद्यार्थ्यांना प्राथमिक शिक्षणाकडे आकर्षित करण्यासाठी शासनाने त्यांचा शालेय शिक्षणाचा वाटा उचलण्याचे ठरविले आहे. या अंतर्गत विकास गटातील इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना टप्प्याटप्प्याने गणवेश व लेखनसामग्री मोफत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वार्षिक योजना २०२६-२७ साठी रुपये ५.०० लक्ष इतका नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर आहे.

**६. अनुसूचित जातीच्या मुलींना सायकल पुरविणे (NE०८०००७)**

सन २०२६-२७ साठी या योजनेकरिता रुपये २५.०० लाख नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर आहे.

**७. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना बेंचेस पुरविणे (NE०८०००८)**

सन २०२६-२७ साठी या योजनेकरिता रुपये ०.०० लाख नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर आहे.

## क्रीडा व युवक कल्याण

**१. क्रीडांगणाचा विकास (NE०९०००७)**

सन २०२६-२७ साठी रुपये २५६८.०० लाख नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर आहे.

**२. व्यायामशाळांचा विकास (NE०९०००८)**

सन २०२६-२७ साठी रुपये ३५५०.०० लाख नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर आहे.

**३. सामाजिक सेवा शिबिर भरविणे (NE०९०००९)**

सन २०२६-२७ साठी रुपये ४५.६५ लाख नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर आहे.

**४. ग्रामीण/नागरी भागातील युवक मंडळांना अर्थसाहाय्य (NE०९००१०)**

सन २०२६-२७ साठी रुपये ३०.५५ लाख नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर आहे.

# ३. कौशल्य विकास व उद्योजकता

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाअंतर्गत तंत्रशिक्षण भाग–दोन विकासक्षेत्रांतर्गत राज्यात माध्यमिक शालान्त परीक्षापूर्व तांत्रिक व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सुविधेत वाढ करणे + २ स्तरावरील किमान कौशल्यावर आधारित व्यवसाय अभ्यासक्रम व महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करणे या तीन योजना राबविण्यात येतात.

अनुसूचित जाती व नवबौद्ध यांच्या कल्याणाकरिता राज्यात राबविण्यात येणाऱ्या विशेष घटक योजनेसाठी शासन, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग यांचेमार्फत निरनिराळ्या जिल्हा नियोजन समित्यांच्या माध्यमातून खालील योजनांसाठी नियतव्यय उपलब्ध करून देण्यात येतो.

**१. + २ स्तरावरील किमान कौशल्यावर आधारित व्यवसाय अभ्यासक्रम (NZA२१०००४)**

नवीन शैक्षणिक धोरणानुसार किमान कौशल्याचा समावेश असलेले + २ स्तरावरील अभ्यासक्रम राज्यात राबविण्यात येतात. ही योजना १९८८–८९ पासून राज्यातील शासकीय व अशासकीय संस्थांमधून राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व विकास परिषदेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार राज्यात राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांना वैयक्तिक लाभ देण्यासाठी वार्षिक योजना २००६–०७ मध्ये रुपये २०.०० लाख प्रस्तावित असून त्यामध्ये इयत्ता ११ वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांला वरील घटकांतील लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी त्या त्या अभ्यासक्रमातील हत्यार संच व पुस्तक संचाकरिता रुपये ३१० प्रतिलाभार्थी अनुदान देणे प्रस्तावित आहे. सन २०२६–२७ साठी या योजनेवर रुपये ०.०४ लक्ष नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर आहे.

**२. माध्यमिक शालान्त परीक्षापूर्व तांत्रिक/ व्यावसायिक प्रशिक्षणाच्या सुविधात वाढ करणे . – (NZA२१०००५)**

इयत्ता ८ वी ते १० वी पर्यंत तांत्रिक शिक्षण राज्यात राबविण्यात येते. तांत्रिक विषयाची पुस्तके व तंत्रविषयक प्रात्यक्षिके शिकवण्याकरिता यंत्रसामग्रीकरिता बराच निधी लागतो. दुर्बल घटकांच्या बेताच्या आर्थिक परिस्थितीमुळे या घटकातील विद्यार्थी पुस्तके व हत्यार संच खरेदी करू शकत नाहीत. म्हणून लाभार्थ्यांना वैयक्तिक लाभ देऊन स्वयंरोजगारक्षम बनविण्यासाठी तांत्रिक विषयातील हत्यार संच, पुस्तक संच देण्यासाठी वार्षिक योजना २०२६–२७ मध्ये रुपये २३.०५ लाख इतका नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर आहे.

## व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय

### (औद्योगिक प्रशिक्षण संस्था)

शिल्प कारागीर प्रशिक्षण योजना ही राष्ट्रीय पातळीवर राबविण्यात येत असून ह्या योजनेच्या विकासाची व प्रशासनाची सूत्रे महासंचालक, रोजगार व प्रशिक्षण (डीजीईटी) यांचेकडे आहेत. या योजनेअंतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील निरनिराळ्या व्यवसाय अभ्यासक्रमांची रचना करणे, व्यवसाय पाठ्यक्रम तयार करणे, त्यात बदल करणे, परीक्षेची कार्यपध्दती ठरविणे इत्यादीबाबतीत केंद्र शासनाचे स्तरावर राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (एन. सी. टी. व्ही. टी.) अशी सल्लागार समिती आहे. अशा प्रकारे औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणाचा कार्यक्रम संपूर्ण देशात राष्ट्रीय पातळीवरून राबविण्यात येत असून राज्यस्तरावर या कार्यक्रमाची प्रशासकीय जबाबदारी त्यांनी विहित केलेल्या मानकानुसार महाराष्ट्र राज्यात या संचालनालयामार्फत पार पाडण्यात येते. या प्रशिक्षणाचा जास्तीत जास्त प्रशिक्षणार्थ्यांना फायदा मिळावा व त्यामध्ये अनुसूचित जाती व नवबौध्द या घटकांतील उमेदवारांना आवड निर्माण व्हावी याकरिता अनुसूचित जाती व नवबौध्द यांच्या कल्याणाकरिता राज्यात राबविण्यात येणाऱ्या अनुजाती उपयोजनेसाठी शासन, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष साहाय्य विभाग यांच्यामार्फत निरनिराळ्या जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून नियतव्यय उपलब्ध करून देण्यात येतो. अनुजाती उपयोजनेअंतर्गत कामगार व कामगार कल्याण क्षेत्राखाली राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती पुढीलप्रमाणे देण्यात येत आहे.

**१. पुस्तकपेढी सुरू करणे (ग्रंथालयाचा विकास). – (NZA२१०००१)**

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख व्हावी व त्यांना संबंधित व्यवसायाचे परिपूर्ण सैध्दान्तिक ज्ञान प्राप्त व्हावे या उद्देशाने प्रत्येक औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये पुस्तकपेढी योजना सुरू करण्यात आली. सन २०२६–२७ करिता या योजनेकरिता रुपये ९३.४० लक्ष नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर आहे.

**२. अनुसूचित जाती व नवबौध्द जातीतील प्रशिक्षणार्थ्यांना हत्यार पेटी संच (टूल किटस्) पुरविणे . – (NZA२१०००३)**

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थी व्यवसाय प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांना रोजगार व स्वयंरोजगार करण्यास प्रोत्साहित करण्यासाठी त्यांचे व्यवसायाशी निगडित हत्यारांचा संच पुरविल्यास ते स्वत:चा स्वयंरोजगार सुरू करून स्वावलंबी बनू शकतात. या उद्देशाने वार्षिक योजना २००२ – २००३ पासून औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अनुसूचित जाती व नवबौध्द जातीतील प्रशिक्षणार्थ्यांना हत्यार पेटी संच (टूल किटस) पुरविणेसाठी ही योजना राबविण्यात येत आहे.

सन २०२६–२७ करीता या योजनेकरिता रुपये ९६.४० लाख इतका नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर आहे.

**३. चालू औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील यंत्रसामग्रीची त्रुटी भरून काढणे . – (NZA२१०००२)**

या योजनेकरिता सन २०२६–२७ साठी रुपये २०२.०२ लाख नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर आहे.

# ४. कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग
## (अ) पीक संवर्धन

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना (कृषी समृद्धी योजना) (ND०३०००७)**

**शासन निर्णय ५ जानेवारी २०१७ नुसार, अनुसूचित जाती व नवबौद्ध शेतकऱ्यांना दारिद्र्यरेषेच्या वर आणण्यासाठी अर्थसाहाय्य या योजनेचे पुनर्विलोकन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना (कृषी समृद्धी योजना) ही योजना अंमलात आणली गेली.**

अनुसूचित जाती/नवबौध्द शेतकरी कुटुंबांकडे असलेल्या शेतजमिनीची सर्वांगीण सुधारणा करून त्यांच्या शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी व त्यांना दारिद्र्यरेषेच्या वर येणे शक्य व्हावे म्हणून उपाययोजना करणे यासाठी अनु. जाती उपयोजना राबविण्यात येत आहे.

२. या योजनेअंतर्गत ज्या लाभार्थ्यांकडे किमान ०.४० ते ६ हेक्टरपर्यंत जमीन आहे व त्यांचे वार्षिक उत्पन्न रुपये १,५०,००० पर्यंत आहे अशा शेतकऱ्यांना जमीन सुधारणा, निविष्ठा वाटप, सुधारित अवजारांचा पुरवठा, विद्युत मोटार पंप, पाईप लाईन, बैलगाडी, बैलजोडी, नवीन विहीर, इनवेल बोअरिंग, जुनी विहीर दुरुस्ती या घटकांचा लाभ दिला जातो.

३. योजनेचे आर्थिक निकष २०१७–१८ मध्ये निर्धारित करण्यात आले आहेत. या योजनेअंतर्गत विविध घटकांचा किंमतीमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. मा. मंत्री (कृषी) यांच्या अध्यक्षते खाली व मा. मंत्री (अदिवासी विकास विभाग) यांच्या उपस्थितीत दि. १० जानेवारी, २०२४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये सदर योजनेचे घटक निहाय अर्थिक मापदंड वाढविणे निकषामध्ये सुधारणा करणे व नवीन घटकांचा समावेश करणे या बाबतच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.

त्या अनुषंगाने या योजनेमध्ये घटकनिहाय आर्थिक मापदंड वाढविणे, निकषांमध्ये सुधारणा करणे व नवीन घटकांचा समावेश करणयास दि. ३० सप्टेंबर, २०२४ रोजी झालेल्या मा. मंत्री मंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने वरील योजनेअंतर्गत अनुदानाची कमाल मर्यादा पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | बाब | अनुदान मर्यादा (रुपये) |
|---|---|---|
| १ | नवीन सिंचन विहीर | ४,००,००० |
| २ | जुनी विहीर दुरूस्ती | १,००,००० |

| अ.क्र. | बाब | अनुदान मर्यादा (रुपये) |
|---|---|---|
| ३ | शेततळ्याचे प्लॅस्टिक अस्तरीकरण | प्रचलित आर्थिक मापदंड व शेततळ्याचे आकारमानानुसार परिगणित होणाऱ्या रकमेच्या किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ९०% किंवा रू.२ लाख यापैकी जे कमी असेल ते |
| ४ | इनवेल बोअरिंग | ४०,००० |
| ५ | वीज जोडणी आकार | २०,००० किंवा प्रत्यक्ष भरलेला आकार यापैकी जे कमी असेल ते |
| ६ | विद्युत पंपसंच/ डिझेल इंजिन (नवीन बाब) | १० अश्वशक्ती क्षमतेपर्यंत पंपसंचकरिता प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या ९०% किंवा रू. ४०,००० यापैकी जे कमी असेल ते |
| ७ | सोलार पंप (वीज जोडणी आकार व पंपसंच ऐवजी) | प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या ९०% किंवा रु. ५०,००० यापैकी जे कमी असेल ते |
| ८ | एचडीपीई / पीव्हीसी पाईप (नवीन बाब) | प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या ९०% किंवा रु. ५०,००० यापैकी जे कमी असेल ते |
| ९ | सुक्ष्म सिंचन संच | |
| ९.१ | तुषार सिंचन संच | प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या १००% किंवा रु.४७,००० यापैकी जे कमी असेल ते |
| ९.२ | ठिबक सिंचन संच | प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ९०% किंवा रु.९७,०००/- अनुदान यापैकी जे कमी असेल ते |
| ९.३ | तुषार सिंचन संच पुरक अनुदान | प्रति थेब अधिक पीक योजनेंतर्गत (१) अल्प / अत्यल्प भूधारकांसाठी ५५% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून २५% + डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेतून १०% तसेच (२) बहू भूधारकांसाठी ४५% मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून ३०% + डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेतून १५% किंवा रू. ४७,०००/- यापैकी जे कमी असेल ते (एकूण ९०% अनुदान मर्यादेत) |
| ९.४ | ठिबक सिंचन संच पुरक अनुदान | प्रति थेंब अधिक पीक योजनेंतर्गत (१) अल्प / अत्यल्प भूधारकांसाठी ५५% + मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून २५% + डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेतून १०% तसेच (२) बहू भूधारकांसाठी ४५% मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजनेतून ३०% + डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेतून १५% किंवा रू. ९७,०००/- यापैकी जे कमी असेल ते (एकूण ९०% अनुदान मर्यादेत) |
| १० | यंत्रसामुग्री (बैलचलित / ट्रॅक्टर चलित अवजारे) (नवीन बाब) | ५०,००० |
| ११ | परसबाग (नवीन बाब) | ५,००० |

सन २०२६-२७ साठी रु.१७५५८.५५ लाख इतका नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर आहे.

## (ब) पशुसंवर्धन

**(१) दुभत्या जनावरांचे गट वाटप / दुधाळ जनावरांना खाद्य वाटप अनुदान (ND०५००२२). –** अनुसूचित जातीच्या तसेच नवबौध्द लाभार्थींना तीन दुभती जनावरे (संकरित गायी / म्हशींचे) गट ५० टक्के अनुदान व उर्वरित बँकेचे कर्ज लाभार्थ्यांचा हिस्सा याप्रमाणे निधी वाटप करण्याची योजना सर्व जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येते. तसेच दुधाळ जनावरे (गायी / म्हशी) जोपर्यंत दुग्धोत्पादन करतात, तोपर्यंत त्यांना आवश्यक त्या प्रमाणात संतुलित पशुखाद्य दिले जाते. परंतु ही जनावरे भाकड झाल्यानंतर (म्हणजेच दुधातून आटल्यानंतर ) त्यांना आवश्यक आहार देणे लाभार्थीस आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. याचा परिणाम होऊन या जनावरांची पुढील काळातील दुग्धोत्पादन क्षमता कमी होते, ही बाब लक्षात घेऊनच लक्ष्यांकित लाभार्थीकडील गायी/ म्हशींना लागोपाठच्या दोन भाकड काळात व प्रगत गर्भावस्थेच्या काळात संतुलित पशुखाद्य १०० टक्के अनुदानावर पुरविण्याची योजना कार्यान्वित आहे. सन २०२६–२७ साठी रुपये ५०९०.१५ लाख नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर आहे.

**विस्तार व प्रशिक्षण**

**(१) अनुसूचित जातीच्या लाभार्थीना पशुपालन प्रशिक्षण देणे (ND०५००२३).–** अनुसूचित जातीच्या लाभार्थीना विविध योजनांतर्गत पुरविण्यात आलेली दुधाळ जनावरे, कुक्कुट गट, शेळ्या/मेंढ्यांच्या गटाचे योग्यरीत्या पालन–पोषण होण्याच्या दृष्टीने संबंधितांना पशुपक्षी पालनविषयी प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. याप्रीत्यर्थ वर्ष २०२६–२७ मध्ये रुपये ५२.०१ लाख इतका नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर केला आहे.

## (क) मत्स्य व्यवसाय

(१) उपलब्ध व नवीन पाण्याच्या साठ्यातून मत्स्योत्पादन व मत्स्योत्पादनाचे क्षेत्र वाढविणे.

(२) अनुसूचित जाती व नवबौद्ध मच्छीमारांची सामाजिक व आर्थिक उन्नती करणे.

**योजना**

**(१) अवरुध्द पाण्यातील मत्स्यसंवर्धन (ND०६००१२ ).–** जलक्षेत्रामधून अधिक मत्स्योत्पादन होण्यासाठी अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या सहकारी संस्थांकडे असलेल्या तलावांमधून खात्यामार्फत जलदगतीने वाढणाऱ्या विविध प्रकारच्या मत्स्यबीजांचे संवर्धन केले जाते व मत्स्यशेती करणाऱ्यास प्रोत्साहन मदत केली जाते. सन २०२६–२७ करिता या प्रयोजनासाठी रुपये ६.०४ लाख इतका नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर आहे.

**(२) मच्छीमार सहकारी संस्थांचा विकास (ND०६००१५ ). –** मच्छीमार सोसायटीच्या कामात सुधारणा करणे व आर्थिकदृष्ट्या बळकटीकरण करणे यासाठी सदर योजनांतर्गत मच्छीमार सहकारी संस्थांना व्यवस्थापकीय अनुदान व भागभांडवल रूपाने अर्थसाहाय्य दिले जाते.

शासनाच्या नियमानुसार पहिल्या तीन वर्षांकरिता रुपये ५००, नंतरच्या चौथ्या व पाचव्या वर्षांकरिता रुपये २५० व्यवस्थापकीय अनुदान दिले जाते. सन २०२६–२७ करिता या प्रयोजनासाठी रुपये ०.१४ लाख इतका नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर आहे.

**(३) मत्स्य व्यवसायोपयोगी आवश्यक सामग्रीच्या खरेदीसाठी अर्थसाहाय्य (ND०६००१४ ). –** सदर योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्दांना नायलॉन सूत/तयार जाळी, लहान मासेमारी बोटी इत्यादी साधने खरेदीकरिता अनुदान रूपाने अर्थसाहाय्य दिले जाते. सन २०२६–२७ करिता रुपये ३०.४२ लाख इतका नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर केला आहे.

**(४) मच्छीमार नौकांचे यांत्रिकीकरण (ND०६००१३). –** मच्छीमार नौकांचे यांत्रिकीकरण करून मत्स्योत्पादनात भरीव वाढ व्हावी व मच्छीमारांची आर्थिक स्थिती सुधारावी म्हणून या योजनेअंतर्गत सागरी विभागात राष्ट्रीय सहकार व विकास निगमच्या अर्थसाहाय्याने मच्छीमार गटांना अर्थसाहाय्य देण्यात येते. या पद्धतीत ५५ टक्के कर्ज, ३० टक्के खास विमोचक भागभांडवल (राज्य+रा.स.वि.नी.) व ५ टक्के भागभांडवल मच्छीमारांना नवीन नौकांचे बांधकाम करण्यासाठी देण्यात येते, प्रकल्पाच्या १० टक्के रक्कम गटाने गुंतवावयाची आहे. सन २०२६–२७ करिता रुपये ०.०२ लाख इतका नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर केला आहे.

# ५. गृहनिर्माण विभाग

गृहनिर्माण विभागामार्फत स्वतंत्र अशी कोणतीही योजना अनुसूचित जाती व भटक्या विमुक्त जातीच्या लोकांकरिता राबविली जात नाही. तथापि, अनु. जाती उपयोजनेमध्ये खालील योजनांचा समावेश होतो.

**१. गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रम. –** गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रमांतर्गत गलिच्छ वस्त्यांत पाण्याचे नळ, रस्ते, संडास, दिवाबत्ती, गटारे या नागरी सुविधा सामूहिकरीत्या पुरवून त्यांचा परिसर सुधारला जातो. ही योजना ५०,००० व त्यावरील लोकवस्ती असलेल्या शहरांमध्ये राबविली जाते. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या देखरेख व नियंत्रणाखालील संबधित शहरातील महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपालिका यांच्याकडून ही योजना राबविली जाते.

# ६. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

## राज्य शासनाची बीजभांडवल योजना (एसएमएस) (NK२६०००१)

**पात्रता**

(१) कमीतकमी ७ वी पास.

(२) वयोमर्यादा १८ ते ५० वर्षे.

(३) अर्जदार महाराष्ट्राचा किमान १५ वर्षांचा रहिवासी असावा.

(४) शिक्षणाची अट : कुशल कारागिरांसाठी पात्रतेनुसार शिथिल करण्यात येते.

**वैशिष्ट्ये**

शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक इपीपी–२००७–(११९८)/उ. ७, दिनांक १८ मे, २००७ नुसार खालीलप्रमाणे धोरणात्मक बदल करण्यात आलेले आहेत :–

(१) प्रकल्प मर्यादा रुपये २५.०० लाखांपर्यंत आहे.

(२) बीजभांडवल कर्जाची कमाल मर्यादा रुपये ३.७५ लाखांपर्यंत आहे.

(३) बँक कर्ज ७५ टक्के.

(४) रुपये दहा लाखांपेक्षा कमी प्रकल्प खर्च असलेल्या प्रकल्पांमध्ये बीजभांडवल कर्जाचे प्रमाण पुढीलप्रमाणे राहील :–

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सर्वसाधारण प्रवर्गातील लाभधारकांसाठी | .. | १५ टक्के |
| २. | अनुसूचित जाती / जमाती, अपंग, विमुक्त व भटक्या जाती / जमाती आणि इतर मागासवर्गीय उमेदवारांना | .. | २० टक्के |

**बीजभांडवल साहाय्यावर आकारावयाचे व्याज (NK२६०००१).–** बीजभांडवलाची रक्कम मृदू कर्ज (सॉफ्ट लोन) म्हणून दरसाल सहा टक्के व्याजाने देण्यात यावे.

बीजभांडवल कर्जाच्या रकमेची विहित कालावधीत परतफेड करण्यात आली नाही तर थकीत रकमेवर द. सा. द. शे. १ टक्के दराने दंडनीय व्याज आकारण्यात येईल.

बीजभांडवल कर्जाच्या रकमेची नियमितपणे विहित कालावधीत परतफेड करणाऱ्या लाभार्थींना ३ टक्के रिबेट देण्यात येईल. शासन निर्णय, १५ सप्टेंबर २००३ अनुसार कर्जदाराने थकीत मुद्दल व व्याज एकरकमी भरणा केल्यास त्यास दंडनीय व्याज माफ आहे. अशा प्रकरणांमध्ये द. सा. द. शे. १ टक्के दराने दंडव्याज आकारण्यात येणार आहे व वरील व्याज पूर्वलक्षी प्रभावाने दिनांक १ ऑक्टोबर १९९३ पासूनच्या सर्व चालू प्रकरणांना लागू आहे.

बीजभांडवल योजनेंतर्गत लाभार्थ्यांना शासनातर्फे स्पेशल ॲम्नेस्टी योजनेद्वारे शासनाचे देय मुद्दल एकरकमी परतावा (वन टाइम सेटलमेंट) एकाच वेळी भरल्यास त्यावरील व्याज व दंडनीय व्याज माफ करण्यात येणार आहे. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्याने सर्व रक्कम (व्याज व दंडव्याज सोडून) दिनांक ३१ मार्च २००८ पूर्वी भरणे आवश्यक आहे.

सदर योजना वाहन व्यवसाय, व्यापार व उद्योगासाठी लागू आहे.

कर्जाची परतफेड ७ वर्षांच्या आत करावयाची असून सुरुवातीचा ३ वर्षे विलंबावधी (वाहनांसाठी ६ महिने) निश्चित करण्यात येईल.

या योजनेसाठी सन २०२६–२७ करिता रुपये ८९.८० लाख इतका नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर केला आहे.

## उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम (NK१४०००७)

सुशिक्षित बेरोजगारांना स्वयंरोजगारासाठी प्रवृत्त करण्याच्या दृष्टीने उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम राबविला जातो. सदर प्रशिक्षण कार्यक्रमात मार्गदर्शक शिबिरे व प्रशिक्षण शिबिरे घेतली जातात. प्रशिक्षण शिबिर १ दिवस ते ७ दिवसांचे असून, उद्योग/व्यवसाय सुरू करणेसाठी संपूर्ण मार्गदर्शन केले जाते. त्यामध्ये व्यवसाय निवडणे, जागेसंबंधी आवश्यक तरतुदी, प्रकल्प अहवाल तयार करणे, निरनिराळे परवाने मिळविण्याच्या पद्धती विक्रीकरिता आवश्यक बाबी इत्यादीबाबत उपयुक्त माहिती दिली जाते. या योजनेअंतर्गत शासनातर्फे प्रती प्रशिक्षणार्थी रुपये १०० प्रमाणे विद्यावेतन दिले जाते. सदर कार्यक्रम महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रामार्फत राबविण्यात येतो.

सदर कार्यक्रमामार्फत राबविण्यात येणाऱ्या विशेष घटक योजनेमध्ये सुधारणा करण्यात आल्या असून विशेष घटक योजनेअंतर्गत अनुसूचित जातीच्या सुशिक्षित बेरोजगारांकरिता खालीलप्रमाणे प्रशिक्षण कार्यक्रम महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रामार्फत घेण्यात येतात.

**१. उद्योजकता परिचय कार्यक्रम (१ दिवसीय, अनिवासी)**

एक दिवसाच्या परिचय कार्यक्रमात व्यवसायाची निवड, उद्योजकीय व्यक्तिमत्त्व विकास, व्यवसाय व्यवस्थापन, शासनाच्या विविध संस्था व अर्थसाहाय्य देणाऱ्या संस्था व त्यांच्यामार्फत राबविल्या जाणाऱ्या या योजनांची माहिती दिली जाते. प्रती प्रशिक्षण कार्यक्रम ६०० रुपये खर्च राहील.

**२. उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (१२ दिवसीय, निवासी)**

सदर प्रशिक्षण कार्यक्रम १२ दिवसांचे, निवासी व भोजनव्यवस्थेसह आहे. उद्योजकता परिचय कार्यक्रमात निवडलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना उद्योगाशी संबंधित कलागुणांचा विकास व माहिती मिळण्याचा प्रशिक्षणात प्रामुख्याने समावेश आहे. प्रती प्रशिक्षणार्थी रुपये ४,००० संस्थेस देण्यात येतात.

**३. तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रम (१५ दिवस ते २ महिने अनिवासी)**

या प्रशिक्षण कार्यक्रमात उत्पादन/सेवा उद्योगांशी निगडित तांत्रिक प्रशिक्षण देण्यात येते. हे प्रशिक्षण अनिवासी असून प्रशिक्षणार्थीस १५ दिवसांकरिता रुपये ५०० आणि दरमाह रुपये १,००० विद्यावेतन देण्यात येते, तसेच प्रती प्रशिक्षणार्थीस रुपये ३,००० संस्थेस देण्यात येतात.

या योजनेसाठी सन २०२६–२७ करिता रुपये ४९०.०६ लाख इतका नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर केले आहेत.

## जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना (NK २६०००२)

**पात्रता**

(१) शिक्षणाची व वयाची अट नाही.

(२) उद्योग, लघू उद्योग नोंदणीस पात्र असावा.

(३) उद्योगामधील यंत्रसामग्री गुंतवणूक रुपये २ लाखांचे आत.

(४) उद्योग १ लाख लोकवस्ती असणाऱ्या गावांमध्ये सुरू करता येतो.

(५) चालू उद्योगाचा विस्तार करण्यासाठीही या योजनेचा लाभ घेता येतो.

**वैशिष्ट्ये**

(१) ६५ ते ७५ टक्के बँक कर्ज.

(२) २० टक्के बीजभांडवल ४ टक्के व्याजाने मात्र मर्यादा रुपये ४०,००० अनुसूचित जाती/जमाती ३० टक्के कमाल रुपये ६०,०००.

(३) स्वत:चे ५ टक्के भांडवल.

(४) बीजभांडवल परतफेड ७ वर्षे.

या योजनेसाठी सन २०२६–२७ करिता रुपये ५.११ लाख इतका नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर केला आहे.

---

## ७. नगर विकास विभाग

### साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना (शा. नि. १.९.२०१६), महानगरपालिका (NF१००००२), नगरपालिका (NF१००००३)

नागरी क्षेत्रातील विशेष घटकविषयक लाभार्थींसाठी अनुसूचित जाती उपयोजनेअंतर्गत साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन १९९५–९६ या आर्थिक वर्षामध्ये नगर विकास विभागामार्फत सुरू करण्यात आलेली आहे. या योजनेअंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील अनुसूचित जाती, तसेच नवबौद्धांसाठी ज्या प्रभागांमध्ये अनुसूचित जाती व नवबौद्ध (विशेष घटक) यांची लोकसंख्या जेथे तुलनेने अधिक आहे तेथे प्राधान्याने (उतरत्या क्रमाने) नागरी सुविधा उपलब्ध करून देता याव्यात म्हणून नागरी सुविधाविषयक कामे हाती घेण्यासाठी १०० टक्के अनुदान देण्यात येते. सध्या अ. जा. वस्त्यांमध्ये पिण्याचे पाणी व स्वच्छतेच्या कामांना प्राधान्य देऊन उर्वरित कामे शासनाच्या मान्यतेने करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. या योजनेअंतर्गत महानगरपालिका एका आर्थिक वर्षामध्ये रुपये १ कोटी तर ''अ'' वर्ग नगरपालिकांस किमान रुपये ५० लाख व ''ब'' वर्ग व ''क'' वर्ग नगरपालिकांना रुपये २५ लाख या किमान मर्यादेपर्यंत अनुदान अनुज्ञेय करण्यात आलेले आहे. सन २०२६–२७ साठी १२५६५४.०७ लाख इतका नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर करण्यात आलेला आहे.

## ८. सहकार विभाग

### १. डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना (पीक उत्पादन प्रोत्साहन योजना ) (NV२५०००९)

दिनांक २ नोव्हेंबर १९९१ च्या शासन निर्णयानुसार कृषी सहकारी पतसंस्थेकडून रुपये १० हजार अथवा त्यापेक्षा कमी अल्पमुदत पीक कर्ज घेऊन त्याची विहित मुदतीत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनात्मक सूट म्हणून ४ टक्के एवढी रक्कम देण्यात येत होती. त्यानंतर दिनांक २४ मे १९९४ व दिनांक २६ एप्रिल १९९९ च्या शासन निर्णयानुसार या योजनेची व्याप्ती अनुक्रमे रुपये १५ हजार व रुपये २५ हजारांपर्यंत वाढविण्यात आलेली आहे. सदरच्या योजनेअंतर्गत अनुसूचित जातींच्या सभासदांना वेगळी तरतूद करण्यात आलेली नव्हती, त्यामुळे त्यांना जादा फायदा मिळू शकत नव्हता. सबब, शासनाने दिनांक ४ मार्च २००३ च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जातीच्या शेतकरी सभासदांना या योजनेअंतर्गत सर्वसाधारण योजनेतून ४ टक्के व सामाजिक न्याय विभागाच्या विशेष घटक योजनेअंतर्गत जी ४ टक्के सवलत देण्यात येते ती अशी एकूण ८ टक्के सवलत देण्यात येत आहे. ही योजना दिनांक १ एप्रिल २००३ पासून लागू करण्यात आलेली आहे. सदर योजनेसाठी सन २०२६–२७ करिता रुपये ५६७.७३ लाख इतका नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर आहे.

### २. अनुसूचित जाती व नवबौद्धांना सहकारी साखर कारखान्याचे भाग खरेदीसाठी अर्थसाहाय्य (NV२५००१०)

या योजनेसाठी सन २०२६–२७ करिता रुपये ०.० लाख इतका नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर आहे.

### ३. अनुसूचित जाती व नवबौद्धांना सहकारी साखर कारखान्याचे भाग खरेदीसाठी कर्जे (NV२५००१२)

या योजनेसाठी सन २०२६–२७ करिता रुपये ०.० लाख इतका नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर नाही.

---

## ९. महिला व बालकल्याण विभाग

### १. विविध व्यवसायाभिमुख प्रशिक्षण घेणाऱ्या महिलांना विद्यावेतन (NX२८०००२)

सर्वसाधारणपणे ज्या महिला एस. एस. सी. अथवा बारावी झालेल्या आहेत व ज्यांना पुढील शिक्षण घ्यावयाचे आहे, परंतु, त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना पुढील शिक्षण घेता येत नाही व या शिक्षणामुळे त्यांना नोकरी मिळू शकत नाही किंवा नोकरीसाठी आय. टी. आय., नर्सिंग, टेलीफोन ऑपरेटर इत्यादीसारखे एखादे प्रशिक्षण आवश्यक असते ते मिळू शकत नाही, अशा महिलांना

प्रशिक्षण देऊन स्वत:च्या पायावर उभे राहण्याकरिता अशा आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या स्त्रियांसाठी ही योजना सुरू करण्यात आली. सदरहू योजना शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक एसडब्ल्यूआय१०८५/२०८३० (८०) / सीए–४, दिनांक २१ ऑक्टोबर १९८५ अन्वये सुरू करण्यात आली असून दिनांक १ एप्रिल १९९५ पासून संबंधित जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांना योजनेतील लाभार्थींना विद्यावेतन मंजूर करण्याचे अधिकार सुपूर्द करण्यात आलेले आहेत. एका महिलेस दरमाह रुपये १०० प्रमाणे विद्यावेतन देण्यात येते. प्रशिक्षणाचा कालावधी सहा महिने ते दोन वर्षांपर्यंतचा असतो. या कालावधीसाठी महिलेस विद्यावेतन देण्यात येते. सन २०२६–२७ करिता या योजनेसाठी रुपये ०.०२ लाख इतका नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर आहे.

### २. महिला बालकल्याण समिती (NX२८०००४)

**(अ)** शासनाने शासनाच्या विविध योजनांमध्ये महिलांच्या सहभागासाठी महिला आणि बालकल्याणाच्या विविध योजना सुरु केल्या आहेत. त्यासाठी जिल्हा परिषद स्तरावर महिला बालकल्याण समितीची स्थापना केली आहे. शासनाने सदर समितीच्या कार्यक्षमतेत एकात्मिक बालविकास कार्यक्रम / एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (४० टक्के महिलास्तर ) ग्रामीण विभागातील महिला आणि बालविकास योजना, शिवणकाम इत्यादी योजना समाविष्ट केल्या आहेत. याशिवाय महिला आणि बालकल्याणसंबंधीच्या त्यांच्या स्वत:च्या व काही नवीन योजना महिला आणि बालकल्याण दृष्टीने कार्यान्वित केल्या आहेत.

**(ब)** शासनाने शासन अधिसूचना, महिला व बालविकास विभाग, मंत्रालय, मुंबई–३२, क्रमांक एमबीएस–२०००/ प्र. क्र. –३५३ /आर, दिनांक १९ ऑक्टोबर २००० अन्वये राज्यस्तरावर कार्यरत असलेल्या १० योजना ग्रामीण पातळीवर कार्यान्वित करण्यासाठी सन २०२६–२७ साठी सदर योजनेकरिता रुपये ४६५४.०० लाख इतका नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर आहे.

### ३. स्वयंरोजगार योजनेखालील स्त्रियांना व्यक्तिगत अनुदान (NX२८०००३)

आर्थिकदृष्ट्या कमकुवत महिलांना स्वयंरोजगार मिळवता यावा म्हणून अशा महिलांना खाद्यपदार्थ तयार करून विकणे, मण्यांच्या वस्तू तयार करणे, भाजीपाला विकणे इत्यादी व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रत्येकी रुपये ५०० एकदाच आर्थिक अनुदान देण्यात येते. या योजनेखाली अर्ज करताना उत्पन्न दाखला, वास्तव्य दाखला व दोन प्रतिष्ठित व्यक्तींचे ओळखपत्र द्यावे लागते. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्याकडे अर्ज करावेत. सन २०२६–२७ करिता या योजनेसाठी रुपये ०.०२ लाख इतका नियतव्यय जिल्हा नियोजन समितीद्वारे मंजूर आहे.

---

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे – ४११००६.